मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

# अर्थसंवाद

भारतीय सौर पौष - फाल्गुन. 1927

जानेवारी - मार्च 2006, / खंड 29, अंक 4

- ग्रामीण विकास - मानवी व नैसर्गिक संसाधनाधिष्ठित विकास प्रतिमान
- आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिद्धांत - एक सिंहावलोकन (लेखांक 2 उत्तरार्थ)
- सामाजिक निवडी संदर्भात एक वेचक साहित्य सर्वेक्षण
- एकोणतिसावे वार्षिक अधिवेशन : अहवाल
- तिसावे वार्षिक अधिवेशन : विषयांची रुपरेषा



मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिद्धये।
शोधचर्चाविवादार्थं संवादोऽयं प्रवर्तितः ।।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

जानेवारी - मार्च, 2006 / खंड 29, अंक 4

**प्रमुख संपादक**
विनायक श्रीधर देशपांडे

**सहायक संपादक**
रवीन्द्र शंकर जोशी

**सल्लागार मंडळ**
(2003-06)
कमलाकर हणवंते
रामकृष्ण सोळुंके
आशुतोष राराविकर
वंदना दांडेकर

**संपादकीय पत्रव्यवहार**
विनायक श्रीधर देशपांडे
'श्रीकमल', 48 विद्या-विहार
प्रतापनगर, नागपूर - 440022
दूरध्वनी क्र.(95712) 2237042

## अनुक्रमणिका


- संपादकीय
  विनायक देशपांडे ........ 287
- ग्रामीण विकास - मानवी व नैसर्गिक संसाधनाधिष्ठित विकास प्रतिमान
  सर्जेराव ठोंबरे ........ 289
- आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिद्धांत - एक सिंहावलोकन (लेखांक 2 - उत्तरार्ध)
  सु. गो. भानुशाली ........ 309
- सामाजिक निवडी संदर्भात एक वेचक साहित्य सर्वेक्षण
  संतोष बबनराव यादव ........ 331
- एकोणतिसावे वार्षिक अधिवेशन : अहवाल
  माधव दातार / बी. एस. म्हस्के / रामदास य. माहोरे / विनायक देशपांडे / चारुदत्त गोखले ........ 338
- तिसावे वार्षिक अधिवेशन : विषयांची रूपरेषा
  निरज हातेकर / मेधा देशपांडे / दि. व्यं. जहागिरदार ........ 364

## मराठी अर्थशास्त्र परिषद
## कार्यकारी मंडळ (2005-06)


● अध्यक्ष
सर्जेराव ठोंबरे (औरंगाबाद)

● कार्याध्यक्ष
ज.फा. पाटील (कोल्हापूर)

● कार्यवाह, खजिनदार
चारुदत्त गोखले (जळगाव)

● प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'
विनायक श्रीधर देशपांडे (नागपूर)

● सदस्य
1 रवीन्द्र जोशी (नागपूर)
2 राम देशमुख (नांदेड)
3 दिनकर टकले (जालना)
4 केशव घोरूडे (ठाणे)
5 सुभाष दगडे (सांगली)
6 बबन आदिक (अहमदनगर)
7 हिरालाल चव्हाण (जळगाव)
8 वसंत पाटील (जळगाव)
9 राजेन्द्रकुमार गव्हाळे (बुलढाणा)
10 जगन्नाथ पाटील (सातारा)
11 श्रीराम जोशी (जळगाव)
12 मनिषा काकडे (पुणे)



● अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार :
1) भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली.
2) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
(टिप : म. रा. सा.सं. मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असतीलच असे नाही.)


● **कार्यालयीन पत्रव्यवहार**
(वर्गणी व जाहिरात पाठविणे, सदस्यत्वाची नोंदणी करणे, आणि अर्थसंवाद वितरणाविषयी)


**चारूदत्त गोखले**
कार्यवाह-खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
'अक्षय' प्लॉट नं. 10, प्रोफेसर्स कॉलनी,
जिल्हा उद्योग केंद्राचे मागे, जळगाव - 425001
(दूरध्वनी : 95257 - 2252375)


**परिषदेचे प्रमुख कार्यालय**


● मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेंज, एम.एन.रॉय ह्यूमन डेव्हलपमेंट कॅंपस, फ्लॅट क्रमांक 6 'एफ' ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूल जवळ, सरकारी वसाहत इमारत क्र. 323 समोर, बांद्रे(पूर्व), मुंबई 400 051


### वर्गणी

| | |
|---|---|
| अ) परिषदेचे सदस्य | |
| ● आजीव सदस्य | : रु. 1200 (एकरकमी) |
| ● साधारण सदस्य | : रु. 250 (वार्षिक) |
| आ) संस्था सदस्य : | |
| ● शैक्षणिक संस्था | : रु. 250 (वार्षिक) |
| ● व्यावसायिक संस्था | : रु. 250 (वार्षिक) |
| इ) अर्थसंवाद वर्गणीदार | |
| ● ग्रंथालये | : रु. 250 (वार्षिक) |
| ई) वर्षगणना | : 1 एप्रिल ते 31 मार्च |

● परिषदेच्या सदस्यांना अर्थसंवाद त्यांच्या वर्गणीतच दिला जातो.

● कृपया वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्ट ने 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने कार्यवाहांकडे पाठवावी. संपादकांकडे पाठवू नये. रीतसर पावती कार्यवाहांमार्फतच प्राप्त होईल.

संपादकीय

## जॉन केनेथ गालब्रेथ - महान विचारवंत काळाच्या पडद्याआड

भारताचे अमेरिकेतील भूतपूर्व राजदूत आणि जगविख्यात अर्थतज्ज्ञ जॉन केनेथ गालब्रेथ यांचे शनिवार दि. 29 एप्रिल 2006 रोजी वयाच्या 97 व्या वर्षी दु:खद निधन झाले. हार्वर्ड विद्यापिठातील 'मानद प्राध्यापक' हे पद त्यांनी अनेक वर्षे भूषविले. 1961 ते 1963 या दरम्यान गालब्रेथ हे भारतात अमेरिकेतील राजदूत होते. त्यांनी लिहिलेल्या 33 ग्रंथांपैकी 'The Affluent Society' हा ग्रंथ आगळ्या वेगळ्या स्वरूपाचा होता. अतिशय क्लिष्ट विषयावर त्यांनी सहजतेने लिखाण केले.संपन्न समाज (The affluent society), संकेतमान्य चातुर्य (Conventional Wisdom)व प्रतिप्रभावी शक्ति (Countervailing Power) या त्यांनी मांडलेल्या संकल्पना सर्वमान्य झाल्या.

गालब्रेथ यांचा जन्म कॅनडाच्या ओन्टारिओ प्रांतातील आयओना स्टेशन येथे झाला. ओन्टारिओ येथील कृषी महाविद्यालयात त्यांनी 1931 साली अर्थशास्त्राचे शिक्षण घेण्यास प्रारंभ केला. त्यानंतर कॅलिफोर्निया विद्यापीठातून त्यांनी आचार्य ही पदवी प्राप्त केली. 1937 साली त्यांनी अमेरिकेचे नागरिकत्व स्वीकारले. 1948 साली हार्वर्ड विद्यापीठात अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून गालब्रेथ रूजू झाले. किंमत नियंत्रणाचा सिद्धांत त्यांनी 1950 साली मांडला. भाव फुगवट्याच्या विरोधात धोरणे आखण्याची आवश्यकता, त्यांनी या सिद्धांताद्वारे विशद केली.

अमेरिकेतील भांडवलशाही (American Capitalism) या त्यांच्या ग्रंथात त्यांनी असा युक्तिवाद मांडला की, अमेरिकेतील युद्धोत्तर यशस्वीता, किंमती योग्य ठेवण्यामुळे प्राप्त झाली नाही, तर किंमती दोषपूर्ण ठेवल्यामुळे प्राप्त झाली. याचबरोबर उद्योगांचे केंद्रिकरण झाल्याने देखील अर्थव्यवस्था यशस्वीरित्या विकसित झाली.वृद्धीचे हेच सूत्र आहे, कारण यामुळे तांत्रिक नवप्रवर्तनाला वाव मिळतो. केंद्रिकरणामुळेच हे शक्य होते असे मत गालब्रेथ यांनी व्यक्त केले. परंतु हे सूत्र सुचवितांना त्यांनी असे देखिल निदर्शनास आणून दिले की, खऱ्या अर्थाने ही यशस्वीता साधावयाची असेल तर प्रतिप्रभावी शक्ति उभी करणे आवश्यक राहील. कामगार चळवळ, पुरवठा करणारे आणि ग्राहक यांच्या संघटना तसेच शासकीय विनियमन या माध्यमाने अशी प्रतिप्रभावी शक्ति उभी करता येईल. आज जागतिकीकरणाचे परिणाम जगातील विकसनशील राष्ट्रे अनुभवीत आहेत. त्यांना गालब्रेथ यांचे हे प्रतिपादन अर्थपूर्ण वाटेल.

आधुनिक औद्योगिक उत्पादन ही मोठ्या प्रमाणावर चालणारी प्रक्रिया असल्याने याला नियोजनाची आवश्यकता असते आणि नियोजनासाठी स्थिरता ही पूर्व अट असल्याने बाजाराचे विनियमन करणे अनिवार्य असते. असा युक्तीवाद गालब्रेथ यांनी केला होता. गालब्रेथ यांच्या प्रयत्नाने इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, कानपूर येथे पहिल्यांदा संगणक विज्ञान विभागाची स्थापना झाली. भारताचा सच्चा मित्र आणि अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेचे परखड टीकाकार जॉन केनेथ गालब्रेथ यांना मराठी अर्थशास्त्र परिषदे तर्फे विनम्र श्रद्धांजली.

# अर्थसंवाद या त्रैमासिकाच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन
## (फार्म 4, नियम 8 नुसार)

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | प्रकाशन स्थळ | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/चारूदत्त गोखले 'अक्षय', प्लॉट नं. 10, प्रोफेसर्स कॉलनी, जिल्हा उद्योग केन्द्राच्या मागे, जळगाव. 425001 |
| 2. | नियतकाल | : | त्रैमासिक |
| 3. | मुद्रकाचे नाव | : | चारूदत्त गोखले |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | 'अक्षय', प्लॉट नं. 10, प्रोफेसर्स कॉलनी, जिल्हा उद्योग केन्द्राच्या मागे, जळगाव. 425001. |
| 4. | मुद्रण स्थळ | : | श्रीनिवास मुद्रणालय, धंतोली नागपूर - 440012. |
| 5. | प्रकाशकाचे नाव | : | बाब क्र. 3 प्रमाणे |
| 6. | संपादकाचे नाव | : | डॉ. विनायक श्रीधर देशपांडे |
| 7. | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | 'श्रीकमल', 48 विद्या-विहार, प्रताप नगर, नागपूर -440022. |
| 8. | मालकाचे नाव | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/सेंटर फॉर दि स्टडी ऑफ सोशल चेंज, एम.एन. रॉय ह्यूमन डेव्हलपमेंट कँपस, फ्लॅट 6, ब्लाक 'एफ', कार्डिनल ग्रेशियस शाळेजवळ, सरकारी वसाहत इमारत क्र. 323 समोर, बांद्रे (पूर्व), मुंबई 400 051. |

मी चारूदत्त गोखले, असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहिती आणि समजुतीनुसार खरा आहे.

**चारुदत्त गोखले**
मुद्रक व प्रकाशक

# ग्रामीण विकास :मानवी व नैसर्गिक संसाधनाधिष्ठित विकास प्रतिमान

✦ सर्जेराव ठोंबरे, औरंगाबाद.

*प्राचार्य, श्री संत सावतामाळी ग्रामीण महाविद्यालय,*
*फुलंब्री जि. औरंगाबाद*

आपण, माझी परिषदेच्या 29 व्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदी निवड केली,त्याबद्दल मी प्रथमत: आपले शतश: ऋण व्यक्त करतो. अधिवेशन बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या प्रांगणात होत आहे, याचा विशेष आनंद आहे. ग्रामीण भागात; परंतु सर्व विकास मानकांची जिथे परिपूर्ती झाली आहे, अशा परिमंडळात आपण अर्थशास्त्राच्या चिंतनातून विकास वाटा शोधण्यासाठी येथे संमीलित झालो आहोत. मी आपले सर्वांचे हार्दिक स्वागत करतो.

योगायोग असा की मी स्वत: शेतकरी कुटुंबातील असून ग्रामीण भागातच कार्यरत आहे. ग्रामीण विकासाच्या बहुआयामी पैलूंची गुंतागुंत मी जवळून अनुभवत आहे. त्याची काही उकल करण्याचा प्रयास, संस्थात्मक व व्यक्तिगत पातळीवरून करत असतांना, काही विचार सूत्रे त्या-त्या वेळी मांडली. या सर्व अनुभवसिद्ध विचार सूत्रांचे संकलन आज अर्थशास्त्राचा एक अभ्यासक म्हणून आपल्या समोर सादर करीत आहे.

आज ग्रामीण विकासाच्या चिंतनाला नवीन आयाम प्राप्त झाले आहेत. आपले राष्ट्रपती ए.पी.जे अब्दुल कलाम यांनी जगात एक महासत्ता म्हणून भारत पुढे येण्याच्या मार्गांची व्यापक चर्चा सुरू केली आहे[1]. त्यात स्वाभाविकच ग्रामीण जनतेच्या सहभागाला विशेष महत्त्व आहे. माहिती-तंत्रज्ञान व जैव-तंत्रज्ञान हे 21 व्या शतकाच्या पूर्वार्धातील मानवी जीवनमान विकासाचे प्रमुख आधार असणार आहेत, हे ही आता स्पष्ट झाले आहे. यात ग्रामीण जनतेचे स्थान कुठे असणार ? त्यांच्या सहभागाची व्याप्ती किती व स्वरूप कसे असणार आहे ? याचा वेध घ्यावा लागणार आहे.

**1.1** मूलत: भारत हा ग्रामीण व्यवस्था प्रधान देश आहे. प्राचीन काळात उदरनिर्वाहासाठी भटकंती करणारा समाज वस्ती करून राहू लागल्यापासून ग्रामजीवनाला प्रारंभ झाला. कृषी आधारित जीवन पद्धतीने त्याला स्थिरता दिली त्यातून गावठाण व शिवाराचे आकार लोकवस्तीच्या आधारे निश्चित होत गेले. इ.स. पूर्व चौथ्या शतकातील प्रसिद्ध कौटिलीय अर्थशास्त्रानुसार गावाचा आकार ठरविताना 100 ते 500 घरांची मर्यादा घालण्यात आलेली होती[2]. दोन गावातील अंतर व शिवाराचा आकारही निश्चित करण्यात येत असे. दहा गावांचे एक संग्रहण अशी ती रचना होती. उन्नत जीवनमानासाठी आधारभूत असणाऱ्या सर्व अंगांचा विचार त्या काळात अत्यंत प्रगल्भ अवस्थेत तर होताच, शिवाय अमलबजावणीसाठी तितकीच काटेकोर प्रशासकीय व्यवस्थाही होती. शेती व्यवस्थापन, सिंचन, पीकपद्धती, कुरण विकास, संवर्धन व चराई, पशुधन व्यवस्थापन इत्यादींच्या वापराबाबत काटेकोर नियम केलेले होते. आजच्या अर्थशास्त्रात मांडल्या जाणाऱ्या उत्पादन, विभाजन व उपभोग इत्यादी बाबत प्राचीन भारतातील जनजीवनात कसे संतुलन राखले जात होते याचे दर्शन घडते. मनुष्य हा विकास नीतिचे कारण तर आहेच, परंतु प्रथमत: मनुष्यच सर्व विकासाचा आधार आहे. हे लक्षात घेऊन त्याचे व्यक्तिगत व सार्वजनिक वर्तन सामाजिक व आर्थिक जीवनाला पोषक बनविण्यासाठी अनुरूप शिक्षण व्यवस्था व दंडसंहिताही अस्तित्वात होती.

**1.2** भारतात ब्रिटिश राजवट सुरू होईपर्यंत प्राचीन ग्रामीण जीवन व्यवस्था कालौघात काही परिवर्तन स्वीकारित असली तरी अबाधित होती. स्वायत्त व स्वावलंबी ग्रामजीवन हे या समाजाचे शक्तिस्थान आहे हे इंग्रज राज्यकर्त्यांनी ओळखले होते. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक जीवनमानाची, कालौघात स्थिर झालेली ही सुदृढ भारतीय ग्रामीण संरचना खिळखिळी केल्याशिवाय ब्रिटिश राजवटीचे बस्तान बसणार नाही, हे जाणून त्यांनी या व्यवस्थेला योजनापूर्वक उध्वस्त केले.

ज्ञान-विज्ञान, तंत्रज्ञान याबाबत भारतीय जनता अनभिज्ञ आहे, असा भ्रामक प्रचार करून भारतीय समाजाचा तेजोभंग केला गेला. राष्ट्रीय अस्मितेचा विसर पडून पाश्चात्त्य विकास मानकांचा गुणगौरव करणाऱ्या भारतीय वंशाच्या विचारवंतांची फळी निर्माण करण्यात इंग्रज कमालीचे यशस्वी झाले. कालौघात भारतीय जीवनप्रणालीत निर्माण झालेल्या दोषांचीच प्रभावी मांडणी व वारंवार उजळणी करून गोबेल नीतिचा अवलंब करण्यात आला.

**1.3** भारतीय समाजाच्या पारंपरिक कर्तृत्व शक्तिवर स्थानिक ब्रिटिश निर्मित विचारवंतांच्या मार्फत होत असलेले प्रखर प्रहार करण्याचा धूर्त डाव महात्मा गांधींनी ओळखला होता. त्यांनी 1909 साली 'हिंद स्वराज' हा ग्रंथ लिहून त्यात इंग्रजांच्या या कुटील डावाचा तीव्र शब्दात प्रतिवाद केला[3]. भारतीय सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक जीवनाचा पारंपरिक धागा तोडण्याच्या नीतिला त्यांनी वैचारिक पातळीवर प्रखर विरोध केला. स्वातंत्र्य चळवळीला या विचारांची पार्श्वभूमी तयार करून म. गांधींनी स्वावलंबन, स्वदेशी, आत्मनिर्भरता, अहिंसा, श्रमप्रतिष्ठा, ग्राम विकास इत्यादी तत्त्वांच्या आधारे असहकार आंदोलन देशव्यापी केले होते.

महात्मा गांधींनी एकात्मिक मानवी जीवनाचा विचार केला होता. राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक असे कप्पे करून मानवी विकासाला कधीच पूर्णत्व प्राप्त होऊ शकणार नाही हा त्यांच्या विचाराचा गाभा होता. कप्पेबंद पाश्चात्य

विकास नीति, पूर्णत: नाकारून 'एकात्म मानव जीवन' या भारतीय विचारधारेच्या आधारे त्यांनी विकास प्रतिमान मांडले.

## 2. विकास प्रतिमान

### 2.1. मिश्र अर्थव्यवस्था

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपल्या देशाला सुयोग्य ठरेल असे विकास प्रतिमान स्वीकारण्याबाबत व्यापक चर्चा झाली. अंतिमत: पाश्चिमात्य देशात रूजलेली भांडवलशाही व सोव्हिएत रशिया मध्ये त्याकाळी प्रतिष्ठित पावलेला मार्क्स प्रणित साम्यवाद यातील गुणांचा समुच्चय करून मिश्र अर्थव्यवस्थेचे प्रतिमान आपण स्वीकारले. स्पर्धा, बाजार किंमत तंत्र व शासकीय हस्तक्षेप यांचा मेळ घालत आपण 1990 पर्यंत वाटचाल केली. सार्वजनिक क्षेत्राचा विस्तार, खाजगी क्षेत्रांवर नियंत्रणे, बहु आयामी मोठे व केंद्रित उद्योग, त्याला पूरक नागरीकरणाचा न पेलणारा विस्तार होत गेला.

शिक्षण,आरोग्य, पिण्याचे शुद्ध पाणी, सांडपाण्याचा निचरा, जीवन व वित्त सुरक्षा इत्यादी सामाजिक पायाभूत सुविधा, सिंचन, विद्युत पुरवठा, रस्ते इत्यादी आर्थिक पायाभूत सुविधांची निर्मिती, विस्तार व देखभाल - दुरूस्ती बाबत ग्रामीण भागाला नागरी भागाच्या तुलनेत दुय्यम स्थान मिळत गेलेले आहे. जागतिक मानव विकास अहवाल इ.स. 2000, तसेच भारत सरकार व महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केलेल्या मानव विकास अहवालानुसार ग्रामीण जनतेसाठी उपलब्ध असलेल्या पायाभूत सेवांची व्याप्ती किती अपुरी आहे याची कल्पना येते[1]. ज्या सुविधा आहेत त्यांची देखभाल व दुरूस्ती या बाबत ग्रामीण भागात तर कमालीची हेळसांड जाणवते. पायाभूत सुविधांची निर्मिती झाल्यानंतर त्यात सातत्य राखून गुणवत्ता टिकविण्यात स्थानीय संस्थांची कमालाची उदासिनता, लाभधारकांचा तटस्थपणा यामुळे मानवी जीवनमान विकासात अपेक्षित सुधारणा घडून येतांना दिसत नाही.

ग्रामीण जीवनाला पूरक घरगुती व हस्त उद्योगातून स्थानीय सामग्रीवर आधारित निर्माण होणाऱ्या रोजगाराचा ऱ्हास स्वातंत्र्योत्तर काळातही होत राहिला. आर्थिक विकेंद्रीकरणाचे धोरण लुप्त झाले. विकेंद्रित लघु व घरगुती प्रक्रिया उद्योग क्षीण झाल्याने ग्रामीण जनता विकास प्रक्रियेच्या लाभापासून वंचित राहिली. परिणामी ग्रामीण समाज नागरी भागात मोठ्या प्रमाणात स्थलांतरित होत आहेत. (पहा तक्ता : 1, स्तंभलेख : 1 व 2) विसावे शतक जणुकाय भारताचे नागरीकरण करणारे शतक होते असे आकडेवारीवरून दिसते. 1901 साली भारत व महाराष्ट्रात अनुक्रमे 20.80 टक्के व 16.59 टक्के लोकसंख्या नगरात रहात होती, हे प्रमाण वाढून 2001 साली अनुक्रमे 27.80 टक्के व 42.43 टक्के झालेले दिसते. हा वेग असाच चालू राहिला तर त्याचा विपरीत परिणाम अर्थव्यवस्थेवर अधिक तीव्र होत जाईल.

ग्रामीण भागात अंदाजपत्रकीय व नियोजित गुंतवणूक होत असली, तरी त्यातून मागणीजन्य उत्प्रेरित गुंतवणुकीत वृद्धी होत नाही. ग्रामीण भागात उत्पन्न गुंतवणूक लवचिकता कमीच रहात आली. त्याची प्रमुख कारणे -

1. ग्रामीण भागात निर्माण होणारे उत्पन्न , नागरी भागाकडून पुरविल्या जाणाऱ्या वस्तू व सेवांवर खर्च होत असते. परिणामी रोजगार निर्मितीचा गुणक परिणाम नागरी भागास अनुकूल ठरत आहे.

2. बाजार यंत्रणेवर आधारित अर्थव्यवस्थेत व्यापारशर्ती नेहमी आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या समाज घटकांना प्रतिकूल असतात. म्हणून ग्रामीण भागाची क्रयशक्ती नागरी भागापेक्षा नेहमीच कमी राहिली आहे.

3. स्वातंत्र्योत्तर काळात, ग्रामीण भागात शासकीय योजना राबविण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रशासकीय नोकरदार वर्ग नेमला गेला. शिक्षण, आरोग्य, कृषी, महसूल व ग्रामीण प्रशासन, बँका, पतपेढ्या, वीजपुरवठा इत्यादी सुविधा पुरविणारा मोठा अधिकारी व कर्मचारी वर्ग आज ग्रामीण भागात आहे. परंतु यापैकी कोणीही (काही अपवाद आहे) खेड्यात राहात नाही. या गुंतवणुकीचा परिणाम नागरी भागात रोजगार निर्मिती होण्यात झाला.

4. ग्रामीण निरक्षरता, भाबडेपणा, आर्थिक व सामाजिक दुर्बलता यामुळे ग्रामीण जनतेचे प्रशासकीय वर्गाकडून शोषण होते. याचाही नकारात्मक परिणाम 'ग्रामीण रोजगार निर्देशांका' वर नेहमी होत आला आहे. यामुळे अर्थव्यवस्थेतील 'अंगभूत त्वरणित' विकासाच्या लाभापासून ग्रामीण जनता या 'विकास प्रतिमानात' वंचित राहिली आहे.

ग्रामीण विकेंद्रित समाज, विखुरलेला कृषी व्यवसाय, त्यातही सिमांत व अल्प भूधारकांचा अधिक समावेश[5], निरक्षरतेचे असलेले चिंताजनक प्रमाण, ही वैशिष्ट्ये लक्षात घेऊन ग्रामीण जनता उत्पादन क्षमता, ग्रामीण कारागिरी व उपलब्ध निसर्ग संसाधने विचारात घेऊन देशीय विकास प्रतिमानाबाबत म. गांधी व त्यांचे अनुयायी आग्रही राहिले आहेत.

आज उपलब्ध असलेली माहिती व तंत्रज्ञान,जैविक तंत्र, जागतिकीकरणाची नवीन रचना, जीवन विषयक बदललेल्या संकल्पना या सर्वांचा विचार करून नव-गांधीवादी विकास प्रतिमान स्वीकारण्याची गरज आहे.

**2.2 ग्रामीण रचनेचे बदलते स्वरूप**

ग्रामीण रचनेचे गावठाण व शिवार हे प्रामुख्याने दोन भाग पूर्व परंपरेने चालत आले आहेत. गावठाणात वस्ती करून ग्रामीण समाज राहतो, यालाच गावगाडा असेही म्हणतात. ज्यात परस्पर पूरक सेवा व उपभोगाच्या वस्तू निर्माण करणारी कुटुंब, संरक्षण व ग्राम प्रशासन व्यवस्था चालविणारा वर्ग अशा सर्वांचा समावेश त्यात होतो.

शिवाराची विभागणी 1) शेती खालील क्षेत्र, 2) कुरण क्षेत्र, व 3) जंगल व्याप्त क्षेत्र अशी तीन भागात करण्यात येते[6].कालांतराने लोकसंख्येचा आकार वाढत गेल्याने शेतीखालील क्षेत्र वाढत गेले व कुरणाखालील व जंगल व व्याप्त क्षेत्रांचा संकोच होत जाऊन, आज ते नाममात्र शिल्लक आहे. शेती क्षेत्राचा विस्तार होत गेल्याने शेतजमिनीचे गावठाणापासून अंतर 3 ते 5 कि.मी. पर्यंत वाढत गेले. पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम, जल व भूसंवर्धनाच्या योजना, नालाबंध, पाझर तलाव, लघु तलाव व सिंचन व्यवस्थांच्या विकासातून जिथे पाणी उपलब्ध झाले, रस्ता व विजेची सोय झाली अशा क्षेत्रातील शेतकरी कुटुंब आज मोठ्या प्रमाणात शेतावर वस्ती करून राहत आहेत. भांडवल गुंतवणूक, नव-नवीन तंत्राचा अवलंब व सधन शेतीचे विकसित होत असलेले तंत्र या सर्वांचा कार्यक्षमतेने उपयोग करून घेण्यासाठी ही बदलणारी ग्रामरचना अधिक गतीमान करण्याची गरज आहे. म्हणून आता, शेतापर्यंत रस्ता, पिण्याचे पाणी, वीजपुरवठा, संदेश वहन या पायाभूत सुविधा पुरविण्याची व्यवस्था करावयास हवी.

उपलब्ध शेतजमीन, पर्जन्यमान व जलसंसाधन, पशुधन, झाड-झाडोरा इत्यादी निसर्ग संसाधनाच्या चक्रीय उपलब्धतेचा विकास, संवर्धन व पर्याप्त उत्पादनासाठी ज्ञान-विज्ञान, तंत्रज्ञानाचा वापर व भांडवली गुंतवणूक करावी लागत आहे. 'कृषी' हा उद्योग समजला जावा, अर्थात त्याला उद्योग व्यवसायाचे आर्थिक निकष लागू व्हावेत असे

सतत मांडले जाते. याचा अर्थ कृषी क्षेत्रातही निविष्टी-उद्दिष्टी (Input-output) प्रमाण व त्यातून मिळणारा आर्थिक लाभ हा पूर्वनिश्चित असावा. निसर्गाच्या चक्रीय अनिश्चिततेचे अनुमान बांधून कृषी उत्पादनातील विचलनावर मात करता यावी. विचलन गुणक किमान ठेवण्यासाठी शेतकरी कुटुंबांनी 'काम तिथे निवास' व 'निवास तिथे काम' हे सूत्र स्वीकारले आहे. ग्रामीण विकास नीति आखत असताना ग्रामीण आर्थिक विकासाला आधारभूत ठरणारी ही द्रुतगतीने बदलत असलेली 'ग्रामीण समाज संरचना' विचारात घ्यावयास हवी. 'शेत' एक उत्पादन एकक आहे. या निवास रचनेमुळे वर्षभर प्रतिदिनी बदलणाऱ्या पर्यावरणीय घटकांनुसार घ्यावे लागणारे निर्णय व करावी लागणारी उपाययोजना यातील कालविलंब टाळला जातो. तसेच उपलब्ध श्रमशक्ती व नैसर्गिक संसाधनाचा पर्याप्त वापर होण्यास मदत होते. यातून शेतकरी कुटुंबाच्या उत्पादन क्षमतेत वाढ होत असून आर्थिक स्थैर्य प्राप्त होते.

गावठाणात आता प्रामुख्याने गावठाणालगत शेतजमीन असलेली शेतकरी कुटुंबे व ग्राम जीवनाला पूरक असलेल्या सेवा पुरविणारी कुटुंबेच राहतात. म्हणून आता ग्रामविकासाचे प्रतिमान मांडतांना हा होत असलेला संरचनात्मक बदल लक्षात घ्यावयास हवा.

### 2.3 नव गांधीवादी प्रतिमान

स्वदेशी, स्वावलंबन, सहकार, विकेंद्रीकरण, विश्वस्त संकल्पना, समानता, शारीरिक श्रम, नई तालीम (जीवनाभिमूख उपक्रमशीलता विकसित करणारे शिक्षण)[7], पंचायत राज, या मूलतत्त्वांच्या आधारे सर्वांना सन्मानपूर्वक जीवन जगण्याची संधी देणारे मानव केंद्रित विकास प्रतिमान म. गांधींना अभिप्रेत होते. गांधीजींच्या विकास नीतित मानवी संसाधनाला अग्रस्थान आहे. 'मानव' हाच विकासाचा प्रमुख आधार आहे, व त्याच्यासाठीच 'विकास' हवा आहे. म्हणून केवळ उत्पादनाला महत्त्व नाही, तर त्याच्या न्यायोचित वितरणाला महत्त्व आहे. विकास प्रक्रियेत गांधीजींच्या अर्थनीतित शोषण, संपत्तीचे संकेंद्रण उपभोग लालसेचे समर्थन इत्यादींना स्थान नाही. नैसर्गिक संसाधनांशी मानवी जीवनमानाच्या सुसंवादी वर्तनातून शाश्वत मानवी जीवन विकासक्रम पिढ्यानूपिढ्या सुखेनैव गतिमान राहण्याची हमी आहे. हाच तर महात्मा गांधींना अभिप्रेत असलेला 'सर्वोदय' आहे.

माहिती तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञानाचा वेगाने होत असलेला विकास व जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर भारतीय अर्थव्यवस्थेसाठी ग्राम व ग्राम समुच्चय हाच विकासाचा घटक मानून भारतीय जीवभौतिकीशी सुसंगत 'विकास प्रतिमान' स्वीकारावे लागेल. त्यालाच 'नव-गांधीवादी विकास प्रतिमान' असं म्हणता येईल.

नव-गांधीवादी विकास प्रतिमानात वर्तमान जनतेस सन्मानपूर्वक जीवनमान जगण्याच्या समान संधी उपलब्ध होत असतांना येणाऱ्या पिढ्यांच्या जीवनमानावर विपरीत परिणाम होणार नाही, या मर्यादा सांभाळून नैसर्गिक संसाधनाच्या वापराच्या पद्धती व तंत्र अपेक्षित आहे. उपेक्षित, मागास, वनवासी, ग्रामवासी अशा सर्व समाज घटकांना समान विकासाची संधी देणारी 'आत्मनिर्भर', अत्याधुनिक ग्राम संरचना निर्माण करावी लागेल. यांचे आधार पुढील प्रमाणे असावेत[9]

1. ज्ञान, माहिती तंत्रज्ञान संपन्न ग्रामीण समाज.

2. ग्रामीण कारागिरी, घरगुती उद्योग, लघुउद्योगांचा पायाभूत मोठ्या उद्योगांशी समन्वयीत

विकास.(ज्यात श्रमशक्तीला प्राधान्य असेल.)

3. कृषी, जंगल मासेमारी व उत्पादनांवरील प्रक्रिया उद्योग विकेंद्रित स्वरूपात ग्राम व ग्रामसमूहांतर्गत चालतील.

4. खात्रीशीर व पुरेसा विद्युत पुरवठा.

5. सर्वांसाठी 'जीवन शिक्षण' व 'निरामय निरोगी' जीवनमान व्यवस्था.

6. उपलब्ध निसर्ग संसाधनाचे शोषण नव्हे, तर दोहन.

7. मानवी जीवनमान प्रामुख्याने पुनर्नविकरणीय संसाधनावर आधारित असावे.

8. पूर्ण श्रम शक्तीचा सन्मानपूर्व वापर.

या सहस्रकाला शाश्वत विकासाबरोबर सन्मानित जीवनमानाची हमी द्यावयाची आहे. भारतात, तर अद्यापही 20 टक्के जनता दारिद्र्यरेषेखाली आहे (पहा तक्ता : 02) दारिद्र्य रेषेवरील 70-80 टक्के जनतेच्या जीवमानाचा दर्जाही सामान्य आहे. यावर मात करण्यासाठी ग्रामीण भागात नागरी भागाला पुरविल्या जाणाऱ्या सुविधा निर्माण कराव्या लागतील. दर्जेदार रस्ते, कार्यक्षम दूरसंचार सुविधा, संगणक, त्या इंटरनेट जोडणीद्वारे अद्ययावत माहिती संकलन व विश्लेषण केंद्र चालविण्याची क्षमता स्थानीय युवकात निर्माण करावी लागणार आहे.

'खेड्याकडे चला' हा गांधीजींचा संदेश होता, परंतु झाले उलटेच. ग्रामीण भागातून नगरांकडे लोकसंख्येच्या स्थलांतराने नागरी विकासाच्या न संपणाऱ्या समस्या निर्माण होत आहेत, तर दुसऱ्या बाजूला ग्रामीण भागातील बौद्धिक संपदेचा ओघ नगरांकडे वाढत आहे. बौद्धिक व सांपत्तिक स्थितीत सरस असलेला माणूस आज ग्रामीण भागात राहण्यास तयार नाही. ग्रामीण जनतेच्या शोषणातून नागरीकरणाची प्रक्रिया वेगाने घडून येत आहे असे वाटले. ''ब्रिटिशांना भारताच्या शोषणासाठी नगरे सुलभ माध्यम आहे असे वाटले . ब्रिटिश काळातील या स्थितीने आज अधिक रूद्र स्वरूप धारण केले आहे. यातून ग्रामीण भागातील सामाजिक, आर्थिक जीवनमान धोक्यात आले आहे. आर्थिक विकासाचे अंतिम फायदे आर्थिक व प्रशासकीय धोरणांमुळे नागरी भागाकडे खेचले जातात. त्यासाठी ग्रामाभिमुख आर्थिक धोरण व प्रशासकीय संरचनेत बदल करून त्याची कठोर अमलबजावणी करावी लागेल. त्यात प्रथमत: ग्रामीण भागातील देश-काल-परिस्थिती अनुरूप 'मनुष्यबळ विकास' योजना करावी लागेल.

### 3. मनुष्यबळ विकास

3.1 भारतात विविध व्यवसायात काम करणाऱ्या कामगारांपैकी सर्वाधिक श्रमिक कृषी व प्राथमिक क्षेत्रात काम करतात.(पहा, तक्ता : 03)75.81 टक्के श्रमशक्ती ग्रामीण भागात विखुरलेली आहे. यात 26.36 टक्के प्रमाण महिला श्रमिकांचे आहे. उत्पादन प्रक्रियेत या प्रचंड श्रमशक्तीच्या फलदायी सहभागाशिवाय राष्ट्राच्या समृद्धीचा विचारच अशक्य आहे. याबाबत कोणाचे दुमत नाही. भारताचा विकास म्हणजे ग्रामीण भागाचा विकास व ग्रामीण भागाचा विकास म्हणजे मनुष्यबळाचा विकास, या विकास सूत्राच्या अंमलबजावणीतच भारताची समृद्धी सामावलेली आहे.

भारतात आजही श्रमिकांचा शैक्षणिक स्तर चिंताजनक आहे. ग्रामीण भागात तर ही स्थिती भयावह आहे. 1999-2000 साली ग्रामीण भागात काम करणाऱ्या एकूण पुरूष श्रमिकांपैकी 39.6 टक्के निरक्षर होते ; श्रमिक महिलांपैकी 73.9 टक्के निरक्षर होत्या. नागरी भागात हेच प्रमाण अनुक्रमे 16 व 44

टक्के होते. (पहा तक्ता : 04) श्रमिकांमध्ये शालेय व उच्च शिक्षणाचे अत्यल्प प्रमाण व निरक्षरांचे प्रमाण जास्त असल्याने त्यांची उत्पादन क्षमता उंचावण्यात मोठा अडथळा आहे. 'माणूस' हा उत्पादन संसाधन आहे, याकडे दुर्लक्ष करणे म्हणजे मनुष्य बळाचा अपव्यय होय.

मनुष्यबळाच्या विकासाचा विचार करताना दोन पातळीवर करावा लागेल.

1. सामाजिक सौहार्द, सहजीवन, राष्ट्रभक्ती, घटनादत्त अधिकार व कर्तव्यांविषयी जाणीव, न्याय व बंधुभावाबाबत जीवन दृष्टी निर्माण करणारे संस्कारक्षम शिक्षण.

2. प्रत्येकाला शिक्षणाच्या प्रक्रियेत स्वत:चा 'योगक्षेम'-उदरनिर्वाह चालविण्याची क्षमता सहज विकसीत करणारे शिक्षण दिले जावे.

तत्वज्ञान, नैतिक व विविध शास्त्रांच्या अभ्यासाने समाजाच्या समजूतीची पातळी उंचावून जीवन स्तर उंचावण्यास मदत होत असते. त्याला आर्थिक सक्षमतेची जोड मिळाल्यास व्यक्तिस्वातंत्र्य अनुभवास येत असते. म्हणूनच शिक्षणाच्या हमी बरोबरच 'योगक्षेम हमी' प्राप्त व्हावी.

दारिद्र्य निर्मूलन, रोजगार निर्मिती विकासाच्या समान संधी, आरोग्यदायी जीवन, सकस आहार योजना व शाश्वत मानवी विकासासाठी अनुकूल सामाजिक वातावरण निर्माण करण्यात प्राथमिक शिक्षणाचे महत्त्व अनन्य साधारण आहे.म्हणूनच 2015 पर्यंत 'सर्व बालकांना शिक्षण' हे या सहस्त्रकाचे प्रमुख उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे.

### 3.2 शालेय शिक्षण

ग्रामीण शिक्षण व्यवस्था आजही अत्यंत तकलादू आहे. 14 वर्षे वयापर्यंतच्या मुला-मुलींना मोफत व सक्तिच्या शिक्षणाचा मूलभूत अधिकारात समावेश करण्यात आला असूनही दहाव्या पंचवार्षिक योजने अखेर सर्वांना शिक्षण देण्याची योजनाही आखली गेली. सर्वशिक्षण अभियाना सारखे व्यापक अभियानही राबविण्यात येत आहे. परंतु आजही ग्रामीण भागात सर्वांना गुणवत्ताधिष्ठीत सर्वांगीण 'जीवन शिक्षण' उपलब्ध होण्याचे स्वप्न दूर आहे. 2001 च्या जनगणनेनुसार भारतात 34.62 टक्के, जवळपास 35 कोटी भारतीय समाज निरक्षर आहे. बिहार, झारखंड, मध्यप्रदेश, छत्तीसगड, ओरिसा, राजस्थान सारख्या राज्यातील साक्षरतेचे प्रमाण 47 ते 64 टक्क्यापर्यंतच आहे.

महाराष्ट्रासारख्या तुलनेने प्रगत असलेल्या राज्यात नंदूरबार, गडचिरोली व जालना सारख्या आदिवासी बहुल जिल्ह्यात साक्षरतेचे प्रमाण 56.06, 60.29 व 64.52 टक्के इतके कमी आहे. यात स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण अनुक्रमे केवळ 46.55, 50.64, व 49.25 टक्के आहे; तर ग्रामीण साक्षरतेचे प्रमाण अनुक्रमे 51.40,58.54 व 61.54 आहे. 77.27 टक्के साक्षरतेचे प्रमाण असलेल्या महाराष्ट्रात ग्रामीण साक्षरतेचे प्रमाण अद्यापही 70.84 टक्के एवढेच आहे.[11] 'सर्वांसाठी शिक्षण' या उद्दिष्टपूर्तीसाठी पाच वर्षावरील सर्व बालकांची शाळेत पट नोंदणी होऊन गळती पूर्णत: थांबविणे अनिवार्य आहे. भारतात विशेषत: ग्रामीण भागात या दोन्ही बाबत चिंताजनक स्थिती आहे. शाळेच्या दप्तरी नोंदीनुसार पट नोंदणीत सुधारणा होत आहे, असे दिसते. 1990-91 साली तर 100 टक्के पट नोंदणी झाली. त्यानंतर त्यात पुन्हा घसरण होऊन 1999-2000 साली 45% पट नोंदणी झालेली आहे. परंतु राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण (NSS) 1999-2000 च्या अहवालानुसार निव्वळ पटनोंदणी दर फक्त 52.5 टक्के होता तर स्थूल पट नोंदणी दर 61 टक्के होता. मागास राज्यातील आर्थिक व सामाजिक

दृष्ट्या मागासलेल्या समाजातील 30 ते 50 टक्के बालक प्राथमिक शिक्षण पूर्ण करू शकत नाहीत, ही गंभीर बाब आहे. त्यात नंदूरबार, गडचिरोली सारख्या जिल्ह्यात जवळपास 50 टक्के ग्रामीण जनता अद्यापही शिक्षणापासून वंचित आहे. त्यातही मागास जाती जमाती व भटक्या विमुक्त यासारख्या मागास समाजासाठी शिक्षण किती दूर आहे याची कल्पना आपण करू शकतो.

केवळ साक्षरता म्हणजे शिक्षण नव्हे, हे आपण जाणतोच, गुणवत्तेसह प्राथमिक शिक्षणासाठी विविध योजना राबविल्या जात आहेत. बालकांची वाचन, लेखन व अनुबोधन क्षमता वाढविण्यासाठी जाहीर वाचन पद्धती 'चावडी वाचन' प्रकल्प सुरू झाला. त्यातून ग्रामीण शिक्षणाचा ढिसाळपणा प्रकर्षाने जाणवत आहे. एक तर शिक्षण सुविधा नाही, असल्यास अपुरी साधन सामग्री व प्रेरणाहीन अधिकारी व शिक्षकवर्ग त्यामुळे आज ग्रामीण शिक्षण अत्यंत तकलादू स्थितीत चालू आहे. राष्ट्रभक्ति, समाज बांधिलकी, कार्यानुभव, श्रमनिष्ठा व व्यावसायिक व व्यावहारिक कौशल्य विकासाबाबत एकूणच शिक्षण व्यवस्थेत चिंतनाच्या पातळीवर महत्त्व दिले जात असले तरी प्रत्यक्षात शिक्षण व्यवस्था या पासून खूप दूर आहे. आपला विकास दर इथेच कुंठीत झाला आहे. हे सर्वांना कळते परंतु त्यासाठी अग्रक्रमाने करावयाच्या उपाय योजने बाबत लोक सहभागातून लोक शिक्षण नीति राबविण्याची व्यापक व्यूहरचना आखावयास हवी.

या बाबतीत विचाराच्या पातळीवर पुरेशा चिंतनाचा वारसा आपणास आहे. प्राचीन काळात विचाराला व्यवहाराची जोडही होती. नालंदा, तक्षशीला, विक्रमशीला विद्यापीठातून [12] दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचा धागा पुढील काळात सैल होत गेला व ब्रिटिश काळात तो जाणीवपूर्वक पूर्णत: तोडला गेला. कारकुनी व निसर्ग संसाधनासंबंधी सम्यक कृतीच्या अभावाचे शिक्षण सार्वत्रिक झाले. इंग्रजांनी राजकीय सत्ता बळकट करण्यासाठी शिक्षण नीतिचा अवलंब केला त्यातून भारतीय आर्थिक विकासाचा पाया पूर्णत: उध्वस्त झाला. ब्रिटिश शासनाने नेमलेल्या हंटर शिक्षण आयोगाला सादर केलेल्या निवेदनात याबाबत म. फुलेंनी तीव्र नापसंती नोंदवून सुचविले होते, ''खेड्यातील शाळेत शेतकीच्या पाठांच्या जोडीने प्रत्यक्ष व्यावहारिक शिक्षण देता यावे म्हणून एक 'आदर्श' शेतीची छोटीशी योजना आखल्यास ती निश्चित फायदेशीर होईल. ही योजना खऱ्याखुऱ्या कार्यक्षमतेने अमलात आणल्यास तिच्यामुळे सर्व देशाचे कोटकल्याण साधेल...... अभ्यासक्रमात सुधारणा आणि पुनर्रचना होणे अत्यंत आवश्यक आहे. यांत्रिकी, नीतिबोध, आरोग्य, शेतकी आणि उपयुक्त कला या विषयांवरील शिक्षण पुस्तकामधून श्रेणीनुसार वाढत्या प्रमाणात देण्यात यावेत.''[13] या आशयाचे विचार म. गांधी, विनोबा भावे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व स्वातंत्र्योत्तर काळातील नेमलेल्या सर्व शिक्षण आयोगांनी मांडलेले आहेत; परंतु निसर्गाभिमुख श्रमप्रधान शिक्षण व्यवस्था शिक्षणाच्या सर्वस्तरांवर निर्माण करण्यात आपले अपयश आपल्या विकासाच्या आड येत आहे. ही बाब सर्व विचारवंतांनी विशेषत: आर्थिक विचारवंतांनी लक्षात घेतली पाहिजे.

दारिद्र्य, बेकारी, उपासमार, आर्थिक कोंडीतून आत्महत्या, या समस्यांवर प्रभावी उपाययोजना करण्याची गुरूकिल्ली शिक्षण व्यवस्थेत आहे. याचे भान सर्वांना देण्याआधी विचारवंत व धोरणकर्त्यांना त्याची तीव्रता जाणवली पाहिजे.

110 कोटी जनसंख्या असलेल्या देशात जवळपास 60 कोटी फलदायी श्रमशक्तीचे भांडार

आहे. या शक्तीचे आर्थिक शक्तित रूपांतर करण्यासाठी शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र परिवर्तनाची गरज आहे.

उपलब्ध नैसर्गिक संसाधने, जल, जमीन, जंगल जनावर या आधारेच जनशक्तीचे भरण-पोषण होत असल्याने यातील पर्यावरणीय संबंध निसर्गाचे आवर्ती वर्तन व त्यातच चराचरांची व मानवी जीवनाची शाश्वतता अंतर्भूत आहे. याची आत्मिक जाणीव करून त्याचे मानवी वर्तनात प्रभावी प्रतिबिंब उमटवू शकणाऱ्या प्रभावी शिक्षण क्रमाची प्रथमत: योजना विनाविलंब करावयास हवी.

याला पुरेशा शिक्षण सामग्रीची जोड द्यावी लागेल. 5 वर्षावरील सर्व बालकांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पूर्ण गुणवत्तेसह पूर्ण करण्यासाठी 40 विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक, एक वर्ग खोली, या प्रमाणे पुरेशा वर्ग खोल्या, ग्रंथालय, अभ्यासकक्ष, प्रयोगशाळा, व्यायामशाळा, कार्यानुभवासाठी तंत्रशाळा, बागकाम व कृषी तंत्रज्ञानासाठी रोपवाटिका, देशी व विदेशी खेळांसाठी पर्याप्त मैदान, किमान 25 ते 50 टक्के विद्यार्थ्यांचा निवास होऊ शकेल अशी वसतिगृह व्यवस्था, अद्ययावत संगणक कक्ष, प्रकाश योजना, स्वच्छ पिण्याचे पाणी व स्वच्छतागृहाची व्यवस्था अशा सर्व शिक्षण सुविधा पुरविण्यासाठी गरजेप्रमाणे प्रत्येक शाळेला 1 ते 4 हेक्टर भूखंड उपलब्ध करून देऊन सर्व शैक्षणिक सामग्री युक्त 'शैक्षणिक संकुल' प्रत्येक खेड्यात निर्माण करावयास हवे. राजकीय स्वातंत्र्य संग्रामात आपण 58 वर्षापूर्वी यशस्वी झालो. आर्थिक व सामाजिक स्वातंत्र्य अद्याप दूर आहे. त्यासाठी आपणास शालेय शिक्षणाची प्रभावी व्यवस्था उभी केल्याशिवाय पर्याय नाही. विकासाची शाश्वत, सुमधुर फळे चाखण्यासाठी सम्यक दृष्टि, सम्यक संकल्प, सम्यक वाचन, सम्यक कर्मांत, सम्यक आजीव, सम्यक व्यायाम, सम्यक स्मृति व सम्यक समाधी [14] असे उचित मानव व्यवहार समाज व्याप्त होण्यासाठी सम्यक शिक्षण व्यवस्था निर्माण करण्यास पर्याय नाही. भगवान गौतम बुद्धांनी उपदेशीलेल्या या मानवी व्यवहाराला मूलभूत आठ सम्यक आर्थिक तत्त्व (Eight Nobel Economic Principles) म्हणून मान्यता मिळायला हवी.[15] असे स्पष्ट प्रतिपादन प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ इ. एफ. शूमाकर यांनी केले आहे. जीवन तत्त्वज्ञानापासून वंचित असलेल्या समाजाला भौतिक कल्याणाचा मार्ग कसा सापडणार ?

मूलभूत 'जीवन तत्त्वज्ञान' व व्यावहारिक 'आर्थिक तत्त्वज्ञान' यांचा उचित समन्वय घडवून आणण्याची शालेय व्यवस्था हाच 'सम्यक मनुष्य बळ' विकासाचा प्रमुख आधार आहे. तो भक्कम करण्यासाठी सर्व बळ एकवटून त्यात पूर्णत्व आणण्याची आवश्यकता आहे. एकदा धोरण म्हणून हे स्वीकारल्यानंतर नियोजनात आद्यक्रम देऊन पुरेशी अर्थसंकल्पीय तरतूद (राष्ट्रीय उत्पादनाच्या 15 ते 20 टक्के) यासाठी करावी लागेल.

### 3.3 उच्च शिक्षण

व्यावहारिक शिक्षण व मूलभूत ज्ञान-विज्ञान विषयक शिक्षण अशा दोन भागात आज उच्च शिक्षण व्यवस्था विभागली आहे. अभियांत्रिकी, वैद्यकीय, औषध निर्माण, कृषी, पशु वैद्यकीय, विधी, व्यवस्थापन, चित्रकला, शिल्पकला, संगीतशास्त्र इत्यादी व्यावसायिक विद्याशाखांतून उच्च शिक्षित तरूण निर्माण होत आहेत. या शिक्षणाला मागणीही चांगली आहे; परंतु उच्च शैक्षणिक गुणवत्ता धारकानाच या शिक्षणाचे दरवाजे उघडे आहेत. उर्वरित सर्व तरूण तरूणींना मूलभूत ज्ञान-विज्ञान व वाणिज्य या सामान्य विद्या शाखेत प्रवेश घ्यावा लागतो. 2000-2001 साली

व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर वर्गात 14.87 लक्ष विद्यार्थी शिक्षण घेत होते, तर सामान्य विद्या शाखांतून 73.34 लक्ष विद्यार्थी शिक्षण घेत होते हे प्रमाण 1 :4.9 असे येते. संशोधन शिक्षण व ज्ञान विस्तार या कार्यासाठी खरोखरच दरवर्षी लक्षावधी युवकांची गरज आहे काय ? या कार्यासाठी आपण तयार व्हावे अशी त्यांची ध्येयासक्ती असते काय ? या प्रश्नांची उत्तरे पूर्णतः नकारात्मक आहेत. याची स्पष्ट कल्पना सर्व विकास नीति जाणणाऱ्या व राबविणाऱ्यांना असूनही या देशात दरवर्षी लाखो युवकांना आपण ध्येयशून्य, भविष्यविहीन व्यवस्थेत अडकवून ठेऊन त्यांचा भ्रमनिरास करीत आहोत. 58.60 टक्के श्रमशक्ति उपलब्ध असलेल्या देशात श्रमशक्तीचा अपव्यय असाच चालत राहिला, तर त्यांना विकास प्रक्रियेपासून कायम दूर रहावे लागेल.

### 3.4 ग्रामीण विद्या शाखा [16]

ग्रामीण जीवनाशी निगडित कृषी, फलोद्यान, रोपवाटिका, वनौषधी लागवड, वनशेती, रेशीम उद्योग, मधमाशी पालन, दुग्ध व्यवसाय, पशूपालन, कुकुट पालन, बंदीस्त शेळी पालन, कृषी उत्पादने प्रक्रिया उद्योग, अन्न प्रक्रिया, साठवण व विक्रीतंत्र, मत्स्य व्यवसाय, शितगृह तंत्रज्ञान, कृषी औजारे संकल्पन व निर्मिती, कृषी सेवा केंद्र, इत्यादी संबंधीचे व्यावसायिक शिक्षण देणारी महाविद्यालये ग्रामीण भागात सुरू करावीत. सध्याच्या सामान्य विद्याशाखा बंद करावयास हव्यात व त्या संबंधीचे शिक्षण व्यावसायिक शिक्षण घेणारे विद्यार्थी त्यांच्या आवडीच्या ज्ञान शाखेतील एखाद दुसऱ्या विषयाचे शिक्षण 'दुरस्थ शिक्षण पद्धतीने' मुक्त विद्यापिठांसारख्या संस्थांमधून घेतील. यासाठी किमान वेळ देऊन जास्तीतजास्त वेळ व्यावसायिक शिक्षणासाठी राखून, तीन-चार व्यवसाय क्षेत्रातील कौशल्य तीन वर्षाच्या शिक्षण कालावधीत अवगत करता येतील, अशी रचना करावी लागेल.

यासाठी ग्रामीण भागातील सध्याचे सामान्य विद्याशाखांचे शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयांची सामग्री वापरता येईल. शिवाय कार्यशाळा, तंत्रशाळा, रोपवाटिका, फलोद्यान इत्यादींसाठी प्रत्येक महाविद्यालयांना 3 ते 5 हेक्टर क्षेत्र उपलब्ध करून द्यावे लागेल. विपुल मनुष्यबळ वापराच्या नियोजनासाठी 'पायाभूत भांडवली' खर्चाची तरतूद अनिवार्य म्हणून करावयास हवी.

1834-35 साली टी.बी. मेकॉले यांनी सुरूवात केलेल्या शिक्षण नीतिच्या जोखडाने आजही आपल्या पिढ्यानपिढ्या दारिद्र्यात खितपत पडत आहेत. उपलब्ध प्रचंड मनुष्यबळ गेल्या 170 वर्षापासून सतत कुजविणाऱ्या या शिक्षण व्यवस्थेला असाच मोठा धक्का देऊन उध्वस्त करून टाकावी व तितक्याच व्यापक तयारीने भारतीय चिंतनातून निर्माण झालेल्या भारतीय शिक्षण शास्त्राच्या आधारे म. फुले, महात्मा गांधी, विनोबा भावे, संत तुकडोजी महाराज व सर्व शिक्षण आयोगांनी ज्याचा स्वीकार केला त्या व्यावसायिक 'नई तालीम शिक्षण नीतिचा' स्वीकार तात्काळ करावयास हवा. वैचारिक आर्थिक व सामाजिक गुलामगिरीतून मुक्त होण्याचा मार्ग म्हणजे भारतीय 'ग्रामीण श्रमशक्तिचे सबलीकरणच' आहे. त्याच साठी ग्रामीण विद्या शाखेचे जाळे देशभर निर्माण करण्यात यावे. त्यातील अभ्यासक्रम स्थलपरत्वे भिन्न-भिन्न असतील.

ग्रामीण विद्या शाखेतील पदवी शिक्षण घेऊन बाहेर पडणारे तरूण-तरूणी स्थानिय साधन सामग्रीच्या आधारे 'योगक्षेम' चालविण्यास समर्थ बनतील कारण ते व्यावहारिक शहाणपणाने अलंकृत झालेले असल्याने, निश्चित भवितव्य घडविण्याचा आत्मविश्वास प्रत्येकाच्या ठिकाणी असेल व

आजची अगतिकता पूर्णत: संपलेली असेल.

### 3.5 कृषी शिक्षण

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण उद्योग व सेवा क्षेत्रासाठी अनिवार्य मानले जात असून, त्यासाठी अभियांत्रिकी महाविद्यालय, तंत्रनिकेतन व उद्योग प्रशिक्षण संस्था मोठ्या प्रमाणात स्थापन करण्यात आल्या. त्यातून औद्योगिक व सेवा क्षेत्राला गरजेप्रमाणे तज्ज्ञ व प्रशिक्षित अधिकारी व श्रमिक उपलब्ध होत आहेत. याउलट कृषी क्षेत्रासाठी असलेल्या उच्च शिक्षण संस्था व प्रशिक्षण संस्था अत्यल्प प्रमाणात आहेत. परिणामी ग्रामीण निसर्ग संसाधनासंबंधी संशोधन, शिक्षण व त्याचा प्रसार होऊ शकला नाही. उलट ग्रामीण भागात सामान्य ज्ञान शाखांचे बिगर-व्यावसायिक शिक्षण घेतलेला तरूण कृषी व पशूपालनासारख्या क्षेत्रात काम करीत आहे. शिक्षण काळात तो पारंपरिक कृषी ज्ञानालाही मुकला व नवीन अत्याधुनिक कृषीज्ञान ही त्याला नाही, अशा स्थितीत त्याची निर्णय क्षमता व समज काय असेल याची आपण कल्पना करू शकतो. मनुष्यबळाच्या या विपरीत व्यवस्थापनाला तात्काळ छेद देऊन कृषी शाळा, कृषी तंत्रनिकेतने, कृषी व कृषी अभियांत्रिकी, पशूसंवर्धन महाविद्यालयांचा विस्तार करावयास हवा.

### 4. निसर्ग संसाधने व मनुष्य बळ

4.1 मानवी जीवनमानाला उपयुक्त असलेल्या निसर्ग संसाधनांचे वर्गीकरण जैविक व अजैविक असे केले जाते. या पैकी काही संसाधने पुनर्नवीकरणीय असतात, तर काही अपूनर्नवीकरणीय असतात. पुनर्नवीकरणीय ससाधनांची उपलब्धता निसर्गाच्या चक्रीय वर्तनामुळे निश्चित प्रमाणात पुन: पुन: सतत होत असते. त्यातून मानवी जीवनमानाला एक निश्चित स्थैर्य प्राप्त झाले आहे.[17] अपुनर्नवीकरणीय संसाधने खनिज, धातू, पेट्रोल, कोळसा इत्यादींचा उपलब्ध साठा वापराच्या प्रक्रियेत संपुष्टात येत जातो. या सामग्रीचा वापर वाढल्याने यावर अवलंबून असलेल्या मानवी जीवनमानाच्या विकासाला मोठ्या मर्यादा निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे शाश्वत मानवी जीवनमानासाठी अपुनर्नवीकरणीय संसाधनाच्या वापराला पर्यायी पुनर्नवीकरणीय संसाधने वापराचे प्रयत्न चालू आहेत. पर्यावरणीय संतुलन राखण्यासाठी एकविसाव्या शतकात याच धोरणाचा स्वीकार करण्याशिवाय पर्याय नाही.[18]

जल, जमीन, जंगल, जनावरे, जन, जीवाणू व वायू इत्यादी पुनर्नवीकरणीय संसाधनाच्या उपलब्धतेच्या बाबत भारताला भौगोलिक अनुकूलता आहे. जैविक युगाचा प्रारंभ होत आहे. जैवतंत्रज्ञानाचे संशोधन व विस्ताराला गती मिळत आहे, जैविक इंधन, उर्जा जलविद्युत, वनस्पती रंग, वनौषधी इत्यादी जल व भूमीच्या आधारे निर्माण होणाऱ्या मानव उपयुक्त सामग्रीच्या उत्पदनाबाबत भारताची मोठी क्षमता आहे. याचा मनुष्यबळ विकासाशी आपण योग्य समन्वय साधू शकलो, तर येणाऱ्या जैविक युगात भारत अग्रभागी असणार आहे. सुशिक्षित बेकारांना व्यावहारिक कृषी तंत्रज्ञानाचे शिक्षण देऊन प्राथमिक क्षेत्रात रोजगार निर्माण करून त्वरणित विकास दर वाढविला जाऊ शकतो.

4.2 जागतिक स्पर्धेत ग्रामीण समाजाला टिकून राहण्यासाठी माहिती तंत्रज्ञान व जैविकतंत्रज्ञानाचे ज्ञान असणारे तरूण 'ग्रामीण कृषी उद्योजक' निर्माण करावे लागतील. त्यासाठी आवश्यक संस्थात्मक सहाय्याची रचना करावी लागेल.

रोजगाराची हमी देत असतांना ज्ञान-विज्ञान, तंत्रज्ञान व श्रमप्रधानतेचा सुयोग्य मेळ घालावा

लागेल. पारंपरिक शहाणपणाला नव्याने निर्माण झालेल्या पर्यावरणीय संवर्धनाच्या मर्यादा राखून उच्च तंत्रज्ञानाचा वापर आज अनिवार्य झाला आहे.[19] विसाव्या शतकातील सहाव्या व सातव्या दशकात अंगीकारलेल्या हरित क्रांतीच्या मर्यादा एम.एस. स्वामीनाथन सारख्या कृषी शास्त्रज्ञांनी आता मान्य केल्या आहेत. अधिक जलवापर रासायनिक खते व किटक नाशकांचा अतिरिक्त वापर यातून निसर्ग संसाधनाचा द्रुतगतीने ऱ्हास होत आहे. दर एकक निसर्ग संसाधनात अधिक मानव उपयुक्त साधनांच्या निर्मितीचे नव्याने विकसित होत असलेल्या जैवतंत्रज्ञानाची निर्मिती, संवर्धन, शिक्षण व विस्तार प्रत्येक नागरिकापर्यंत पोहचविण्याची सक्षम यंत्रणा उभी करावी लागेल.[20]. त्यात शाळा-महाविद्यालयांची प्रमुख भूमिका असावी लागेल. यासाठी सर्व बाजूंनी आवश्यक ते बदल शिक्षण व्यवस्थेत करावे लागतील. प्रत्येक शाळा, उच्च माध्यमिक विद्यालय, महाविद्यालय त्या त्या परिसरातील नैसर्गिक व मानवी संसाधनाचे शोध केंद्र बनावे, त्यासाठी अमेरिकेतील जॉर्ज कार्व्हर च्या मनोवृत्तीची शिक्षक पिढी निर्माण करावी लागेल. विकासासाठी धन, यंत्र, तंत्राची आवश्यकता जरूर असते; परंतु अपरिहार्य असलेली बाब म्हणजे कर्मयोग्याची मनोभूमिका असलेले 'मन' होय. मग दिसू लागतात, आपल्या आप्तेष्टांच्या हाल अपेष्टा व त्यातूनच काळाचे आव्हान पेलण्याची वृत्ती साकार होते. दारिद्र्य, भुकेवर मात करण्यासाठी दूर-दूर गावात, खेड्या-पाड्यातून निसर्ग संसोधन, शिक्षण व विस्तार केंद्र, शाळा महाविद्यालयाच्या रूपाने निर्माण व्हावे लागतील.

कार्व्हर यांनी अमेरिकेत शेंगदाणा हे माकडाचे खाद्य आहे असे समजणाऱ्या, समाजाला शेंगदाण्याची उपयुक्तता आपल्या संशोधनातून व विस्तार कार्यातून पटवून दिली. संपूर्ण जीवन संशोधन व शिक्षण कार्यात व्यस्त ठेऊन, प्रयोग शाळेत शेंगदाण्यापासून तीनशे विविधांगी उपयुक्त पदार्थ सिद्ध केले. यातून जमिनीचा पोत टिकवून धरणारे एक पर्यायी पीक अमेरिकेतील शेतीसाठी उपलब्ध झाले.[21]

4.3 निसर्ग संपदेच्या दृष्टीने भौगोलिक अनुकूलतेमुळे आपण भाग्यशाली आहोत. त्याचा फायदा पूर्वी पूर्वजांनी त्या काळात घेतला आहे. त्यासाठी निर्माण करण्यात आलेले ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान घराघरातून जीवन व्यवहारात बसविण्याची रीत पिढ्यान् पिढ्या चालत आलेली आहे. आजही ग्रामीण जीवनात धार्मिक विधी, रूढी, परंपरांच्या आधाराने हा जीवन व्यवहार प्रगट होताना दिसतो. निसर्गशास्त्र व सामाजिकशास्त्र या क्षेत्रात संशोधन करणाऱ्या शास्त्रज्ञांनी याचा शोध घेऊन कालानुरूप मांडणी करावयास हवी. पारंपरिक शास्त्रीय जीवन व्यवहाराचा धागा धरून नवीन शास्त्रीय संकल्पनाचे समायोजन करून अनिष्ट जीवन रूढी-परंपरांना दूर करता येईल. ग्रामीण समाज जीवनाकडे पाहण्याचा नकारात्मक दृष्टिकोन आजच्या सामाजिक संशोधकांनी निर्माण केला; तर निसर्ग शास्त्रज्ञांनी ग्रामीण शास्त्रीय जीवनाकडे पूर्णतः दुर्लक्ष केले. परिणामी निसर्गाशी सम्यक व्यवहार असलेल्या अनेक शास्त्रीय जीवन व्यवहारांचा आपण समाजव्याप्त प्रसार करू शकलो नाही. म्हणून संशोधकांना ग्रामीण समाजाभिमुख बनवून दुर्लक्षित झालेला हा समृद्ध वारसा पुनरूज्जीवित करावा लागणार आहे.

**4.4 भूसेना [22]**

भारतात भूमी व जल संसाधनाच्या विकासाला अद्यापही भरपूर वाव आहे. 329 द.ल. हेक्टर क्षेत्र असलेल्या या खंडप्राय देशात 141 द.ल.

हेक्टर क्षेत्र लागवडीखाली आहे. त्यात आधुनिक तंत्रविज्ञान व जैवतंत्रविज्ञानाच्या आधारे मोठी भर घालता येईल. फलोद्यान, रेशीम उद्योग, फुलोद्यान, पशूधन संगोपनासाठी उच्च तंत्रज्ञान वापरून 83.90 द.ल. हेक्टरची भर सहज घालता येईल. (तक्ता : 05) शिवाय आता केवळ 18 टक्के दुबार पिकांखालील क्षेत्रात 40 टक्यापर्यंत वाढ होऊ शकते. यामुळे सध्याचे स्थूल लागवडीखालील 190 द.ल. हेक्टर क्षेत्र 314.86 द.ल. हेक्टर पर्यंत पोहचवीता येईल. (पहा. तक्ता : 06)

जल संपदेच्या विकासाला मोठा वाव आहे.एकूण वापरासाठी उपलब्ध असलेले 690.3 किमी³ भूपृष्ठ जल, उत्तर व दक्षिण भारतांत अत्यंत विषम प्रमाणात उपलब्ध आहे. (पहा तक्ता :07) जल संपदेचे क्षेत्रीय विषम उपलब्धतेचे संतुलन साधण्यासाठी राष्ट्रीय नद्या जोडणी प्रकल्प विचाराधीन आहे. दोन तृतीयांश अवर्षण प्रवण क्षेत्रातील भूमीला ओलावा निर्माण झाल्याने जैविक संपदेच्या विकासाला प्रचंड गती प्राप्त होऊन राष्ट्राच्या समृद्धीचा मार्ग गतिमान होणार आहे.

उपलब्ध भूमी व जल संपदेचा पूर्णत्वाने विकास घडवून आणण्यासाठी सुयोग्य मनुष्यबळ विकासाचा विचार भाग 3 मध्ये केला आहेच.या बरोबरीने सध्या आपल्या देशात 70.14 द.ल.श्रमिक कामाअभावी बेकार आहेत (पहा तक्ता : 08) बेकारी भत्ता, अंशकालिक काम, अशा 'दान मूलक', तात्पुरत्या कल्याणकारी उपाय योजनांनी बेकारीचा चीरकालीन प्रश्न सुटणार नाही, हे निश्चित आहे. बेकारीच्या समस्येवर मात करून पायाभूत उत्पादन सामग्रीत भर घालण्यासाठी भू-सेना उभारावयास हवी. भू-सेनेची रचना, संघटन,कार्यपद्धती व त्यासाठी लागणारी वित्तीय व्यवस्था याचे नियोजन स्वतंत्रपणे करता येईल.

ही भू-सेना साधारणपणे नापीक जमीन सुधारणा व पडिक जमीन लागवडीखाली आणणे, जल प्रणाली विकास, वन व कुरणे विकास, रस्ते बांधणी, जलविद्युत, पवन ऊर्जा निर्मिती इत्यादी कामासाठी परिणामकारक रीतीने वापरता येईल.

राष्ट्राची समृद्धी, उपलब्ध नैसर्गिक संसाधने व मनुष्यबळ यांच्या निरंतर उत्पादन क्षमतेवर अवलंबून असते. भारताला नैसर्गिक संपदा व मनुष्यबळ या दोहोंच्या बाबत तुलनात्मक अनुकूलता आहे. आवश्यकता आहे, ती उपलब्ध असलेल्या तंत्रज्ञानाच्या आधारे मनुष्यबळाची क्षमता वाढवून प्रत्यक्ष नैसर्गिक संपदेचे देशव्यापी, प्रवाही व समन्वयीत कृषी व इतर जैविक उत्पादन प्रक्रियेस सहाय्यकारी होणारे जाळे निर्माण करण्याची.

''बुद्धी आणि श्रम यांच्यात फारकत झाल्यामुळे शेती आणि ग्रामीण भारत विकलांग झाला आहे'' ही महात्मा गांधींनी व्यक्त केलली खंत, मी माझ्या क्षमतेप्रमाणे आपल्या पर्यंत पोहचविली, त्यासाठी समग्र व स्थानीय, व्यक्तिगत योजनाही सुचविल्या आहेत.

### संदर्भसूची


1. राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी 14 ऑगस्ट 2004 व 2005 रोजी राष्ट्राला उद्देशून केलेली भाषणे.

2. आर्य चाणक्य, कौटिलीय अर्थशास्त्र, वरदा बुक्स, सेनापती बापट मार्ग, पुणे 2002, पृ. 153.

3. म. गांधीजी, हिंद-स्वराज्य, परंधाम प्रकाशन, पवनार, 1994.

4. मानव विकास अहवाल महाराष्ट्र 2002, महाराष्ट्र शासन, मुंबई.

5. Nagarajan.S. Ramamurthy V. &

B. Prasanna, Educational and Policy Dimensions, Survey of Indian Agriculture, The Hindu,2005

6. उपरोक्त (2)कौटिलीय अर्थशास्त्र पृ. 156

7. Selected Conversation of Vinoba Bhave (Ed.) Kusum Deshpande & Vishawnath Tandon,Radha Publication, N. Delhi,2002, P. 75.

8. Vetticka Thomas : Gandhian Sarvodaya, Gyan Publishing house, New Delhi 2002 P.7

9. Chauhan Sandeep : GATT TO WTO : Gandhian Alternative to NIEO, Deep & Deep Publications Pvt. Lt. N. Delhi, 2001, P.363.

10. Gandhi M.K. : Village Swaraj, Navajivan Publishing House, Ahmedabad, 1446. P.25.

11. मानवविकास अहवाल महाराष्ट्र पृ. 81,82,269.

12. इंगळे सी.आर. ; प्राचीन भारतीय बौद्ध विद्यापीठे, आनंद प्रकाशन औरंगाबाद 2002.

13. फडके, य. दि. (संपा) महात्मा फुले समग्र वाड्मय, संपादक महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई 1441, पृ.720.

14. वियोगी हरि, बुद्धवाणी, सस्ता साहित्य मण्डल प्रकाशन नई-दिल्ली, सन2002, पृ.16.

15. Schumacher, E.F, 'Small is Beautiful', India Book Distribution, Mumbai, 1983, P.44.

16. Thombre, Sarjerao ; A. Model Design for Establishing Faculty of Rural Development, University News, Vol : 39,No.13, March 26-April 2001.

17. Kumarappa, J.C. , Economy of Permanence, Sarva Seva Sangh Prakashan, Rajghat, Varanasi, 1997.

18. Rao, P.K. Sustainable Development, Black well publishers Inc. Massachusett, USA. 2000, p.41.

19. APJ. Abdul Kalam with Y.S. Rajan, India 2020 : A vision for the New millennium, Penguin Books, 1998, P.134.

20. देऊळगावकर, अतुल ; स्वामीनाथन-भूखमुक्तीचा ध्यास, अक्षर प्रकाशन, मुंबई 2000, पृ.138

21. गवाणकर,वीणा,एक होता कार्व्हर, राजहंस प्रकाशन पुणे.1997 पृ. 95

22. ग्राम विकास अभ्यास गट : अहवाल, (अध्यक्ष : सर्जेराव ठोंबरे)ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई 1997 पृ.42

तक्ता. क्र.1

ग्रामीण व नागरी लोकसंख्येचे प्रमाण 1901-2001

एकूण लोकसंख्येचे प्रमाण

| जनगणना वर्ष | भारत | | महाराष्ट्र | |
|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | नागरी | ग्रामीण | नागरी |
| 1901 | 89.20 | 10.80 | 83.41 | 16.59 |
| 1911 | 89.70 | 10.30 | 84.87 | 15.13 |
| 1921 | 88.80 | 11.20 | 81.50 | 18.50 |
| 1931 | 88.00 | 12.00 | 81.40 | 18.60 |
| 1941 | 86.10 | 13.90 | 78.89 | 21.11 |
| 1951 | 82.70 | 17.30 | 71.25 | 28.75 |
| 1961 | 82.00 | 18.00 | 71.78 | 28.22 |
| 1971 | 80.10 | 19.90 | 68.83 | 31.17 |
| 1981 | 76.70 | 23.30 | 64.97 | 35.03 |
| 1991 | 74.30 | 25.70 | 61.31 | 38.69' |
| 2001 | 72.20 | 27.80 | 57.57 | 42.43 |

स्रोत : भारत 2005, प्रकाशन विभाग सूचना व प्रसारण मंत्रालय नवी दिल्ली, भारत सरकार 2005 व महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2003-04.

तक्ता. क्र.2

भारतात गरिबी रेषेखालील लोकसंख्येचे शेकडा प्रमाण

| वर्ष | ग्रामीण | नागरी | एकूण |
|---|---|---|---|
| 1983 ( 38 वी फेरी ) | 45.65 | 40.79 | 44.48 |
| 1987-88 ( 43 वी फेरी) | 39.09 | 38.20 | 38.86 |
| 1990-91 ( 46 वी फेरी ) | 35.04 | 35.29 | 35.11 |
| 1994-95 ( 51 वी फेरी ) | 38.03 | 34.24 | 36.98 |
| 1999-00 ( 55 वी फेरी ) | 27.10 | 23.60 | 26.10 |
| 2006-07 ( अंदाज ) | 21.07 | 15.06 | 19.34 |

स्रोत : India year book 2003. Man Power Profile, Institute of Applied Man-power Resarch 2004, P-14,15

तक्ता. क्र.3

भारतात व्यवसाय निहाय रोजगारीचे विभाजन 1999-2000

(अंक शेकडा प्रमाण)

| अ. क्र. | व्यवसाय विभाग | ग्रामीण | | | नागरी | | | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरूष | स्त्री | एकूण | पुरूष | स्त्री | एकूण | पुरूष | स्त्री | एकूण |
| 1 | तांत्रिक व संबंधित कामगार | 2.30 | 1.40 | 2.00 | 7.60 | 14.40 | 8.90 | 3.60 | 3.10 | 3.50 |
| 2 | प्रशासकीय व व्यवस्थापन | 1.70 | 0.80 | 1.40 | 9.00 | 5.80 | 8.30 | 3.50 | 1.50 | 2.90 |
| 3 | लिपिक व संबंधि कामे | 1.90 | 0.30 | 1.40 | 9.40 | 6.50 | 8.90 | 3.80 | 1.10 | 2.90 |
| 4 | विक्रेते | 5.00 | 1.80 | 3.90 | 18.40 | 8.80 | 16.50 | 8.40 | 2.70 | 6.60 |
| 5 | सेवाक्षेत्र | 2.40 | 2.30 | 2.30 | 7.90 | 16.50 | 9.60 | 3.80 | 4.20 | 3.90 |
| 6 | शेतकरी, मच्छीमार व संबंधीत | 70.50 | 84.50 | 75.40 | 7.00 | 18.40 | 9.30 | 54.40 | 75.60 | 61.10 |
| 7 | उत्पादन व संबंधीत कामे, वाहतूक क्षेत्र | 16.20 | 8.90 | 13.60 | 40.70 | 29.60 | 38.50 | 22.40 | 11.80 | 19.00 |
| | | 100.00 | 100.00 | 100.00 | 100.00 | 100.00 | 100.00 | 100.00 | 100.00 | 100.00 |
| | | 196.80 | 104.00 | 30.80 | 77.10 | 18.90 | 96.00 | 273.90 | 122.90 | 396.80 |
| **एकूण रोजगार (शेकडा)** | | 49.45 | 26.36 | 75.81 | 19.43 | 4.76 | 24.19 | 69.03 | 30.97 | 100.00 |

स्रोत : NSS Organisation Report No. 458, 1999-2000 Part- I संकलन

तक्ता. क्र. 4

भारतात श्रम शक्तिची शैक्षणिक पातळी 1999-2000

| शैक्षणिक पातळी | ग्रामीण | | नागरी | |
|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| निरक्षर | 39.6 | 73.9 | 16 | 44 |
| प्राथमिक शिक्षण | 27.3 | 15.5 | 21.9 | 17.8 |
| माध्यमिक शिक्षण | 16.3 | 6.2 | 18.9 | 9.3 |
| उच्च माध्यमिक शिक्षण | 13.5 | 3.7 | 26.4 | 14.2 |
| पदवी व अधिक | 3.3 | 0.6 | 16.8 | 14.7 |
| एकूण | 100 | 100 | 100 | 100 |

स्रोत : NSS Organisation Report No. 458 July 1999-June 2000, 55th Round. संकलन

तक्ता. क्र.5

भारतातील जमीन वापराचे स्वरूप 1999-2000

| अ.क्र. | तपशील | क्षेत्र (द.ल. हेक्टर) | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | एकूण भौगोलिक क्षेत्र | 329 | - |
| 2 | मोजणी झालेले एकूण क्षेत्र | 306 | 100 |
| 3 | लागवडी लायक नसलेली पडिक जमीन | 42 | 14 |
| 4 | जंगल व्याप्त क्षेत्र | 69 | 23 |
| 5 | कायम-स्वरूपी गवताळ कुरणाखालील क्षेत्र | 11 | 3 |
| 6 | लागवडी योग्य पडिक खराब क्षेत्र | 18 | 6 |
| 7 | चालू पडिक क्षेत्र | 25 | 8 |
| 8 | निव्वळ पेरणी क्षेत्र | 141 | 46 |
| 9 | दुबार पिकाखालील क्षेत्र | 49 | 18 |
| 10 | एकूण पिकाखालील क्षेत्र (8+9) | 190 | 62 |

स्रोत : सांख्यिकीय गोषवारा, भारत 2002 (केंद्रीय सांख्यकीय संघटन)

तक्ता. क्र.6

अ) आधुनिक व्यवस्थापन तंत्राने जास्तीचे वापरात येऊ शकणारे क्षेत्र

| अ.क्र. | तपशील | क्षेत्र (द.ल. हेक्टर) | जास्तीचा संभाव्य वापर (%) | उपयुक्त होऊ शकणारे जास्तीचे क्षेत्र (द.ल.हेक्टर) |
|---|---|---|---|---|
| 1 | लागवडी लायक नसलेली पडित जमीन | 42.00 | 20.00 | 8.40 |
| 2 | वन क्षेत्र | 68.00 | 50.00 | 34.00 |
| 3 | कायम स्वरूपी गवताळ व कुरणाखालील जमीन | 11.00 | 50.00 | 5.50 |
| 4 | लागवडी योग्य पडित क्षेत्र | 18.00 | 50.00 | 9.00 |
| 5 | चालू पडित क्षेत्र | 25.00 | 100.00 | 25.00 |
| | एकूण (1ते 5) | 164.00 | | 83.90 |

| तपशील | आकडे द.ल. हेक्टर |
|---|---|
| आ) वर्तमान पेरणी खालील निव्वळ क्षेत्र | 141.00 |
| इ) भविष्यात जास्तीचे उपजाऊ होऊ शकणारे क्षेत्र (अ) | 83.90 |
| ई) संभाव्य निव्वळ उपजाऊ क्षेत्र (ब+क) | 224.90 |
| उ) दुबार पिकाखालील संभाव्य क्षेत्र (40 %) | 89.96 |
| ऊ) संभाव्य स्थूल लागवडी खालील क्षेत्र | 314.86 |

टीप : 1 1 ते 5 मधील संभाव्य भूमी वापराची पातळी भू व्यवस्थापन उपलब्ध तंत्रज्ञान लक्षात घेऊन गृहित धरले आहे.

2 जलसंवर्धन, पाणलोट क्षेत्र कार्यक्रम व सिंचन प्रकल्पांचा विकास व बदलते कृषी तंत्रज्ञान या आधारे दुबार पिकाखालील क्षेत्र 40% वाढण्याची संभाव्यता गृहित धरली आहे.

**तक्ता. क्र.8**

**भारतात दहाव्या पंचवार्षिक योजनेत निर्माण करावा लागणारा रोजगार**

| अ.क्र. | तपशील | रोजगार (द.ल.) |
|---|---|---|
| 1. | 31 मार्च 2002 मनुष्य बळ | 378.21 |
| 2. | उपलब्ध रोजगार | 343.36 |
| 3. | बेकारीचा अनुशेष (1-2) | 34.85 |
| 4. | मनुष्य बळात नवीन भर | 35.29 |
| 5. | एकूण रोजगार मागणी (3+4) | 70.14 |

स्रोत : Indian Economy, Ruddra Datta & Sundharam, S. Chand & Company Ltd. New Delhi - 2006, P. 431

## तक्ता. क्र.7


### भारतातील नदी-खोऱ्यातील उपलब्ध जल संपदा

| अ.क्र. | नदी खोरे | सरासरी वार्षिक उपलब्धता: उपलब्ध जलसंपदा (कि.मी.$^3$) | सरासरी वार्षिक उपलब्धता: दरडोई उपलब्धता (मी $^3$) | वापरात येऊ शकणारे भूपृष्ठ जल(कि.मी.$^3$) | भूजल उपलब्धता (कि.मी.$^3$) |
|---|---|---|---|---|---|
| 1. | सिंधु | 73.3 | 1757 | 46.0 | 25.5 |
| 2. | गंगा-ब्रम्हपुत्रा- मेघना | 1110.6 | 2833 | 274.0 | 209.4 |
| 3. | गोदावरी | 110.5 | 2026 | 76.3 | 46.8 |
| 4. | कृष्णा | 78.1 | 1312 | 58.0 | 26.6 |
| 5. | सुवर्णरेखा | 12.4 | 1392 | 6.8 | 2.2 |
| 6. | कावेरी | 21.4 | 666 | 19.0 | 13.0 |
| 7. | ब्राह्मनी - वैतरणी | 28.5 | 2696 | 18.3 | 5.9 |
| 8. | महानदी | 66.9 | 2546 | 50.0 | 21.3 |
| 9. | पेन्नार | 6.3 | 648 | 6.9 | 5.0 |
| 10. | मही | 11.0 | 1057 | 3.1 | 7.9 |
| 11. | साबरमती | 3.8 | 421 | 1.9 | - |
| 12. | नर्मदा | 45.6 | 28.55 | 34.5 | 11.9 |
| 13. | तापी | 14.9 | 10.91 | 14.5 | 8.2 |
| 14. | पश्चिम वाहिनी नद्या (तापी ते ताडी) | 87.4 | 3194 | 11.9 | 9.5 |
| 15. | पश्चिम वाहिनी नद्या (ताद्री ते कन्याकुमारी) | 113.5 | 3539 | 24.3 | 8.8 |
| 16. | पूर्व वाहिनी नद्या (महानदी व पेन्नार मधील क्षेत्र) | 22.5 | 919 | 13.1 | 22.8 |
| 17. | पूर्व वाहिनी नद्या (पेन्नार व कन्याकुमारी मधील क्षेत्र) | 16.5 | 383 | 16.7 | 20.9 |
| 18. | पश्चिम वाहिनी नद्या कच्छ, सौराष्ट्र व लूणी सह | 15.1 | 631 | 15.0 | 13.9 |
| 19. | राजस्थान वाळवंटी प्रदेश | नगण्य | - | - | - |
| 20. | म्यान्यार (बर्मा) व बांगला देशातून वाहणाऱ्या नद्या | 31.0 | 14616 | - | - |
| | एकूण | 1869.3 | 2214 | 690.3 | 452.2 |

स्रोत : भारतीय जलसंसाधन संस्था


स्तंभालेख 01

ग्रामीण व नागरी लोकसंख्येचे प्रमाण - भारत




स्तंभालेख 02

ग्रामीण व नागरी लोकसंख्येचे प्रमाण - महाराष्ट्र



# आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिद्धांत-एक सिंहावलोकन (लेखांक -2 उत्तरार्ध )

✦ सु.गो. भानुशाली, पुणे.
*माजी सहायक संपादक अर्थसंवाद*

## 7

### परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक आणि अंतर-व्यवसाय संस्था आंतरराष्ट्रीय व्यापार

एकाच उत्पादन संस्थेच्या विविध संलग्न संस्था (affiliate) तसेच अनुषंगी कंपनी (Subsidiary Company) यांच्या मधील व्यापार म्हणजे अंतर-संस्था (intra - firm) व्यापार होय. उत्पादन संस्था विविध कारणांसाठी आपल्या संलग्न संस्था व अनुषंगी संस्था विविध देशात स्थापन करीत असतात. वस्तू उत्पादनाच्या विविध प्रक्रिया वेगवेगळ्या देशात या संलग्न अथवा अनुषंगी संस्थांमध्ये पार पाडल्या जातात. त्यासाठी एका देशात एक प्रक्रिया पूर्ण करून पुढील प्रक्रियेसाठी अर्ध-उत्पादित वस्तू दुसऱ्या देशातील संलग्न अथवा अनुषंगी संस्थेमध्ये पाठविली जाते. त्यामुळे अशा अंतर-व्यवसाय संस्था व्यापाराला आंतरराष्ट्रीय व्यापाराचे स्वरूप येते. काही बाबतीत अंतर-उद्योग आंतरराष्ट्रीय व्यापार अंतर-व्यवसाय संस्था आंतरराष्ट्रीय व्यापार असला तरी बहुतांश प्रमाणात हे व्यापार वेगवेगळ्या प्रकाराचे, विविध स्वरूपाचे आणि भिन्न तत्त्वांवर आधारलेले असतात. परदेशात आपल्या संलग्न संस्था आणि/अथवा अनुषंगी कंपन्या स्थापन करणाऱ्या मूळ उत्पादन संस्थेला (Parent Company) बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था (multinational corporation), बहुराष्ट्रीय उपक्रम (transnational corporation) असे म्हणतात.

आर-इ.केव्हज यांनी बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थेची केलेली व्याख्या अशी आहे. ''कमीत कमी दोन देशात उत्पादन आस्थापनांमध्ये उत्पादनाचे व्यवस्थापन

आणि नियंत्रण करणारा उपक्रम म्हणजे बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था होय.'' एन्.हुड आणि एस्. यंग (Hood N. and young S.) अशी व्याख्या करतात की, ''एकापेक्षा जास्त देशांमध्ये पूर्णपणे अथवा अंशतः उत्पन्न निर्माण करणाऱ्या जिंदगीची मालकी धारण करणारी, तिचे नियंत्रण आणि व्यवस्थापन करणारी संस्था म्हणजे बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था होय''.[52] जे. एच्. डनिंग (Dunning J.H.) या संकल्पनेची व्याख्या वेगळ्या दृष्टिकोनातून मांडतात. त्यांच्या मते,'' एकापेक्षा जास्त देशात विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक करून मूल्यनिर्मिती करणाऱ्या जिंदगीचे नियंत्रण आणि व्यवस्थापन करणारी व्यवसाय संस्था म्हणजे बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था होय.[53] संलग्न संस्थेत अथवा अनुषंगिक कंपनीत तिच्या एकूण भाग भांडवलाच्या दहा टक्के अथवा जास्त गुंतवणूक असली तर मूळसंस्था नियंत्रण प्रस्थापित करू शकते असे मानले जाते. अर्थात त्या उत्पादन संस्थेतील गुंतवणूक किती व्यापक प्रमाणात अपस्कृत (dispersed) आहे त्यावर हे अवलंबून असते. भारतात असलेल्या व्यवसाय संस्थेत त्या संस्थेच्या भागभांडवलाच्या दहा टक्के इतकी विदेशी व्यवसाय संस्थेची गुंतवणूक असली तर ती विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक मानली जाते.

भारतीय व्यवसाय संस्थांपैकी अनेक संस्था बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था आहेत. आज त्यांची संख्या साधारणपणे दोन हजारच्या घरात जाते. 2001-03 या दोन वर्षांच्या काळात भारतीय व्यवसाय संस्थांनी विदेशात 120 व्यवसाय संस्था ताब्यात (acquired) घेतल्या. त्यात औषध निर्माण क्षेत्रातल्या व्यवसाय संस्था आघाडीवर आहेत. ऑरबिंदो फार्मा, कॅडिला हेल्थ, रॅनबॅक्सी, डॉ. रेड्डीज लॅबोरेटरी, व्होखार्ट, ही त्यातील उदाहरणे. भारत फोर्ज ही अभियांत्रिकी, बजाज ऑटो, महिंद्र आणि महिंद्र व टाटामोटर्स या वाहन उद्योगातील, इन्फोसीस, विप्रो या माहिती उद्योगातील व्यवसाय संस्था बहुराष्ट्रीय आहेत. एशियन पेंटस् (इंडिया) लिमिटेड या व्यवसाय संस्थेची चोवीस देशात तीस उत्पादन केंद्रे आहेत. विदेशातील भारतात असणाऱ्या बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थांची संख्या नऊ हजाराच्या पुढे आहे. 1991 पासून अमलात आणण्यात आलेल्या आर्थिक सुधारणांच्या कार्यक्रमांत परदेशी संस्थांना भारतात गुंतवणूक करण्यासाठी अनेक प्रोत्साहनपर उपाय योजण्यात आले आहेत. नवनवीन उत्पादन व सेवा क्षेत्रे त्यांना खुली करण्यात आली असून त्यात परदेशी बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थांना जास्त प्रमाणात गुंतवणूक करण्याची मुभा देण्यात आली आहे. उदाहरणार्थ, दोन फेब्रुवारी 2005 रोजी भारतीय दूर संचार विभागात परदेशी व्यवसाय संस्थाना 49 टक्क्यांऐवजी 74 टक्के भांडवल गुंतवणूक करण्यास परवानगी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पाश्चिमात्य देशातील अनेक बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थांना भौगोलिक दृष्ट्या भारत हा देश मध्यवर्ती उत्पादन केंद्र म्हणून जास्त योग्य वाटतो. 'इकॉनॉमिस्ट' या नियतकालिकाने गेल्या वर्षी (2004) केलेल्या देशाच्या-धोका घटक विश्लेषणाच्या पहाणीत भारताला 'ब' गटात स्थान मिळाले आहे.[54] जगातील आघाडीच्या अनेक उद्योग संस्थानी आपल्या उपकंपन्या भारतात स्थापन केल्या आहेत.[55]

मूळ संस्थेने अशा प्रकारे संलग्न संस्था आणि /अथवा अनुषंगी स्थापन करण्यात

गुंतविलेले भांडवल तसेच परदेशातील अस्तित्वात असलेली उत्पादन संस्था आपल्या संस्थेत विलीन करण्यासाठी (merger) अथवा संपादन करण्याकरीता (acquisition) केलेली गुंतवणूक म्हणजे विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक होय. (foreign direct investment) मूळउत्पादन संस्थेने परदेशातील प्रत्यक्ष गुंतवणुकीवर मिळविलेला लाभांश स्वदेशात न आणता संलग्न संस्थेत गुंतविल्यास तीही विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक होय. मूळउत्पादन संस्थेकडून संलग्न संस्थेने घेतलेले कर्ज ही सुध्दा परदेशातील प्रत्यक्ष गुंतवणूक होय. मात्र व्यक्तिनी अथवा वित्तीय संस्थांनी व्याजदायी रोख्यांमध्ये (bonds) अथवा समभागांमध्ये (equity shares) दुय्यम बाजारपेठेत केलेली गुंतवणूक म्हणजे रोखारुपी गुंतवणूक (port folio investment) होय. या दोन्ही प्रकारच्या गुंतवणुकीचे स्वरुप, कालावधी व उद्देश वेगवेगळे असतात. लाभांश व व्याज या सारख्या वित्तीय लाभासाठी रोखारुपी गुंतवणूक केली जाते.शिवाय हुंडणावळीच्या दरातील बदलांचा लाभ घेण्याचाही उद्देश असतो. अशा जिंदगीवरील वेगवेगळ्या देशामधील प्राप्तींच्या दरामध्ये फरक असल्यामुळे रोखारूपी गुंतवणूक केली जाते. ज्या देशातील बचत गुंतवणुकीच्या संधीपेक्षा जास्त असते अशा भांडवल-बहुल देशातून ज्या देशातील बचत अपुरी पडते अशा भांडवल-दुर्मिळ देशात गुंतवणूक केली जाते. नवअभिमत अर्थशास्त्र संप्रदायाच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या प्रतिमानाप्रमाणे भांडवल-बहुल देशातून भांडवल दुर्मिळ देशात भांडवलाचा ओघ वहातो. भांडवलाच्या अशा प्रवाहामुळे त्या देशातील नैसर्गिक कच्च्या मालाचा उपयोग झाल्यामुळे उत्पादन वाढते; रोजगार वाढल्यामुळे मागणी वाढते; बाजारपेठ विस्तार पावते, देशाचा विकास होतो.

दुसऱ्या महायुध्दानंतर विशेषत:1951 नंतर रोखारुपी गुंतवणुकीपेक्षा परदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीचे प्रमाण वाढू लागले. उत्पादन संस्था दुसऱ्या देशात उत्पादन सुविधा स्थापन करण्यासाठी परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक करतात. उत्पादन संस्थेला आपले व्यवहार वाढवावयाचे असतात. स्वदेशात उत्पादन करुन त्या वस्तू परदेशात निर्यात करण्यापेक्षा परदेशात वस्तू उत्पादन करणे जास्त हितकर ठरते. त्यासाठी परदेशात एखादी नवीन अनुषंगी संस्था स्थापन केली जाते. यालाच हिरव्या कुरणांचे साहस (green field venture) असे म्हणतात. काही वेळा परदेशात कार्यरत असलेल्या उत्पादन संस्थेचे समभाग विकत घेऊन त्या संस्थेत नियंत्रक हितसंबंध प्रस्थापित केले जातात अथवा मूल्यांकन करुन अशी उत्पादन संस्था विकत घेतली जाते. याला सम्मीलीकरण (merger) आणि संपादन (acquisition) असे म्हणतात. साधारणपणे उत्पादन संस्थेचे दहा ते वीस टक्के समभाग विकत घेऊन नियंत्रक हितसंबंध प्रस्थापित करता येतात. रोखारुपी गुंतवणुकीत फक्त वित्तीय साधनांचे हस्तांतरण होते. विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीत फक्त वित्तीय साधनांचे हस्तांतरण होते. विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीत उत्पादन साधनांची सरसकट देवघेव होत असते. त्यात विविध घटक असतात. विदेशी उत्पादन संस्थेची मालकी, व्यवस्थापन विशेष ज्ञानाची तरतूद आणि तंत्रज्ञानाचे हस्तांतरण असे प्रमुख घटक असतात. त्यामुळे रोखारुप गुंतवणुकीपेक्षा

प्राप्य देशाला (receipient country) विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक जास्त लाभकारक ठरते. प्राप्य देशाला उत्पादन साधने मिळत असल्यामुळे त्या देशाच्या आर्थिक वाढीचा दर वाढतो. दोन्ही प्रकारच्या गुंतवणुकीमुळे व्यवहार तोलावरील परिणाम लाभदायक असला तरी विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीच्या सहाय्याने निर्यात वाढत असल्यामुळे अथवा आयात पर्यायी वस्तुंचे उत्पादन होत असल्यामुळे प्राप्य देशाला जास्त लाभ होतो.

भारतात विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक खालील चारमार्गाने करण्यास परवानगी आहे.1) वित्तीय सहयोग (Collaboration) 2) संयुक्त प्रकल्प व तांत्रिक सहयोग, 3) युरोपात भाग भांडवल विकत घेऊन व भांडवली बाजारपेठेतून भाग भांडवल विकत घेऊन, 4) समभागांच्या खाजगी पुर:स्थापन (placement) करुन अथवा अधिमान्य नियतवाटप (preferential allotment) करुन. या वर्षी झालेल्या दोन परदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकींचा उल्लेख करणे योग्य होईल. गुडलेस नेरॉलॅक पेंट लिमिटेड या रंग उत्पादक संस्थेचे मुंबईतील संयंत्र (plant) केन्साई पेंट या जपानी कंपनीने 104.27 कोटी रुपयांना विकत घेतला.[56] होल्डरिंड इन्व्हेस्टमेंटस लिमिटेड ही मॉरिशसमधील व्यवसाय संस्था होल्डसेम सिमेंटस प्रायव्हेट लिमिटेड भारतातील व्यवसाय संस्था मिळून एसोसिएटेड सिमेंट कंपनीज लिमिटेड या सीमेंट उत्पादन करणाऱ्या उत्पादन संस्थेचे 38.84 टक्के भाग भांडवल अंबुजा सिमेंट इंडिया लिमिटेड तर्फे विकत घेणार आहेत. त्यातून अंबुजा सिमेंट इंडिया लिमिटेड या संस्थेतर्फे होल्डरिंड इन्व्हेस्टमेंटस् लिमिटेड व होल्डसेम सिमेंटस् इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या संस्थांना एसोसिएटेड सिमेंट कंपनीज लिमिटेड मध्ये व्यवस्थापनावर नियंत्रण प्राप्त होईल. विशेष म्हणजे होल्डरिंड इन्व्हेस्टमेंटस् लिमिटेड आणि होल्डसेम सिमेंटस् इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या व्यवसाय संस्था जगातील दोन क्रमांकाच्या सिमेंट उत्पादक होलसिम लिमिटेड या व्यवसाय संस्थेच्या गटातील व्यवसाय संस्था आहेत.[57]

विविध देशातील बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था भारतात विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक करतात त्याच न्यायाने भारतीय बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था परदेशात (विकसित देशात सुध्दा) विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक करतात. या गुंतवणुकीची काही आकडेवारी तक्ता-2 मध्ये दिली आहे.

21 जुलै 1991 पासून भारतात नवीन आर्थिक धोरण राबविण्यास सुरुवात झाली. या धोरणा अंतर्गत अनेक उद्योगांमध्ये परदेशी प्रत्यक्ष

**तक्ता क्र . 2**

**भारतातील व भारताची परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक**

| तपशील | 91-92 | 92-93 | 93-94 | 94-95 | 95-96 | 96-97 | 97-98 | 98-99 | 99-2000 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भारतात आलेली गुंतवणूक | 316 | 965 | 1838 | 4126 | 7172 | 10015 | 13220 | 10358 | 9338 |
| भारताने केलेली गुंतवणूक | -11 | 24 | 41 | 83 | 117 | 239 | - | - | - |

गुंतवणुकीला भारतात विनापरवाना (automatic) प्रवेश करण्याची मुभा देण्यात आली. अतिप्रगत तंत्रज्ञान आणि गुंतवणूक प्रधान उद्योगात 51 टक्के परदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीचे प्रस्ताव आपोआप अमलात आणण्यास मुभा देण्यात आली. नवीन खाजगी बँकांना त्यांच्या भागभांडवलाच्या वीस टक्के भाग भांडवल विदेशी संस्थात्मक गुंतवणुकदारांकडून गोळा करण्याची मुभा देण्यात आली. अनिवासी भारतीयांना आणि परकीय निगम संस्थांना आपले गुंतविलेले भांडवल परत नेण्याच्या सुविधेसह अग्रक्रम उद्योगात शंभर टक्के गुंतवणूक करण्यास परवानगी देण्यात आली. विदेशी गुंतवणूक आपोआप होण्याची क्षेत्रे वगळता अतिप्रगत तंत्रज्ञान, मुख्यत्वे निर्यातीसाठी उत्पादन करणारे प्रकल्प, उर्जा आणि मूलभूत सुविधा प्रकल्प, सल्ला आणि व्यापार या क्षेत्रात शंभर टक्के परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक मंजूर करण्यासाठी परकीय गुंतवणूक संवर्धन मंडळ स्थापन केले. अशाप्रकारे अनेक उपाय योजून भारताने परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक करण्यासाठी आश्वासक, प्रोत्साहक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला असला तरी शासनाने मंजूर केलेली परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक आणि प्रत्यक्षात करण्यात आलेली गुंतवणूक यात बरीच तफावत राहिलेली आहे.

परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक तीन प्रकारची असू शकते.

**1) समतलीय परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक व समतलीय एकीकृत बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था.**

त्याच वस्तुचे अथवा त्याच वस्तुसमुहाचे उत्पादन करणारी संयंत्रे (Plants) विविध देशात स्थित (locate) असणे म्हणजे समतलीय विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक होय. ब्रिटिश फिजिकल लॅबोरेटरी, जनरल मोटर्स, युनिलिव्हर, प्रॉक्टर अँड गॅम्बल, बजाज ऑटो लिमिटेड, एशियन पेंटस् इंडिया लिमिटेड ही या प्रकारची उदाहरणे होत.

**2) उर्ध्वस्तरीय परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक आणि उर्ध्वस्तरीय एकीकृत बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था -**

वस्तू अथवा वस्तुसमुहातील उत्पादनाच्या विविध प्रक्रिया, अवस्था विविध देशात स्थित असणे म्हणजे उर्ध्वस्तरीय परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक होय. उत्पादन प्रक्रियेतील अगोदरच्या अवस्था दुसऱ्या देशात स्थित करणे ही पश्चांतरण उर्ध्वस्तरीय (backward vertical) परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक होय. पश्चिम युरोपातील रबर उत्पादक उत्पादन संस्थांनी मलेशियातील रबराच्या मळ्यात केलेली गुंतवणूक या प्रकारचे उदाहरण होय. उत्पादन प्रक्रियेतील नंतरच्या अवस्था दुसऱ्या देशात स्थित करणे ही अग्रांतरण उर्ध्वस्तरीय (forward vertical) परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक होय.खनिज तेल उत्पादन संस्था या प्रकारात मोडतात. त्या एका देशात तेलाच्या खाणी चालवितात, दुसऱ्या देशात तेल शुध्दिकरण कारखाने स्थापतात व पेट्रो-केमिकल उत्पादने करणारे व त्यांचे वितरण करणारे एकक (units) वेगवेगळ्या देशात स्थापन करतात. बजाज ऑटो लिमिटेडने तीन चाकी स्वयंचलित वाहनांची जुळणी करणारे एकक इंडोनेशिया , फिलीपिन्स व व्हिएतनाम या देशात उभारले आहेत. या व्यवसाय संस्था उर्ध्वस्तरीय एकीकृत बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था होत.

**3) संगुठीत विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक आणि विविधीकृत अथवा संगुठीत बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था -**

परदेशातील उत्पादन संस्थेतील नियंत्रक हितसंबंध संपादन करुन अथवा समामेलन (amalgamation) करुन विविध वस्तू उत्पादन करणाऱ्या गुंतवणुकीस संगुठीत विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक असे म्हणतात. अशा वस्तू अथवा वस्तुगट मूळसंस्थेच्या उत्पादनाशी संबंधित नसतात. बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था आपल्या व्यवसायाचे विविधीकरण करण्यासाठी असे करतात. सुमिटोमो कॉर्पोरेशन, मित्सुबिशी कॉर्पोरेशन ही अशा प्रकारच्या बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थांची उदाहरणे होत.

ब्रिटिशांनी 19 व्या शतकात भारतात खाणकाम आणि सार्वजनिक सुविधांमध्ये केलेली गुंतवणूक अशा प्रकारची होती. यापैकी साधारणपणे दहा टक्के गुंतवणूक परदेशात अनुषंगी कंपनी (Subsidiary Company) स्थापण्यासाठी करण्यात आली होती. लिव्हर ब्रदर्स (आताची युनिलिव्हर), ब्रिटिश अमेरिकन टोबॅको ही त्याची काही उदाहरणे.

जेट विमानांचा शोध, संदेश पाठविण्याच्या स्वस्त सुविधा, जलद आंतरराष्ट्रीय टपाल पध्दती या घटनांमुळे दुसऱ्या महायुध्दानंतरच्या काळात परदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीत जलद आणि खूप मोठी वाढ झाली. विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीमुळे आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ झाली आहे; नवीन व्यापार निर्माण झाला आहे. असा बहुतेक व्यापार अंतर-व्यवसाय संस्था (intra - firm) व्यापार असतो. अमेरिकन व्यापार मंत्रालयाने प्रकाशित केलेल्या आकडेवारीप्रमाणे अमेरिकेची शंभर टक्के निर्यात आणि 81 टक्के आयात बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थांची असते. अमेरिकन मूळसंस्थांनी आपल्या संलग्न संस्थांबरोबर 1997 मध्ये केलेला व्यापार 3239 कोटी डॉलर्सचा होता व त्याचे अमेरिकेच्या निर्यातीबरोबरचे प्रमाण सव्वीस टक्के होते. अमेरिकन संलग्न संस्थांनी मूळसंस्थेबरोबर केलेला व्यापार 1997 मध्ये 1169 कोटी डॉलर्सचा होता. त्याचे अमेरिकेच्या एकूण आयातीशी असलेले प्रमाण 9.5 टक्के होते. यावरुन परदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीचे आंतरराष्ट्रीय व्यापारातील महत्त्व अधोरेखीत होते.

अगोदरच्या परिच्छेदात अभ्यासलेल्या तीन प्रकारच्या विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीतून आंतरराष्ट्रीय व्यापार का व कसा निर्माण होतो याचे सैध्दांतिक स्पष्टीकरण पुढे केले आहे.

**अ) समतल विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक -** अशा प्रकारच्या विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीतून आंतरराष्ट्रीय व्यापार का व कसा निर्माण होतो याचे विवेचन करणारे चार सिध्दांत पुढे दिले आहेत.

1) **वस्तू अस्तित्व चक्र सिध्दांत -** लेखांक-एक मध्ये पाचव्या भागात रेमंड व्हेर्नोन यांचा वस्तू जीवन चक्र (Product life cycle) सिद्धांत विशद केला आहे. वस्तू विकासाच्या प्रमाणीकरणाच्या प्रावस्थेत पोहोचल्यानंतर वस्तू निर्यात करताना परदेशातील प्रशुल्क व प्रशुल्केतर अडथळे टाळण्यासाठी वाहतूक खर्च वाचविण्यासाठी बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था परदेशात संलग्न संस्था आणि/अथवा अनुषंगी

कंपनी स्थापन करुन तेथेच उत्पादन करते. ही वस्तू नवीन असल्यामुळे बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थेला लाभ मिळत असतो. अशा वस्तुंचे सुटेभाग (Components) स्वदेशात अथवा किमान परिव्यय असलेल्या ठिकाणी उत्पादन करून मागणी सघन असलेल्या देशात स्थापन केलेल्या जुळवणी केंद्रात पाठविले जातात. यातून अंतर-व्यवसाय संस्था (intra - firm) आंतरराष्ट्रीय व्यापार निर्माण होतो. आर.इ.केव्हज (Caves R.E.) यांनी, बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थेला परदेशात उत्पादन सुविधा स्थापन करण्यात मिळणाऱ्या तीन लाभांचा उल्लेख केला आहे.[58] बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थेला अशी वस्तू उत्पादन करण्याचे अथवा कमी परिव्ययात उत्पादन करण्याचे तंत्रज्ञान अवगत असल्यामुळे परदेशात वस्तू उत्पादन करण्यात लाभ मिळतो. बऱ्याच वेळा अशा तंत्रज्ञानाचे अथवा वस्तुचे एकस्व (Patent) घेतलेले असल्यामुळे हा लाभ बऱ्याच काळपर्यंत अनुभवता येतो. केव्हज यांच्या मते, बहुराष्ट्रीय व्ययसाय संस्थेने विपणन विषयक विशेष कौशल्य विकसित केलेले असते. त्यामुळे आपल्या वस्तुचे विभेदन (differentiation) ती संस्था जास्त प्रभावीपणे करू शकते. चिन्हांकन (brand name) व व्यापार चिन्ह (trade mark) या घटकांमुळे वस्तू विभेदन जास्त उठावदार करता येते. बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थांनी 'संशोधन आणि विकास' या अंतर्गत खूप ज्ञान प्राप्त केलेले असते; मिळविलेले असते, साठविलेले असते. व्यवसाय संस्थेची ही अमूर्त मत्ता असून ती अविभाज्य असते. असे ज्ञान परदेशात पुरविण्याचा सीमांत परिव्यय शून्य असतो. मात्र हे ज्ञान परदेशात संलग्न संस्था अथवा अनुषंगी कंपनीच्या माध्यमातून उपयोगात आणल्यास त्यापासून मिळणारा महसूल व सीमांत प्राप्ती खूप जास्त असते. औषध उत्पादनासारख्या ज्ञान सघन उद्योगात तर याचा खूपच लाभ होतो. जे. एच्. डनिंग व आय. एफ्. पीयर्स (Dunning J.H. and Pearce I.F.) यांच्या संशोधनातून आर. इ. केव्हज यांच्या विधानांना पुष्टी मिळाली आहे.

रेमंड व्हेर्नोन यांच्या वस्तू जीवन चक्र सिद्धांतातून व आर. इ. केव्हज यांच्या त्या पुढील अभ्यासातून असे सिद्ध होते की बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था वस्तू विकासाच्या प्रमाणीकरण प्रावस्थेत परदेशात आपल्या नवीन वस्तुबाबत दबदबा निर्माण करून तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरातून उत्पादन परीव्यय घटवून, विभेदन प्रभावीपणे करून व आपल्याकडील ज्ञानाच्या जोरावर उच्च प्रतीच्या वस्तू उत्पादन करून अंतर-व्यवसाय संस्था आंतरराष्ट्रीय व्यापाराला चालना देतात.

बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था आपण विकसित केलेल्या वस्तू प्रमाणीकरण प्रावस्थेत असताना दुसऱ्या देशात उत्पादन करण्यास सुरूवात करतात ही बाब प्रत्यक्षात आढळून येत नाही. विकसित केलेली नवीन वस्तू उत्पादन प्रावस्थेतच कमी उत्पादन परिव्यय असणाऱ्या ठिकाणी उत्पादन करण्याचे बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थांचे धोरण असते. अशी वस्तू एकाच वेळी अनेक देशात प्रविष्ट (launch) केली जाते. बहुतेक सर्व विकसनशील देशातील तंत्रज्ञानातील तफावत आता नष्ट होत आली असल्यामुळे आर. इ. केव्हज यांनी वर्णन केलेला लाभ बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थांना आता मिळत नाही.

**2) बाजारातील अपूर्णतेचा सिद्धांत -**

दोन्ही देशातील बाजारपेठा पूर्ण स्पर्धात्मक असतील तर बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थांच्या विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीतून आंतरराष्ट्रीय व्यापार निर्माण होणार नाही. बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थेला पूर्ण स्पर्धात्मक बाजार-पेठ असलेल्या देशात आपल्या उत्पादन सुविधा स्थापन करताना अनेक अडचणी येतात. बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थांना स्थानिक उत्पादन संस्थां बरोबर स्पर्धा करताना परिव्ययात नुकसान (disadvantages) सोसावे लागते. स्थानिक उत्पादन संस्थांना स्थानिक बाजारपेठेतील खाचाखोचा, चालीरीती, कायदे-कानून यांची चांगली माहिती असते; त्यांना हुंडणावळीच्या दरातील चढ-उताराना तोंड द्यावे लागत नाही. शिवाय राष्ट्रीय शासन स्वदेशी उद्योग-संस्थांना अनुकूल अधिमान (Preferential treatment) देते. बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थेला विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक करून उत्पादन सुविधा स्थापन करावयाच्या असतील तर स्थानिक उत्पादन संस्थांचे हे सर्वलाभ प्रतितोल (offset) करणारे घटक अथवा लाभ त्या संस्थेला प्राप्त झाले पाहिजेत. बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थेजवळ असलेले ज्यादा व्यवस्थापकीय कौशल्य, अंतर्गत स्रोतातून जमा झालेले पण वापरता न येणारे वित्तीय निधी, या व्यवसाय संस्थेच्या व्यवस्थापकांकडील व सेवकांकडील ज्ञान, विविध देशात संयंत्रे चालविण्यात प्राप्त होणारी अनुमापी अनुकूलता, मोठ्या व्यवसाय संस्थेला बाजारपेठेतील चढउतारांना सहज तोंड देता येण्याची क्षमता यामुळे बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था दुसऱ्या देशात उत्पादन सुविधा स्थापन करून तेथील स्थानिक उत्पादन संस्थांना नामोहरम करू शकते.

आपल्या या सामर्थ्याचा लाभ घेऊन बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था तेथील स्पर्धेवर अग्रक्रयाधिकार (preempt) स्थापन करते अथवा तेथील उत्पादन संस्था गिळंकृत (swallowing up) करते. त्यामुळे बाजार पेठेतील स्पर्धा अपूर्ण अथवा विरूपित (distorted) होते व बहुराष्ट्रीय उत्पादन संस्थेला मक्तेदारी अथवा अल्पजनाधिकार ताकद प्राप्त होते. एस्. हायमर आणि सी. पी. किंडलबर्जर (Hymer s. and Kindle berger C.P.)[60], पी. जे. बकले आणि एम्. कॅसन (Buckley P.J. and Casson M)[61] यांचे प्रतिपादन असे आहे, की कच्चा मालाचा पुरवठा उत्पादनाच्या प्रक्रिया, वितरण या बाबी बाहेरच्या विविध व्यवसाय संस्थांनी केल्यास व्यवसायात अनिश्चितता येते. बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था या बाबी आपल्या ताब्यात घेऊन आपली ताकद प्रस्थापित करते व अनिश्चितता कमी करते.

बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था अशा प्रकारे अपूर्ण स्पर्धात्मक बाजारपेठेत आपले बस्तान बसवून उत्पादनातील विविध प्रक्रिया वेगवेगळ्या देशात करण्याच्या सुविधा निर्माण करतात. अर्धसिद्ध मालाची वाहतूक एका देशातून दुसऱ्या देशात केल्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार वाढतो. म्हणजे बाजारपेठेतील अपूर्णता परदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय व्यापार निर्माण करते; वाढविते. एफ्. टी. क्निकरबोकर (Knicker boker F.T.)[62] असे म्हणतात की, अशा अपूर्ण स्पर्धात्मक अथवा अल्पजनाधिकार बाजारपेठांमध्ये उत्पादन संस्थांमधील परस्परावलंबित्व आणि अनिश्चितता यावर

बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था आपल्या बचावात्मक तसेच लढावू (aggressive) डावपेचांच्या आधारे मात करतात. त्यातून त्यांना परदेशातील उत्पादन सुविधा यशस्वी करता येतात. मात्र असे लाभ उत्पादन संस्था-विनिर्दिष्ट (firm - specific) अथवा मालकी हक्क-विनिर्दिष्ट (ownership specific) असतात.

**3) व्यवहारार्थी दृष्टिकोन सिद्धांत-**

आर. इ. केव्हज आणि एच्. जी. जॉन्सन (Caves R.E and Johnson H.G.)[63] यांनी असे स्पष्टीकरण दिले आहे की विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक पाच घटकांमुळे होत असते. ते घटक असे—

अ) व्यवसाय संस्थेकडील बरीच अमूर्त जिंदगी अविभजनीय (lumpy) स्वरूपाची असते; बऱ्याच वेळी तिचा पूर्ण वापर करून घेतला जात नाही. व्यवसाय संस्थेकडील व्यवस्थापकीय क्षमता त्यापैकीच होय. परदेशात संलग्न अथवा अनुषंगी कंपनी स्थापन करून या अतिरिक्त व्यवस्थापन क्षमतेचा पुरेपूर वापर करून घेता येतो.

ब) अवितरीत नफ्यातून साठविलेला निधी अस्तित्वात असलेल्या उत्पादन पद्धतीत वापरता येत नाही; व्यवसाय संस्थेच्या विस्तारात सुद्धा त्याचा उपयोग करणे शक्य नसते. बाहेरून कर्जाऊ घेतलेल्या निधीच्या मानाने या निधीचा विकल्पी खर्च अत्यल्प असतो. असा निधी फायदेशीररित्या गुंतविण्याचा विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक हा लाभकारी मार्ग आहे.

क) व्यवसाय संस्थेजवळ असलेली वेगळी न करता येण्याजोगी अमूर्त जिंदगी वापरण्यासाठी विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक हा हितकारी मार्ग आहे. व्यवसाय संस्थेच्या सेवेत असलेल्या व्यवस्थापकांच्या आणि सेवकांच्या कौशल्याचा (expertise) यात समावेश होतो. परदेशात उत्पादन सुविधा स्थापन करून त्यांचा लाभदायी उपयोग करून घेता येतो. बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था विविध देशात अनेक संयंत्रे (Plants) स्थापन करून अनुमापी अनुकूलता प्राप्त करून घेऊ शकते. कच्चा माल आणि श्रमशक्ती अल्प दरात मिळणाऱ्या देशात उत्पादनाच्या प्राथमिक प्रक्रिया करणारे संयंत्र स्थापन करता येते. अशा अवाढव्य व्यवसाय संस्था तेजीमंदीच्या आवर्तनावर सहज स्वार होऊ शकतात. शिवाय कमी मागणी झालेल्या देशातून जास्त मागणी असलेल्या देशात वस्तू पाठवून मालाचा उठाव करू शकतात.

इ) अनेक संयंत्रे असलेली व्यवसाय संस्था विशेषीकरणातून उत्पादनांची विविधता साधतात. शिवाय त्यामुळे परिव्ययात बचत होते.

बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थांच्या परदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीचे हे स्थितिक (Static) विश्लेषण होय. समतलीय विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक हा व्यवसाय संस्थांनी आपल्या विकासाच्या प्रक्रियेत ठराविक टप्प्यावर घेतलेला व्यूहरचनात्मक निर्णय असतो. व्यवसाय संस्थांच्या विकास साधण्यातील गतीशील प्रक्रियेचा एक भाग म्हणून परदेशात उत्पादन करण्याच्या निर्णयाचे विश्लेषण करणे जरूरीचे आहे. आर. इ. केव्हज यांचा व्यवहारार्थी दृष्टिकोन (transactional approach) निगम संस्थांच्या विकासाचे विश्लेषण करू शकत नाही. व्यवसाय संस्था प्रथमत: देशांतर्गत बाजारपेठेत विस्तार पावतात. आपल्या उत्पादनात

त्या स्वतःची काहीतरी खासीयत निर्माण करीत असल्यामुळे त्यांच्या विक्रीत वाढ होते. परदेशातील बाजारपेठांची माहिती मिळविण्याच्या फारशा संधी दृष्टीपथात नसतात. प्रतिस्पर्धी व्यवसाय संस्थांचा बाजारपेठेतील हिस्सा हिसकावून घेऊनच विक्री वाढविणे शक्य असते. पण त्यातून प्रतिस्पर्धी व्यवसाय संस्थाना दुखविण्याचा व किंमत कमी करावी लागण्याचा धोका पत्करावा लागतो. म्हणून व्यवसाय संस्था विदेशात विपणनाच्या नवीन संधी शोधू लागतो. प्रथम आपल्या देशातल्या सारखी संस्कृती, भाषा, चालीरीती असणाऱ्या देशात संलग्न संस्था स्थापन केल्या जातात. कारण अशा देशातून माहिती प्राप्त करण्याचा खर्च अल्प असतो. व्यवसाय संस्थेजवळ स्वतःची खासीयत असलेल्या काही अविभक्त अमूर्त जिदंगीचे संस्था विनिर्दिष्ट (firm - specific) लाभ असल्यामुळे परदेशातील जादा खर्चावर मात करून ती आपले वर्चस्व प्रस्थापित करू शकते.

बजाज ऑटो लिमिटेड या तीन चाकी स्वयंचलीत वाहाने उत्पादन करणाऱ्या व्यवसाय संस्थेची प्रगती जवळ जवळ अशीच आहे. भारतात 1980 नंतर स्वयंचलित दुचाकी व तीन चाकी वाहने उत्पादन करण्याचे परवाने इतर उत्पादक संस्थांनी मिळविल्यावर भारतीय बाजार पेठेतील उत्पादन वाढीच्या संधीवर मर्यादा आली. त्यामुळे या व्यवसाय संस्थेने भारतासारखी परिवहन परिस्थिती असणाऱ्या इंडोनेशिया, फिलीपीन्स वगैरे देशातही वाहने निर्यात करण्यास सुरूवात केली. 2003-2004 या वर्षात एकूण उत्पादनाच्या 28.7 टक्के तीन चाकी स्वयंचलित वाहने बजाज ऑटो या संस्थेने निर्यात केली (2003-04 मधील तीन चाकी स्वयंचलित वाहनांचे उत्पादन 2,29,182 इतके होते तर 65797 तीन चाकी स्वयंचलित वाहने निर्यात केली गेली.) पुढील पायरी म्हणून या व्यवसाय संस्थेने इंडोनेशिया, फिलीपीन्स, व्हिएत नाम या देशातही वाहने उत्पादन करण्याच्या सुविधा स्थापन केल्या आहेत.

परदेशात वस्तू निर्यात करण्यापेक्षा तेथे वस्तू उत्पादन करून विकणे जास्त लाभकारक असते. आर. इ. केव्हज हा स्थान निश्चयनाचा (locational) लाभ विचारात घेत नाहीत. परदेशात प्रत्यक्ष गुंतवणूक करण्यासाठी वस्तू उत्पादन करण्याचे संस्था-विनिर्दिष्ट (firm - specific) लाभ ही आवश्यक अट असली तरी ती पुरेशी अट ठरू शकत नाही. परदेशात वस्तू उत्पादन करण्याच्या सुविधा स्थापन करताना अनुलंघनीय प्रशुल्क दर, वाहतुकीचा अतिरिक्त खर्च, मजुरीचे स्वस्त दर, शासकीय अनुदाने, कर प्रोत्साहके (tax incentives) या सारखे अनेक घटक विचारात घेतले जात असतात. परदेशात प्रत्यक्ष गुंतवणूक करीत असताना बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था स्थान निश्चयनाच्या लाभाला विशेष महत्त्व देतात या मुद्याची गुंफण केव्हज यांच्या सिद्धांतात होणे जरूरीचे आहे. या लाभामुळेच बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था दुसऱ्या एखाद्या देशाऐवजी ठराविक देशात गुंतवणूक करतात. हा मुद्दा आजच्या कमी झालेल्या वाहतुकीच्या खर्चाच्या आणि घटत्या व्यापाररोधाच्या (trade - barriers) संदर्भात महत्त्वाचा ठरतो.

### 4) बहुविध उत्पत्ती साधन निवडीचा सिद्धांत-

समतलीय परदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीच्या बाबतीत उद्भवणाऱ्या तीनही बाबी एकत्र

विचारात घेऊन बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक 'का करतात', 'कशी करतात', आणि 'कोठे करतात' याचे सम्यक विवेचन जे. एच्. डनिंग (Dunning J.H.) यांनी आपल्या सिद्धांतात केले आहे.[64] डनिंग यांच्या म्हणण्याप्रमाणे उत्पादन संस्थेला एकाच वेळी मालकी-विनिर्दिष्ट (ownership-specific), स्थान-विनिर्दिष्ट (location-specific) आणि अंतर्गतीकरणाचे (internalisation) असे तीनही लाभ मिळतात तेव्हा बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था समतलीय विदेशी गुंतवणूक करतात. या लाभांचे थोडक्यात स्पष्टीकरण असे-

**1) मालकी-विनिर्दिष्ट लाभ** (ownership - specific advartage) -

व्यवसाय संस्थेजवळ गाभा प्रभुत्वासारखी (core competence) काही अमूर्त, अव्यक्त (tacit) जिंदगी असते. ती त्या संस्थेच्या व्यक्तिगत मालकीची असून तिची नक्कल करणे दुसऱ्या व्यवसाय संस्थांना अशक्य असते. अशा जिदंगीची नक्कल करणे बेकायदेशीर सुद्धा असते. परदेशातील व्यवसाय संस्थांना असलेल्या 'बाजारपेठेचे ज्ञान' या सारख्या लाभांवर गाभा प्रभुत्वाच्या सहाय्याने मात करता येते. एकस्व (Patent) व्यापार चिन्ह (trade mark) व्यवस्थापकीय क्षमता, संघटनात्मक व बाजारपेठ विषयक विशिष्ट कौशल्ये, नवप्रवर्तनाची क्षमता, कार्यकृती-ज्ञान (Know - how) ही मालकी-विनिर्दिष्ट प्रभुत्वाची उदाहरणे होत. पी. बकले आणि एम्. सी. कॅसन (Buckley P. and Casson M.C.)[65] अशा लाभांना तंत्रज्ञान-परिष्कृत (technology sophistication) लाभ असे संबोधतात. उत्पादन साधनाच्या उत्पादन क्षमतेच्या आधारे हा लाभ मोजता येतो. एस्. डब्ल्यू. डेविस आणि बी. आर. लायॉन्स (Davies S.W. and Lyons B.R.) यांनी [66] इंग्लंड मधील व्यवसाय संस्थांची तंत्रज्ञान विभेदनातून (technology difference) उत्पन्न होणारी उत्पादन साधनांच्या उत्पादन-क्षमतेतील तफावत मोजली. त्यांच्या अभ्यासाचा निष्कर्ष असा होता की, देशीय उत्पादन क्षेत्रातील व्यवसाय संस्थांच्या मानाने परदेशी व्यवसाय संस्थांमधील उत्पादन क्षमता पंचवीस टक्के जास्त असते.

मालकी विनिर्दिष्ट लाभातून अंतर्गतीकरणाची प्रेरणा मिळते. एखादा व्यवहार व्यवसाय संस्थेतच कमी खर्चात करता येत असेल असे प्रभुत्व आपल्याजवळ असल्यास ते दुसऱ्या संस्थेला विकण्यापेक्षा अथवा पट्ट्याने देण्यापेक्षा (lease out) त्याचा स्वत: वापर करून तो व्यवहार करणे लाभदायक ठरते. व्यवसाय संस्थेच्या मालकीची मूल्यवर्धिकरणाची साखळी आणि निगम शासन किती अधिक कार्यक्षमतेने कार्यान्वित करता येते यावर हे अंतर्गतीकरण 'कसे करता' येईल ते अवलंबून असते. व्यवसाय संस्थेचे भिन्नस्तरीय एकीकरण पुरवठ्याच्या उगमस्थानाकडे करून म्हणजे अध:स्तर उद्योग एकीकरण (backward integration) करून तसेच ग्राहकाकडे अग्रस्तर उद्योग एकीकरण (forward integration) करून साध्य करता येते. हे दोन्ही प्रकार, व्यवसाय संस्थेचे भिन्नस्तरीय एकीकरण (Vertical integration) म्हणून संबोधले जातात.

आंतरराष्ट्रीय पातळीवर उत्पादन करण्यासाठी बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थेकडे फक्त मालकी विनिर्दिष्ट लाभ असणे ही आवश्यक बाब असली तरी ती पुरेशी नसते. त्या बरोबर व्यवसाय संस्थेकडे स्थान-विनिर्दिष्ट लाभ असणे आवश्यक आहे. स्थान-विनिर्दिष्ट लाभामुळे व्यवसाय संस्थेला देशीय स्थानापेक्षा परदेशात उत्पादन करणे हितकारक ठरते.

**2) स्थान-विनिर्दिष्ट लाभ (location - specific advantage)** –

बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थेला आपल्या देशात अथवा दुसऱ्या पर्यायी ठिकाणी उत्पादन सुविधा स्थापन करण्यापेक्षा ही संस्था ज्या देशात गुंतवणूक करते त्या देशात विशिष्ट आणि आकर्षक लाभ मिळत असणे जरूरीचे आहे. स्थान-विनिर्दिष्ट लाभांचे विवेचन केले असता बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक 'कोठे' करतात याचे उत्तर मिळते. श्रमांसारख्या उत्पादन घटकांची उत्पादन क्षमता व त्यांची किंमत (मजुरीचे दर) वाहतूक व दळणवळण साधनांसारख्या मूलभूत सुविधांची गुणवत्ता, करांचे कमी दर शासकीय प्रोत्साहने, देशाच्या अर्थव्यवस्थेची समाधानकारक स्थिती, राजकीय स्थैर्य, हुंडणावळीचे तौलनिकदृष्ट्या स्थिर दर, मोठी व सतत वाढत जाणारी बाजारपेठ या सारखे घटक स्थान निश्चितीचे विविध पैलू होत. असे स्थान-विनिर्दिष्ट लाभ मिळत असलेल्या देशात बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था उत्पादन सुविधा स्थापन करून तेथून वस्तुची देशोदेशी निर्यात करतात व त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार वाढतो.

**3) अंतर्गतीकरणाचे लाभ (internalisation advantage)**

एकाच बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थेच्या विविध संलग्न तसेच अनुषंगी कंपन्या स्थापन करून त्यांच्या कडून उत्पादनाच्या विविध प्रक्रिया करून घेण्यात लाभ असणे म्हणजे अंतर्गतीकरणाचे लाभ होत. त्यामुळे वस्तुची गुणवत्ता समान राखता येते; विस्तारित पुरवठा साखळीचे लाभ (advantages of extended supply chain) वाढविता येतात; उत्पादनातील सदोष नगांचे प्रमाण सहा-सीग्मा (six - sigma) पातळीच्या खाली राखता येते, व्यवसाय संस्थेतील कार्यसंस्कृती विकसित करता येते असे अंतर्गतीकरणाचे अनेक लाभ आहेत. पण या सर्वापेक्षा महत्त्वाचा लाभ म्हणजे हस्तांतरण किंमत (transfer price) ठरविण्यातील लाभ होय. व्यवसाय-संस्था-अंतर्गत व्यवहारांसाठी ठरविलेली किंमत म्हणजे हस्तांतरण किंमत होय. मूळव्यवसाय संस्था व तिच्या संलग्न संस्था यामध्ये अथवा एकाच व्यवसाय संस्थेच्या दोन संलग्न संस्थांमध्ये झालेल्या वस्तुंच्या व्यापाराची किंमत म्हणजे हस्तांतरण किंमत होय. ही किंमत त्याच वस्तुच्या अथवा उत्पादनाच्या सुट्या भागाच्या बाजारपेठ किंमती पेक्षा (arms - length transaction) खूप वेगळी असते; कमी असते. आंतरराष्ट्रीय व्यापाराचा फार-मोठा भाग अंतर-व्यवसाय संस्था व्यापार असतो. अंतर-व्यवसाय संस्था व्यापारात हस्तांतरण किंमत बाजारपेठ किंमतीपेक्षा कमी आकारली जात असते. हा मुद्दा अभिमत अर्थशास्त्र संप्रदायातील आंतरराष्ट्रीय व्यापार सिद्धांताच्या गृहिताला बाधा आणणारा आहे. बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थांनी बाजारपेठ किंमतीपेक्षा हस्तांतरण किंमत वेगळी

आकारल्यामुळे शासनाच्या हुंडणावळ विषयक धोरणात्मक उपायांची (उदाहरणार्थ-अवमूल्यन) परिणामकारकता कमी होते.

तेव्हा, बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थेला मालकी-विनिर्दिष्ट, स्थान-विनिर्दिष्ट व अंतर्गतीकरणाचे लाभ मिळत असल्यास ती व्यवसाय संस्था परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक करून त्या देशात उत्पादन सुविधा स्थापन करते व अंतर-व्यवसाय संस्था व्यापार वाढतो. हे तीनही लाभ परस्परावलंबी आहेत. बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थेला हे तीनही लाभ एकाच वेळी मिळणे आवश्यक आहे व ते तीनही लाभ सारखेच महत्त्वाचे आहेत. उत्पादन सुविधांच्या स्थानियीकरणाचे निर्णय मालकी-विनिर्दिष्ट लाभाच्या स्वरूपावर आणि एक स्थान दुसऱ्या स्थानापेक्षा किती अंतर्गतीकरणाचे लाभ मिळवून देऊ शकते यावर अवलंबून असतात.

या सिद्धांतात बहुविध उत्पत्ती साधनांचा एक समयावच्छेदेकरून विचार केलेला असल्यामुळे अगोदर अभ्यासलेल्या सर्व प्रतिमानातील दृष्टिकोन यात सामावले गेले आहेत. त्यामुळे डनिंग यांची परिकल्पना, विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीच्या भौगोलिक, क्षेत्रीय व औद्योगिक आकृती-बंधाचे सर्वसमावेशक विवेचन करू शकते.

**ब) उर्ध्वस्तरीय विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक** - उत्पादन प्रक्रियेतील विविध प्रक्रिया करणाऱ्या संलग्न संस्था अथवा अनुषंगी संस्था स्थापन करणे म्हणजे उर्ध्वस्तरीय एकत्रीकरण होय. बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था अशा प्रकारच्या संस्थाची उतरंड स्थापन करून अंतर-व्यवसाय संस्था आंतरराष्ट्रीय व्यापार कसा करतात याचे विवेचन करणारे दोन सिद्धांत पुढे दिले आहेत.

**5) अंतर्गतीकरणाचा सिद्धांत- (internalisation Theory) -**

आर. एच्. कोएस (Coase R.H.) यांनी असे प्रतिपादन केले की विविध कारणांमुळे उद्योग संस्था उत्पादन प्रक्रियेचे विविध टप्पे आपल्या अधिकारात ठेवतात.[67] अशा उर्ध्वस्तरीय एकीकरणामुळे उद्योग संस्थेला अनिश्चिततेवर मात करता येते, धोके टाळता येतात. या प्रतिपादनावर आधारून पी.जे.बकले आणि एम्. कॅसन (Buckley P.J. and Casson M.) यांनी बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थांनी अंगिकारलेल्या अंतर्गतीकरणाच्या धोरणाचा सिद्धांत मांडला.[68] बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था उत्पादन प्रक्रियेतील विविध टप्प्यावरील कामे बाहेरून करून घेण्यापेक्षा स्वत: करणे पसंत करतात. शिवाय आपल्याजवळील विविध भौतिक तसेच अमूर्त जिंदगी दुसऱ्या व्यवसाय संस्थांना विकण्याऐवजी, पट्टेवारीने देण्याऐवजी स्वत: उपयोगात आणणे श्रेयस्कर मानतात. उत्पादन प्रक्रियेतील विविध टप्प्यावरील कामे बाहेरून करून घेणे तसेच आपल्याजवळील भौतिक तसेच अमूर्त जिंदगी विकणे वा पट्टेवारीने देणे हा व्यवहाराचा अकार्यक्षम मार्ग होय. अशा प्रकारे विविध उत्पादन प्रक्रियांच्या अंतर्गतीकरणाचे काही परिव्यय विचारात घ्यावे लागत असले तरी त्याचे लाभ जास्त असल्यामुळे उत्पादन प्रक्रियांच्या अंतर्गतीकरणाला अधिमान्यता असते. बकले आणि कॅसन यांच्या मते अंतर्गतीकरणाचा सिद्धांत सर्व प्रकारच्या परदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीचे विश्लेषण करीत असला तरी अनेकांच्या मते हा

सिद्धांत उर्ध्वस्तरीय विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीचे जास्त प्रत्ययकारी स्पष्टीकरण देतो. कॅसन यांच्या मते बाजारपेठेतील खालील पाच प्रकारच्या अपूर्णतेमुळे बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थांचे भिन्नस्तरीय एकीकरण (Vertical intergration) घडून येते. त्या पाच प्रकारच्या अपूर्णता अशा-

1) उत्पादन प्रक्रियेतील अनम्यता (rigidily) व अप्रतिक्रमता (irreversibilities) यांच्यावर बाहेरून काम करून घेण्याचे करार मात करू शकत नाहीत. मुख्य उत्पादक संस्थेला उत्पादनाचे सुटे भाग पुरविणाऱ्या दुय्यम (ancillary) उत्पादकाला फार मोठ्या रकमेची स्थिर भांडवलात गुंतवणूक करावी लागते. मुख्य उत्पादक संस्था सुट्या भागासाठी देत असलेल्या किंमतीतून ही गुंतवणूक भरून काढता येत नाही. या विरूद्ध या उत्पादनाचा विक्रेता कमी गुंतवणूक करून सुद्धा खूप नफा मिळवितो. बाहेरून उत्पादन करून घेण्याच्या करारात दुय्यम उत्पादक आणि विक्रेता स्वतंत्र एकक असल्यामुळे विक्रेता आपला नफा दुय्यम उत्पादकाला हस्तांतरित करून त्याचा तोटा भरून काढू शकत नाही. मात्र भिन्नस्तरीय एकीकरण असलेली बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था असल्यास एका विभागाच्या नफ्यातुन दुसऱ्या विभागाचा तोटा भरून काढता येतो. म्हणून विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक करून बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था उत्पादन प्रक्रियेतील सर्व टप्पे अंतर्गत संयंत्रातून पूर्ण करून घेतात.

2) वेगवेगळ्या स्तरावर तसेच वेगवेगळ्या ठिकाणी उत्पादनाच्या विविध प्रक्रिया करण्याच्या केलेल्या करारांमुळे मागणी-पुरवठ्यात झालेल्या बदलांच्या अनुषंगाने या व्यवस्थेत बदल घडवून आणता येत नाहीत. एखाद्या उत्पादनाच्या काही भागाचे उत्पादन करण्याचा करार दुय्यम उत्पादकाबरोबर केलेला असल्यास दुय्यम उत्पादकाला द्यावयाची निविष्टी दुसऱ्या उत्पादनाला असलेली मागणी वाढली म्हणून त्या भागांच्या उत्पादकाकडे हस्तांतरित करता येत नाही. भिन्नस्तरीय एकीकरण असलेली बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था स्वत: हे सर्व उत्पादन करीत असल्यास एका विभागाकडून निविष्टी दुसऱ्या भागाकडे हस्तांतरित करून मागणी-पुरवठ्याचा मेळ घालता येतो. तसेच उत्पादनाच्या विविध भागांचे उत्पादन वेगवेगळ्या ठिकाणच्या उत्पादकांकडे कराराने सोपविले असल्यास त्यांचे हस्तांतरण करणे शक्य होत नाही. पण भिन्नस्तरीय एकीकरण असलेली व्यवसाय संस्था एका विभागाकडून दुसऱ्या विभागाकडे निविष्टी हस्तांतरित करून मागणी-पुरवठ्यात मेळ घालू शकते.

3) दुय्यम उत्पादकाने मक्तेदारी साध्य केली असल्यास तो उत्पादनाच्या सुट्या भागांच्या किंमतीत अवास्तव वाढ करून किंमतीचे विरूपण (distortion) करतो. उत्पादनाचे सुटे भाग उत्पादन करण्याचा करार केलेला दुय्यम उत्पादक मक्तेदार असेल तर तो आपण उत्पादन केलेल्या सुट्या भागांच्या किंमती अवास्तव पातळी पर्यंत वाढवितो. त्यामुळे अंतिम उत्पादनाच्या किंमती वाढतात. मागणी घटते व मुख्य उत्पादन संस्थेचा नफा कमी होतो. उर्ध्व-स्तरीय एकीकरण झालेल्या बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था अनेक देशात स्वत:च उत्पादन करण्याचा निर्णय घेतात.

4) दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात झालेल्या तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे उत्पादन प्रक्रियेचे

अनेक उप-प्रक्रियात विभाजन करता येते. त्यामुळे अर्धसिद्ध उत्पादनांची (inter mediate products) संख्या वाढून नवीन श्रमविभागणी अस्तित्वात आली. आपण केलेल्या गुंतवणुकी मध्ये व उत्पादन प्रक्रियेत सुसूत्रता आणण्यासाठी बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था या सर्व प्रक्रिया स्वत:च पार पाडतात. त्यामुळे अंतर-संस्था आंतरराष्ट्रीय व्यापार वाढतो.

5) वस्तुंवर विविध देशांनी आकारलेल्या करांमुळे बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थेला उत्पादनाच्या सर्व प्रक्रिया स्वत: करणे करांचा बोजा कमी करण्याच्या दृष्टीने श्रेयस्कर वाटते. एखाद्या वस्तुचे सुटे भाग दुय्यम उत्पादकाकडून तयार करून घेऊन आयात केल्यास बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थेला बिजक किंमतीवर (invoice price) आयात कर भरावा लागतो. हे सुटे भाग स्वत:च्या संयंत्रात उत्पादन करून संलग्न संस्थेला पाठविल्यास अथवा संलग्न (affiliate) संस्थेकडून घेतल्यास त्याच्या हस्तांतरण किंमतीचे बिजक (invoice of transfer price) बऱ्याच कमी रकमेचे करता येते. त्यामुळे कर वाचतो.

या पाच कारणांसाठी बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था भिन्न स्तरीय एकीकरण करतात. एका देशातील संयंत्रावर प्रक्रियेचा ठराविक टप्पा पूर्ण करून अंतिम उत्पादनासाठी सुटे भाग आयात करून दुसऱ्या देशात उत्पादन प्रक्रियेचे पुढील टप्पे पूर्ण केले जातात. एल्.जी.इलेक्ट्रॉनिक्स ही व्यवसाय संस्था दूरचित्रवाणी संचाच्या चलचित्र नलिका(Picture Tubes) व शीतपेटीचे कॉम्प्रेसर्स,संबंधित उपकरणे कोरियात उत्पादन करून पुण्याजवळील रांजणगाव येथील कारखान्यात दूरचित्रवाणी संच व शीतपेट्या उत्पादन करून भारतीय बाजारपेठेत विकते. कोकाकोला कंपनी 'कोकाकोला' या शीतपेयाचे अर्क भारतात आणून पुण्यात हे शीतपेय तयार करून भारतीय बाजारपेठेत विकते. प्रॉक्टर अँड गॅम्बल हायजिन अँड हेल्थकेअर लिमिटेड ही दररोजच्या गरजेच्या वस्तू (fast moving Consumer goods - FMCGS) उत्पादन करणारी व्यवसाय संस्था अपमार्जकाचे (detergents) कच्चे घटकपदार्थ (ingrediants) कोरियात उत्पादन करून हरियाणात अपमार्जक तयार करून भारतीय बाजारपेठेत विकते. बजाज ऑटो लिमिटेड ही व्यवसाय संस्था तीन चाकी स्वयंचलित वाहनांची इंजिने व काही सुटे भाग भारतात उत्पादन करून निर्यात करते. या व्यवसाय संस्थेच्या इंडोनेशिया, मलेशिया, व्हिएतनाम या देशात स्थापन केलेल्या अनुषंगी कंपन्यांच्या (subsidiary company) किंवा संयुक्त उपक्रमांच्या (joint venture) संयंत्रात (plants) हे भाग वापरून व तेथील परिस्थितीशी मिळती जुळती तीन चाकी स्वयंचलित वाहन (three wheelers - riskshaw) उत्पादन करून त्या देशांमधील बाजारपेठेत विकते.

**6) आंतरराष्ट्रीयीकरणाचे प्रतिमान** (Internationalisation model) जे-जोहान्सन, जे.इ.व्हाहल्ने आणि पॉल एफ्. विडरशिम (Johanson J., Vahlne J.E and Wiedersheim Paul F.) यांनी स्थानिय उत्पादन संस्था बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थेच्या स्थितीला पोहोचेपर्यंतच्या गतिशील मार्गाचे विश्लेषण

करणारे प्रतिमान मांडले आहे.[69] स्कॅंडेनेव्हियन देशातील या स्वीडीश अर्थशास्त्रज्ञांच्या या संप्रदायाला (School) 'उपासला संप्रदाय' (Uppasala School) असे संबोधले जाते. या लेखकांच्या मते देशीय व्यवसाय संस्था बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थेत विकसित होत असताना चार टप्प्यांचा मार्ग आक्रमित असते. परदेशी बाजार पेठेच्या क्रमशः प्राप्त झालेल्या ज्ञानाच्या आधारे (gradual acquisition of Knowledge) ही संस्था हे यश साध्य करते. अशी व्यवसाय संस्था प्रथम देशातील बाजारपेठेत आपल्या उत्पादनांची विक्री करून आपले स्थान पक्के करते. मग परदेशी बाजारपेठेचे ज्ञान अवगत करून घेऊन आपल्या उत्पादनांची परदेशात निर्यात करते. परदेशी बाजारपेठेतील उपयुक्त माहिती मिळवून आपली उत्पादने विकणारी दुकानांची साखळी स्थापन करते. यामुळे देशांतर्गत व्यापार वाढून आंतरदेशीय अंतर-संस्था व्यापार निर्माण होतो. के. योशिहारा (Yoshihara K.) यांनी केलेल्या अभ्यासातून जपानी व्यवसाय संस्था अशाच चार गतिशील टप्प्यांच्या मार्गातून बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थेच्या पदाला पोहोचल्याचे स्पष्ट झाले आहे.[70] मात्र ए. आय. मिलींग्टन व बी. टी. बेलीस (Millington A.I. and Bayliss B.T.) यांनी 1990 मध्ये व आर. कोझुल-राइट व आर. रोथॉर्न (Kozul - Wright R. and Rowthorn R.) यांनी 1998 मध्ये केलेल्या अभ्यासातून या सिद्धांतात सांगितलेल्या मार्गक्रमणापेक्षा वेगळ्या पद्धती व्यवसाय संस्थांच्या विकासाच्या बाबतीत आढळून आल्या. या लेखकांचे प्रतिपादन असे आहे की जोहान्सन आदी लेखकांनी मांडलेले 'परदेशी बाजारपेठेचे क्रमशः प्राप्त झालेले ज्ञान', आणि 'अनुभवातून मिळालेले ज्ञान' हे दोन मुद्दे बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था परदेशात उत्पादन सुविधा स्थापन करतात या संकल्पनेचे सम्यक (all comprehensive) स्पष्टीकरण देऊ शकत नाहीत. शिवाय अनेक बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था परदेशातील आपल्या उत्पादन सुविधा बंद करून अथवा विकून परत मागे का येतात त्याचे उत्तर या सिद्धांतात सापडत नाही. मिलींग्टन आणि बेलीस यांचे प्रतिपादन असे आहे की, जोहान्सन आदी अर्थशास्त्रज्ञानी विवेचन केलेले 'अनुभवातून मिळणारे ज्ञान' दुसऱ्या देशातून व बाजारपेठामधून मिळू शकते. या व्याप्तीच्या बचतीमुळे (economics of scope) व्यवसाय संस्था जोहान्सन यांनी वर्णन केलेल्या कालक्रमीय प्रक्रियेमधील (Sequential Process) काही मधले टप्पे ओलांडून अथवा चुकवून पुढे जाऊ शकतात. परदेशातील 'बाजारपेठांचे मिळविलेले ज्ञान' ही प्रत्यावर्तीत (reversible) प्रक्रिया नसल्यामुळे गुंतवणूक व निर्गुंतवणूक यांच्यावर प्रभाव टाकणारे आणखी कोणतेतरी घटक असले पाहिजेत आणि त्यांचा शोध घेणे जरूरीचे आहे.

**क) सगुंठीत विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक**-(Conglomerate Foreign direct investment) - गुंतवणुकदार गुंतवणुकीतील धोका कमी करण्यासाठी विविधीकरण (diversification) करतात. गुंतवणुकदारांना धोक्यापासून भय वाटते. म्हणून गुंतवणुकदार गुंतवणुकीवरील परताव्यातील तफावत कमी करण्यासाठी गुंतवणुकीच्या विविध मार्गांची निवड करतात.

तसेच हुंडणावळीच्या दरातील चढउताराच्या धोक्यापासून संरक्षण मिळविण्यासाठी हुंडणावळीच्या दरात किमान चढउतार होणाऱ्या चलनाच्या देशात उद्योजक गुंतवणूक करतात. यातून अंतर-व्यवसाय संस्था आंतरराष्ट्रीय व्यापार कसा निर्माण होतो याचे विवेचन करणारे दोन सिद्धांत पुढे दिले आहेत.

**7) विविधीकरणाचा आणि धोका विभाजनाचा सिद्धांत –**

राजकीय अस्थिरता असलेल्या देशात अथवा आपल्या देशाशी शत्रुत्व असलेल्या देशात बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थेला उत्पादन सुविधा स्थापन करणे धोक्याचे वाटते. अशा परिस्थितीत उत्पादनात विविधता आणून धोका विभागता येतो. ग्रुबेल एच्. जी. आणि पी. जे. लॉईड (Grubel H.G. and LLoyd P.J.) यांच्या मते व्यक्तिला विविध प्रकारच्या समभागात अथवा रोख्यात रोखारूपी गुंतवणूक (portfolio investment) करून धोका टाळणे अशक्य असते.[71] अशा वेळी त्या व्यक्तिंनी 'युनिट ट्रस्ट' सारख्या परस्पर निधीत (mutual fund) अथवा बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थेत बचत गुंतविल्यास धोका विभागता येतो. याच न्यायाने बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था विविध देशात परस्परांशी संबंधित नसलेली उत्पादने तयार करून, विविध देशात उत्पादन सुविधा स्थापन करून उत्पादनात विविधता साधतात व धोका कमीत कमी पातळीवर आणतात. असे करण्यात बहुराष्ट्रीय उत्पादन संस्थेला मागणीत होणाऱ्या चढउतारांपासून संरक्षण मिळते. एखाद्या वस्तुसाठी असलेली मागणी कमी झाली तर होणारे नुकसान वाढती मागणी असलेल्या दुसऱ्या वस्तुचे उत्पादन वाढवून भरून काढता येते. नोकरीची शाश्वती आणि स्थिर उत्पन्नाची अपेक्षा असणाऱ्या व्यवस्थापकांना अशा व्यवसाय संस्था सुरक्षित वाटतात. गुंतवणुकदारांची व भागधारकांची अपेक्षाही स्थिर व्यवसाय संस्थेत गुंतवणूक करून ठराविक उत्पन्न मिळविण्याचीच असते. ॲलन रूगमन (Rugman Alan) यांच्या मते विविधीकरण करणाऱ्या अशा बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था विविध जिंदगीचे विविधीकरण करण्याचे उसने साधन (Surrogate Vehicle) होय.

आर. झेड. अलिबर (Aliber R.Z.) यांचे म्हणणे असे की हुंडणावळीच्या दरात होणाऱ्या चढउतारांच्या धोक्यापासून संरक्षण मिळावे म्हणून बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था कमी व्याजदराने भांडवल उपलब्ध असणाऱ्या प्रबळ चलनात (Strong Currency) भांडवल उभारून ते जास्त परतावा मिळणाऱ्या सुलभ चलनाच्या (soft currency) प्रदेशात गुंतवितात. आर. झेड्. अलिबर यांचे हे विधान एक दिशा, विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीचे विवेचन करते. आज प्रत्यक्षात विविध देशातील बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था विविध देशात उत्पादन सुविधा स्थापन करण्यात गुंतवणूक करतात. अमेरिकन, जपानी, कोरियन व बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था भारतात गुंतवणूक करतात. त्याच प्रमाणे भारतीय बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था अमेरिका, जपान, चीन, फिलीपिन्स, इंडोनेशिया, व्हिएतनाम वगैरे देशात उत्पादन सुविधा स्थापन करण्यासाठी गुंतवणूक करतात.

**8) आयात-शुल्क आणि दुर्बळ चलन**

**यामुळे परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक होते असे प्रतिपादन करणारा सिद्धांत -**

आर. झेड. अलिबर (Aliber R.Z.) यांनी परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक निर्माण होण्याची स्पष्टीकरणे देणाऱ्या दोन परिकल्पना मांडल्या.[72] देशानी आयातीवर बंधने घातल्यास बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक करतात. एखाद्या देशाने आयातीवर प्रशुल्क, कोटा, परवाना या सारखी बंधने घातल्यास दुसऱ्या देशातील व्यवसाय संस्थांना त्या देशात निर्यात करणे अवघड होऊन बसते. या बंधनाना वळसा घालून (by pass) जाण्यासाठी बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था त्या देशातच उत्पादन सुविधा प्रस्थापित करतात. डब्लू एम्. कॉर्डन (Corden W.M.) यांनी आयातीवरील बंधने व परदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीचा स्रोत यांच्यामधील धन संबंधाना अपवाद असणाऱ्या मुद्दांचा अभ्यास केला असता असे आढळून आले की परदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीतून उत्पादन होणाऱ्या वस्तू निर्बाधित वस्तुना संपूरक असतील तर आयात निर्बंधामुळे परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक कमी होते.[73] असे असले तरी मुक्त व्यापारी संघात सहभागी असलेल्या देशात व्यापार करण्याच्या संदर्भात अलिबर यांचे प्रतिपादन ग्राह्य ठरते. कारण संबंधित देशाच्या प्रदेशापलिकडे संभाव्य बाजारपेठ बरीच विस्तारलेली असते. म्हणजे मुक्त व्यापार संघात सहभागी असलेल्या फ्रान्स सारख्या देशाने आयात प्रशुल्क आकारल्यास त्या वस्तुला संपूरक वस्तू उत्पादन करणारी उत्पादन सुविधा प्रस्थापित करणारी परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक केली जाईल. कारण वस्तुची बाजारपेठ युरोपीय मुक्त व्यापार संघाच्या सर्व सभासद राष्ट्रांमध्ये पसरलेली असेल.

आर. झेड. अलिबर यांनी 1993 मध्ये विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक होण्याचे दुसरे स्पष्टीकरण मांडले. एखाद्या देशाचे चलन कमजोर असेल तर त्या देशाकडे परदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीचा ओघ वाढतो. कारण प्रबळ चलनाची (Strong Currency) कमजोर चलनातील क्रयशक्ती खूप जास्त असते. मात्र जे. एच. डनिंग (Dunning J.H.) यांच्या म्हणण्याप्रमाणे चलनाच्या मूल्याचा विचार अल्पकालीन असल्यामुळे तो फक्त परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक करण्याची वेळ ठरवू शकतो. परदेशी चलनाच्या मूल्याच्या विचार परदेशात अस्तित्वात असलेल्या व्यवसाय संस्था ताब्यात घेण्याच्या संदर्भात होतो. परदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीच्या हिरव्या कुरणांच्या (green fields) संदर्भात निर्माण होत नाही. आर. झेड. अलिबर यांनी पुढे असेही प्रतिपादन केले आहे की यजमान देशातील (host country) अर्थव्यवस्थेच्या विकासाचा दर आणि विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीचा प्रवाह यामध्ये दाट धन संबंध आहे. आणि ही बाब अनेक अनुभव सिद्ध अभ्यासांमधून सिद्ध झालेली आहे.

परदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीचे प्रमाण 1951 नंतर वाढू लागले. उदहरणार्थ, 1983 ते 1987 या काळात जगातील, परदेशातील प्रत्यक्ष गुंतवणूक 77,100 कोटी डॉलर्स होती ती 1988-92 या काळात 1,7,7300 कोटी डॉलर्स इतकी झाली. अमेरिकन मूळ बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थांनी आपल्या संलग्न व्यवसाय संस्थांना केलेल्या विक्रीचे मूल्य 1989 मध्ये 3239 कोटी डॉलर्स होते ते 1997 मध्ये 8915 कोटी डॉलर्स झाले. अमेरिकन बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थांच्या

परदेशातील संलग्न संस्थांनी अमेरिकेतील मूळ व्यवसाय संस्थांना केलेल्या विक्रीचे मूल्य 1989 मध्ये 3269 कोटी डॉलर्स होते ते 1997 मध्ये 7598 कोटी डॉलर्स इतके झाले. बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था विविध देशांमध्ये उत्पादन सुविधा स्थापन करून उत्पादन करावयाच्या वस्तुंच्या उत्पादनाचे विविध टप्पे वेगवेगळ्या देशात पूर्ण करू लागल्या व अशा अर्धस्थित उत्पादनांमधून अंतिम वस्तू उत्पादन करण्याची, जुळणी करण्याची सुविधा आणखी वेगळ्याच देशात स्थापन करू लागल्या. त्यामुळे अंतर-संस्था आंतरराष्ट्रीय व्यापाराला चालना मिळाली. अंतर-व्यवसाय संस्था व्यापाराचे आंतरराष्ट्रीय व्यापारातील महत्त्व वाढू लागले. 1995 च्या सुमारास जगातील 38,747 बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थांनी परदेशात 2,25,551 सहयोगी व्यवसाय संस्था स्थापन केल्या होत्या.[74] अंतर संस्था व्यापाराचे आंतरराष्ट्रीय व्यापारातील महत्त्व वाढल्यामुळे विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक व अंतर-संस्था व्यापार यांचे सिद्धांतन करणारी प्रतिमाने विकसित करण्यात आली.

लेखांक-2 मध्ये सातव्या भागात विवेचन केलेल्या विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक आणि अंतर-व्यवसाय संस्था आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या आठ सिद्धांतांचा/प्रतिमानांचा गोषवारा पुढील प्रमाणे मांडता येतो. आंतरराष्ट्रीय प्रवास आणि दळणवळण या मध्ये झालेल्या क्रांतिकारी सुधारणांमुळे अनेक व्यवसाय संस्था विविध देशात उत्पादन सुविधा स्थापन करून आपल्या स्पर्धात्मक लाभाचा फायदा उठवू लागल्या. त्यातून आंतरराष्ट्रीय व्यापाराचे नवीन परिमाण विकसित झाले, लेखांक-1 मध्ये विवेचन केलेले आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिद्धांत अंतर-उद्योग आणि अंतर-व्यवसाय संस्था आंतरराष्ट्रीय व्यापाराचे स्पष्टीकरण देण्यास असमर्थ ठरत असल्यामुळे नवीन आंतरराष्ट्रीय सिद्धांतांचे प्रयोजन निर्माण झाले.

हायमर व किंडलबर्गर यांनी अपूर्ण स्पर्धात्मक बाजारपेठ असलेल्या देशात बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था उत्पादन सुविधा स्थापन करतात; वेळ प्रसंगी वस्तुंमध्ये भेद निर्माण करून त्या देशातील बाजार पेठेत अपूर्णत्व निर्माण करतात असे प्रतिमान मांडले. त्यामुळे अंतर-व्यवसाय संस्था आंतरराष्ट्रीय व्यापार वाढतो. रेमंड व्हेर्नोन यांचे प्रतिमान असे आहे की उत्पादित केलेली वस्तू प्रमाणीकरणाच्या प्रावस्थेत पोहोचल्यावर उत्पादन संस्था परदेशात उत्पादन सुविधा स्थापन करतात. तंत्रज्ञान एकस्व, विपणन विषयक विशेष कौशल्य व प्रस्थापित चिन्हांकन आणि व्यापार चिन्ह या तीन घटकांमुळे बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थेला परदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीतून लाभ उठविता येतो. आर. इ. केव्हज आणि एच्. जी. जॉन्सन यांच्या प्रतिमानात बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक करणे पाच घटकांसाठी श्रेष्ठ मानतात असे प्रतिपादन केले आहे. व्यवसाय संस्थेकडील अविभजनीय अमूर्त जिंदगीची गुंतवणूक करणे, अवितरीत नफ्यातून साठविलेला निधी सार्थकी लावणे, व्यवस्थापकांच्या व सेवकांच्या कौशल्याचा वापर करून घेणे, अनेक देशात उत्पादन सुविधा स्थापन करून अनुमापी अनुकुलतेचा लाभ उठविणे आणि विशेषीकरणातून विविधता साधणे हे ते पाच घटक होत. जे. एच्. डनिंग यांच्या मते बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थेला मालकी-विनिर्दिष्ट, स्थान-

विनिर्दिष्ट तसेच अंतर्गतीकरणातून मिळणाऱ्या लाभांमुळे विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक करणे लाभदायक ठरते. समतल विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीचे हे चार सिद्धांत, तीच उत्पादने विविध देशात उत्पादन करण्याच्या सुविधा बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थांनी स्थापन केल्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार निर्माण होतो तसेच वाढतो असे प्रतिपादन करतात.

उर्ध्वस्तरीय प्रत्यक्ष गुंतवणूक करून उर्ध्वस्तरीय संरचना असलेल्या बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था अंतर-व्यवसाय संस्था आंतरराष्ट्रीय व्यापाराला कसा हातभार लावतात हे आर. एच्. कोअेस, पी. जे. बकले, एम्. कॅसन आणि जे. जोहान्सन आदींचे दोन सिद्धांत विशद करतात. कोअेस, बकले व कॅसन असे प्रतिपादन करतात की बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था आपल्या जवळील भौतिक तसेच अमूर्त जिंदगी विकण्याऐवजी अथवा भाडेपट्ट्याने दुसऱ्या व्यवसाय संस्थांना देण्याऐवजी या जिंदगीचा उपयोग करून उत्पादनाच्या सर्व प्रक्रिया स्वतःच पार पाडतात. त्यातून बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थाना भिन्नस्तरीय एकीकरण साधता येते. उत्पादन प्रक्रियेतील अनम्यता व अप्रतिक्रमता, मागणी-पुरवठ्यात होणाऱ्या बदलांप्रमाणे उत्पादनात दुय्यम संस्थांकडून बदल घडवून आणण्यातील अडचणी, दुय्यम उत्पादकाच्या मक्तेदारीतून उद्‌भवणारा असमतोल, नवीन श्रमविभागणी अमलात आणण्यातील लाभ व हस्तांतरण किंमतीतील लाभ या पाच घटकांमुळे बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थेला परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक करून अंतर-व्यवसाय आंतरराष्ट्रीय व्यापार वाढविता येतो. जे. जोहान्सन आदि अर्थशास्त्रज्ञानी मांडलेल्या आंतरराष्ट्रीयीकरणाच्या सिद्धांतात देशीय उत्पादन संस्था चार टप्प्यामधून बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्थेत रूपांतरित होऊन अंतर-व्यवसाय संस्था आंतरराष्ट्रीय व्यापारात जम बसविते असे प्रतिपादन केले आहे.

सगुंठीत विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीचे ग्रुबेल लॉईड आणि अलिबर यांचे दोन सिद्धांत चर्चिले आहेत. एच. जी. ग्रुबेल आणि पी. जे. लॉईड यांच्या म्हणण्याप्रमाणे बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था राजकीय अस्थिरता असलेल्या देशात अथवा, शत्रुत्वाची भावना असलेल्या देशात उत्पादन सुविधा स्थापन करतांना उत्पादनात विविधता आणण्याचा प्रयत्न करतात. तसेच हा धोका प्रतिसंतुलीत (counter balance) करण्यासाठी स्थिर राजकीय परिस्थिती असणाऱ्या व मित्र राष्ट्रांमध्ये उत्पादन सुविधा विकसित करतात. त्यामुळे गुंतवणुकदार, भागधारक, व्यवस्थापक आणि सेवक यांच्या स्थैर्याच्या व शाश्वतीच्या अपेक्षा पूर्ण करता येतात.

आर. झेड. अलिबर यांचे म्हणणे असे आहे की, बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था प्रबळ चलन देशात कमी व्याजदराने भांडवल उभे करून सुलभ चलन असलेल्या देशात गुंतवितात. कारण तेथे परताव्याचा दर जास्त आणि आकर्षक असतो. अलिकडच्या काळात दोन्ही प्रकारच्या देशातील बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था दोन्ही प्रकारचे चलन असलेल्या देशात गुंतवणूक करतांना आढळतात. आर. झेड्. अलिबर यांच्या दोन परिकल्पना अशा आहेत. एखाद्या देशाने आयातीवर घातलेल्या बंधनाना वळसा घालून जाण्यासाठी बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक करतात. त्यांची दुसरी परिकल्पना अशी, प्रबळ चलनाची,

कमजोर अथवा सुलभ चलनाच्या स्वरूपातील क्रयशक्ती जास्त असल्यामुळे प्रबळ चलन असलेल्या देशातील बहुराष्ट्रीय व्यवसाय संस्था सुलभ चलन असलेल्या देशात उत्पादन सुविधा स्थापन करतात. त्यामुळे अंतर-व्यवसाय संस्था आंतरराष्ट्रीय व्यापार वाढतो.

आंतरराष्ट्रीय व्यापारात सेवांचा विशेषत: व्यापारी तत्त्वावर सेवांचा (Commercial services) व्यापार खूप वाढला आहे. त्याचे एकूण आंतरराष्ट्रीय व्यापारातील प्रमाण वीस टक्क्यांच्या आसपास आहे. अलिकडच्या काळात विविध प्रकारच्या धोरणात्मक उपायांचे राजकीयीकरण वेगाने आणि मोठ्या प्रमाणावर होत आहे. या दोन्ही नवीन परिमितींना सैद्धांतिक चौकटीत बांधणाऱ्या प्रतिमानांचे विवेचन लेखांक-तीन मध्ये केले आहे.

## संदर्भ सूची


51) Caves R.E. - Multinational Enterprise and Economic Analysis, Combridge, Cambridge University Press, 1982.

52) Hood N. and Young S. - Economics of Multinational Enterprise, London, Longman, 1979.

53) Dunning J.H. - The Multinational Enterprise and the Global Economy, Reading Addison - Wesley, 1992.

54) Times of India - Business Times, 14 - June 2004.

55) The Economic Times, Global Business Avenues, 22 April 2004.

56) महाराष्ट्र टाइम्स 26-01-2005.

57) महाराष्ट्र टाइम्स 21-01-2005 पृष्ठे 5 व 6, संबंधित संस्थाने प्रकटन.

58) Caves R.E. - op.cit.

59) Dunning J.H. and Pearce J.F. - The World's Largest Enterprises, Aldershot, Gower, 1981.

60) Hymer S. and Rowthorn R. - Multinational Corporations and International Oligopoly ; The Non - American Challenge, In Kindleberger C.P. (Ed.) The International Corporation, Cambridge, Massachu S setts, MIT Press, 1970.

Hymer S. - 'The Efficiency (Contradictions) of Multinational Corporations' American Economic Review, Vol. 60, 1970, PP. 441-448.

Hymer S. - The International Operations of National Firms : A Study in Foreign Direct Investment, MIT Press, Cambridge, M.A.

61) Buckley P.J. and Casson M. - The Future of Multinational Enterprise, London, Macmillan, 1976.

62) Knicker boker F.T. - Oligopolistic Reaction and Multinational Enterprise, Graduate School of Business Administration, Harvard University, Cambridge, Massachusets, 1973.

63) Caves R.E. - Multinational Enterprise and Economic Analysis, Cambridge, Cambridge university press, 1982.

Johnson H.G. - Efficiency and Welfare Implications of the International Corporation, in C.P. Kindleberger (Ed.) The International Corporation, Combridge, MA, MIT. Press, 1970.

64) Dunning J.H. - Trade, Location and Economic Activity of the Multinational Enterprise : A Search for an Eclectic Approach. In Bertil Onlin (Ed.) - The International Allocation of Economic Activity, London, Macmillan 1977.

Dunning J.H. - The Multinational Enterprise and the Global Economy - Reading : Addison - Wesley 1992.

65) Buckley P. and Casson M.C. - The Future of Multinational Enterprise, Macmillan, London, 1976.

66) Devis S.W. and Lyons B.R. - 'Characteristic Relative Performance : The Productivity Advantage of Foreign Owned Firms in the U.K.' Oxford Economic Papers, Vol. 43, 1991, PP 585-595.

67) Coase R.H. - The Nature of the Firm, Economic, Vol. 4, 1937.

68) Buckley P.J. and Casson M. - The Future of Multinational Enterprise, London, Macmillan, 1967.

69) Johanson Jand Vahlne J.E. - 'The International Process of the Firm', Journal of International Business Studies,Vol. 8, 1977 pp. - 23-32

Johanson J. and Wiedersheim Paul F. - 'The Internationalisation of the Firm - Four Swedish Cases', Journal of Management Studies, Vol. 12, No. 3, 1975, pp. 305-322.

70) Yoshihara K. - 'Determinants of Japanese Investment in South - East Asia', International Social Science Journal, Vol. 30, No. 2, 1978, pp 1-20.

71) Grubel H.G. and Lloyd P.J. - Intra - Industry Trade The Theory and Measurement of International Trade in Differential Products, London; Macmillan, 1975.

72) Aliber R.Z. - 'A Theory of Direct Foreign Investment, in Kindle berger C.P. (Ed.), The International Corporation, MIT Press, Cambridge, M.A., 1970.

Aliber R.Z. - the Multinational Paradigm, MIT Press, Cambridge, M.A., 1993.

73) Corden W.M. - Trade Policy and Economic Welfare, Oxford University Press, Oxford, 1974.

74) United Nations Conference on Trade and Development, World Investment Report, 1996.

✦✦✦

## सभासद सूची

सभासदांची सूची तयार करण्यासाठीचा अर्ज आपण अद्याप भरून पाठविला नसल्यास 100 रू. शुल्कासह कार्यवाह-खजिनदाराकडे 30 जून 2006 पर्यंत पाठवावा.

**चारुदत्त गोखले**
कार्यवाह - खजिनदार

# सामाजिक निवडी संदर्भात एक वेचक साहित्य सर्वेक्षण

*(मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या बारामती येथे झालेल्या 29व्या अधिवेशनात सादर केलेल्या या शोधनिबंधाला परिषदेतर्फे दिले जाणारे ग.प्र. पिंपरकर व के.एच्. ठक्कर ऋणमुक्ती पारितोषिक (विभागून) प्राप्त झाले आहे.)*

**✦ संतोष बबनराव यादव, कोल्हापूर.**

*संशोधक, रा.ना. गोडबोले अध्यासन, वाणिज्य व व्यवस्थापन विभाग*

*शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर*

उपलब्ध साधनांचे वाटप कसे करावे हा समाजापुढील सर्वात महत्त्वाचा आर्थिक प्रश्न असतो. व्यक्ती प्रमाणेच समाजाच्या देखील अनेक सामूहिक गरजा असतात. अशा गरजा भागविण्यासाठी वस्तू व सेवांचे उत्पादन करावे लागते. अशा वस्तू व सेवांचा उपभोग सर्वांना घेता यावा अशी व्यवस्था करावी लागते. अशा वस्तू व सेवांच्या बाबतीत एखाद्या उपभोक्त्याला इतरांना वगळण्याचा अधिकार प्राप्त होत नाही.

सामाजिक कल्याण कसे मोजावयाचे किंवा सामाजिक कल्याण वाढले आहे किंवा कमी झाले आहे हे कसे ओळखायचे यासाठी निकष (कसोटी) ठरविण्याचा प्रश्न यातून निर्माण होतो. त्याचबरोबर व्यक्तिगत निवडीच्या पर्यायाचे स्वरूप कसे असावे? व्यक्तिगत निवडीची क्रमवारी कशी लावायची? ती कशावरून प्राप्त करायची? व्यक्तिगत निवडीचे 'सामाजिक निवडीत रूपांतर कसे करायचे', उपलब्ध साधनाचे वाटप कसे करायचे? सामाजिक प्राधान्यक्रम प्राप्त करण्याची समाधानकारक पद्धत कोणती असू शकते? असे महत्त्वाचे प्रश्न निर्माण होतात.

कल्याणकारी राज्यव्यवस्था स्वीकारून लोकशाही यंत्रणेच्या माध्यमातून शासनव्यवस्था निर्माण करणे आणि अशा निर्माण केलेल्या शासनयंत्रणेने योग्य पद्धतीने सामूहिक हिताचे निर्णय घेणे आवश्यक असते. असे निर्णय नेमके कसे घेतले जाणे शक्य आहे. त्यासंबंधीची सैद्धांतिक पार्श्वभूमी व आजच्या परिस्थितीत हे निर्णय कसे घेतले जातात याची सविस्तर चर्चा प्रस्तुत निबंधात केलेली आहे.

अॅडम स्मिथ यांनी देशाची संपत्ती किंवा राष्ट्रीय उत्पन्न हा कल्याणाचा निकष मानला. देशाची साधनसंपत्ती कार्यक्षमतेने वापरून तेवढ्याच साधनसामग्रीतून जास्त वस्तूंचे उत्पादन करता येते आणि जास्त वस्तूंच्या वापरामुळे जास्त समाधान, वस्तु वापरणाऱ्या व्यक्तिंना मिळते. मात्र समाजाच्या दृष्टिने विचार करताना उत्पन्नाच्या विभाजनाचाही प्रश्न लक्षात घ्यावा लागतो. उपयोगिता मोजता येते या कल्पनेवर आधारित जेरेमी बेंथॅम यांनी 'जास्तीत जास्त लोकांचे जास्तीत जास्त सुख' असा निकष वापरला. व्यक्तिंना वस्तुंद्वारे मिळणाऱ्या उपयोगितेची बेरीज म्हणजे समाजाची उपयोगिता असे येथे मानले आहे. जर समाजाला वस्तूमार्फत प्राप्त होणारी एकूण उपयोगिता वाढली आणि त्याचबरोबर समाजातील बहुसंख्य व्यक्तिंची उपयोगिता वाढली तर समाजाचे आर्थिक सुख वाढले असे म्हणता येईल. या निकषाचा वापर करताना काही अडचणी दिसून येतात. त्यामध्ये बहुसंख्य असलेल्या व्यक्तिच्या सुखाला जास्त महत्त्व दिले जाते आणि अल्पसंख्यकांच्या सुखाला कमी महत्त्व दिले जाते. याशिवाय समाजाची एकूण उपयोगिता कमी होऊनही बहुसंख्य व्यक्तिंचे कल्याण वाढू शकते. अशा पद्धतीला आधुनिक अर्थशास्त्रज्ञ आक्षेप घेतात.

पिगूच्या मते, विनियोग्य वस्तू व सेवांच्या उपभोगापासून मिळणारी उपयोगिता वा समाधान म्हणजे आर्थिक कल्याण होय; जे पैशाच्या मापदंडाने मोजता येतो. त्यांच्या मते महत्तम सामाजिक कल्याण प्राप्त करण्यासाठी फक्त राष्ट्रीय उत्पन्न महत्तम करून चालत नाही तर राष्ट्रीय उत्पन्नाचे परिपूर्ण समान वाटप करणे आवश्यक असते. उपयोगितेची गणनसंख्यात्मक उपयोगिता, उपयोगितेची आंतरवैयक्तिक तुलनेची संभाव्यता आणि उपभोगाच्या समान क्षमतेचे समान तत्त्व मान्य केलेले आहे. वितरण व उत्पादनाबाबत सीमांत समानतेचा निकष लावून पर्यायी सामाजिक स्थितीची क्रमवारी प्राप्त करता येईल असे त्यांचे विवेचन स्पष्ट करते.

रॉबिन्स यांनी उपयोगितेच्या बाबतीत एका व्यक्तिची व दुसऱ्या व्यक्तिची तुलना करणे अर्थशास्त्राच्या कक्षेबाहेरचे आहे असे प्रतिपादन केले. अशा तुलनेमुळे अर्थशास्त्रात नितीमूल्यांचा समावेश होतो. यामुळे ज्या बदलामुळे एकाची उपयोगिता वाढते व दुसऱ्याची उपयोगिता कमी होते अशा बदलांचा आर्थिक कल्याणाच्या दृष्टिने विचार करणे शक्य नाही. पॅरेटो यांनी पर्याप्ततेच्या अटी सांगताना असे बदल वगळले. पॅरेटो, उपयोगितेबाबत क्रमसंख्यात्मकतेचे तत्त्व स्वीकारतात आणि आंतर वैयक्तिक तुलना नाकारतात. मूल्यनिर्णयरहित असे पॅरेटो यांचे विवेचन आहे. पॅरेटो पर्याप्तता निकषानुसार, कोणालाही हानीकारक न ठरणारा, पण काही व्यक्तिंना संपन्न करणाऱ्या बदलास विकास मानले पाहिजे.(Any change which harms no one and make some people better off must be considered as development ) आर्थिक सुधारणांमुळे एकूण सामाजिक कल्याणात वाढ होईल. यासंबंधी पॅरेटो यांनी पुढील तीन निकष सूचविले आहेत.

(अ)उपभोक्त्यांना उत्पादित वस्तूचे कार्यक्षम वाटप - वस्तूंच्या कार्यक्षम वाटपासाठी सीमांत पर्यायता दर सर्व उपभोक्त्यासाठी समान असल्यास महत्तम कल्याणाची पातळी गाठता येईल.

(ब) उत्पादन घटकांचे उद्योगसंस्थांना

कार्यक्षम वाटप वस्तूच्या कार्यक्षम उत्पादनासाठी सर्व उत्पादन संस्थांचा सीमांत तांत्रिक पर्यायिता दर समान असेल.

(क) उत्पादन घटकांच्या पर्याप्त उपभोगाच्या सहाय्याने कार्यक्षम उत्पादन - सीमांत तांत्रिक पर्यायिता दर हा सीमांत पर्यायिता दराएवढा असेल.

तुलनेला मान्यता नसल्यामुळे या स्थितींची क्रमवारी लावून युक्ततम स्थिती निवडता न येणे ही या विवेचनाची मोठी मर्यादा ठरते. उत्पन्नाच्या विभाजनाच्या दृष्टिने विविध स्थितीमध्ये निवड करणे शक्य होत नाही.

या अडचणींतून मार्ग काढण्यासाठी हिक्स व कॅल्डॉर यांनी भरपाईच्या तत्त्वाचा वापर केला. भरपाई तत्त्व असे सांगते की, ''सामाजिक पुनर्सघटनामुळे लाभ प्राप्त करण्याऱ्या उपभोक्त्यावर कर आकारणी करून हानिधारकाला भरपाई देता येऊनही आधिक्य शिल्लक राहत असल्यास सामाजिक कल्याणात वाढ झाली असे म्हणता येईल''. पण काही परिस्थितीत मूळ स्थितीतून नव्या स्थितीत जाणे आणि नव्या स्थितीतून मूळ स्थितीत परत जाणे असे दोन्ही बदल या तत्त्वाप्रमाणे योग्य ठरू शकतात असे स्किटोव्हस्की यांनी दाखवून दिले.

घटत्या सीमांत उपयोगितेच्या तत्त्वावर आधारित उत्पन्नाचे समान विभाजन हा निकष सूचविण्यात आला आहे. श्रीमंतांकडून उत्पन्नाचे गरिबांकडे हस्तांतरण केले तर एकूण उपयोगिता वाढेल असा युक्तिवाद येथे केला आहे. उत्पन्न व उपयोगिता यांच्यातील फलनसंबंध सर्वांसाठी एकच आहे असे येथे मानले आहे हे योग्य ठरत नाही.

बर्गसन या अर्थशास्त्रज्ञाने आर्थिक कल्याणाच्या विवेचनाच्या संदर्भात सामाजिक कल्याण फलनाची संकल्पना मांडली आहे. प्रा. बर्गसन यांच्या मते, सामाजिक कल्याण फलन हे प्रत्येक व्यक्तीच्या कल्याणाचे फलन एक असते किंवा समुदायातील प्रत्येक व्यक्तीद्वारा उपभोग केलेल्या वस्तूंच्या आणि सेवांच्या परिमाणांचे फलन असते.(It is a function either of the welfare of each member of the community or of the community or of the quantities of products consumed and services rendered by each member of the community-Abran Bergon) यात नितीमूल्य उघडपणे स्वीकारले आहे. अर्थातच व्यवहारात असे फलन तयार करता येत नाही.

**ॲरोंचा अशक्यता प्रमेय**

सामाजिक निवड सिद्धांताच्या क्षेत्रात केनेथ ॲरो यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. विशेष म्हणजे सामाजिक निवड सिद्धांताच्या विश्लेषणाला त्यांनी चालना दिली. 1951 साली त्यांनी लिहिलेल्या 'Social choice and Individual Values' या ग्रंथात असे दाखवून दिले की लोकशाहीमध्ये बहुमताचा असा कोणताही निकष नाही की ज्यामुळे सामाजिक कल्याणाच्या पाचही गृहीतात्मक अटी पूर्ण होतील.

लोकशाहीमध्ये धोरणात्मक निर्णय व कार्यक्रम निश्चित करण्यासाठी बहुमताचा निकष वापरण्याची प्रथा आहे. यातून समाजाचे कल्याण महत्तम होते असे अभिप्रेत आहे. तथापि, लोकशाहीच्या बहुमताचा निकष विधायक किंवा निश्चित निर्णय घेण्याच्या दृष्टिने अडचणींचा ठरू शकतो. केनेथ ॲरो यांनी ही संकल्पना अशक्यता प्रमेयाच्या स्वरूपात मांडली. त्यांच्या विवेचनाचा

निष्कर्ष असा आहे की, विभिन्न व्यक्तिंच्या वैयक्तिक पसंतीक्रमावरून सामाजिक पसंतीचा क्रम तर्कसुसंगतपणे निर्धारित करता येत नाही. यालाच ॲरोंचा अशक्यता सिद्धांत(Arrow Impossibility Theorem)असे म्हणतात.

सामाजिक निवड सिद्धांत हा सामाजिक स्थितीची सामाजिक क्रमवारी प्राप्त करण्याचा सिद्धांत आहे. व्यक्तिगत प्राधान्यक्रमातून सामाजिक प्राधान्यक्रम व्युत्पन्न झाला पाहिजे. किंवा सामाजिक निवडीतून व्यक्तिगत प्राधान्यक्रम व्यक्त झाला पाहिजे. यासाठी केनेथ ॲरो यांनी पाच अटी दर्शविल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे

1. सामाजिक स्थितीची सामाजिक क्रमवारी ही व्यक्तिगत क्रमवारीतून उत्पन्न झाली पाहिजे.

2. सामाजिक पसंतीचा क्रम हा सर्वस्वी समाजातील विभिन्न व्यक्तिंच्या वैयक्तिक पसंतीक्रमावरच आधारलेला असला पाहिजे.

3. विशिष्ट पर्यायाला जर सर्व वैयक्तिक पसंतिक्रमात प्राधान्याचे स्थान असेल तर त्या पर्यायाला सामाजिक पसंतिक्रमातही प्राधान्याचे स्थान मिळाले पाहिजे.

4. सामाजिक पसंतीचा क्रम हा केव्हाही केवळ एकाच किंवा काही थोड्याच व्यक्तिंच्या पसंततिक्रमावरूनच निर्धारित होऊ नये.

5. कोणत्याही दोन पर्यायांचे सामाजिक पसंतिक्रमातील स्थान सर्वस्वी त्या दोनच पर्यायांच्या वैयक्तिक पसंतीक्रमातील स्थानावर अवलंबून असले पाहिजे.

ॲरोंचा 'अशक्यता प्रमेय' पुढील उदाहरणाच्या साहाय्याने स्पष्ट करता येईल. या ठिकाणी दिलेल्या लोकशाही चौकटीत A,B, आणि c हे तीन नागरिक आहेत आणि त्याच्यासमोर x,y,z हे तीन धोरणात्मक पर्याय आहे हे गृहीत धरले आहे. या धोरणात्मक पर्यायांना प्रत्येक नागरिकाने दिलेले महत्त्व चौकटीतील अंकाद्वारे व्यक्त होते.

| | x | y | z |
|---|---|---|---|
| A | 9 | 8 | 5 |
| B | 6 | 9 | 8 |
| C | 8 | 6 | 9 |

सोबतच्या चौकटीवरून असे स्पष्ट दिसते की, A च्या दृष्टिने x हे धोरण सर्वाधिक कल्याणाचे असेल पण त्यास B आणि c या नागरिकांचा विरोध असेल कारण त्यांचे प्राधान्यक्रम वेगळे आहेत. त्यामुळे x हा धोरणात्मक पर्याय बहुमताला मान्य असणार नाही. B च्या दृष्टिने y हा पर्याय सर्वाधिक कल्याणाचा असूनही वरील कारणानेच A आणि c बहुमतामुळे त्याला प्रभावी विरोध करू शकतात. अशाच प्रकारे c च्या दृष्टिने Z हा पर्याय सर्वाधिक कल्याणाचा असून देखील A आणि B यांच्या बहुमतामुळे ती निवडही अशक्य आहे.

x,y आणि Z या तीन पर्यायांत, पहिली व्यक्ती x या पर्यायांच्या निवडीला प्राधान्य देते. दुसरी व्यक्ती y या पर्यायांच्या निवडीला प्राधान्य देते, तर तिसरी व्यक्ती Z या पर्यायाच्या निवडीला प्राधान्य देते. त्यामुळे या तीन पर्यायांचे सामाजिक पसंतिक्रमातील स्थान निर्धारित करताना आपल्याला x,y z यापैकी कोणत्याही एका पर्यायाच्या निवडीला प्राधान्य देता येणार नाही. कारण आपण कोणत्याही पर्यायांच्या निवडीला प्राधान्य दिले तर त्यामुळे सामाजिक

पसंतीचा क्रम त्याच एका व्यक्तीच्या वैयक्तिक पसंतिक्रमानुसार निर्धारित होईल व त्यामुळे वर निर्दिष्ट केलेल्या अटींपैकी चौथ्या अटीचा भंग होईल.

म्हणजेच आपल्याला व्यक्तिंच्या वैयक्तिक पसंतीक्रमावरून सामाजिक पसंतीचा क्रम तर्कसुसंगतपणे निर्धारित करता येत नाही. हा ॲरोने काढलेला निष्कर्ष तर्कशुद्ध आहे हे मान्य करावे लागते. अमर्त्य सेन यांच्या मते ॲरोच्या अटी थोड्या शिथिल केल्या तर असंभाव्यता कमी होऊ शकेल.

अमेरिकन अर्थतज्ज्ञ ॲंथनी डाऊन्स यांनी 1997 मध्ये आपला An Economic Theory of Democracy हा ग्रंथ प्रकाशित केला व त्यामध्ये लोकशाही प्रक्रियेतील भिन्न राजकीय पक्ष,त्यांची कार्यपद्धती व त्यामधील नोकरशाहीची भूमिका याचे सविस्तर विवेचन केले आहे. ॲंथनी डाऊन्स यांच्या लोकशाहीच्या आर्थिक सिद्धांतानुसार सार्वजनिक वस्तूंची निवड करताना शासन, निर्वाचित प्रतिनिधी, पक्ष, नोकरशहा व मतदार हे सर्व अंततः प्रथम स्वतःच्या आर्थिक हिताचे व दुसऱ्या क्रमांकावर समाजाच्या हिताचे रक्षण करण्याचा प्रयत्न करतात.

**जॉन रॉल्स**

जॉन रॉल्स यांनी 1971 मध्ये A Theory of Justice हा ग्रंथ प्रकाशित केला. त्यांनी आपल्या विवेचनात सामाजिक निवडीसाठी स्वातंत्र्य, न्यायासारख्या मूल्यांना आधारभूत मानले.

जॉन रॉल्स यांच्या मते, न्याय ही आदर्श, चांगल्या समाजाची अत्यावश्यक अट असली तरी ती पुरेशी अट नाही. त्यांच्या मते, न्यायाचा प्रश्न मूलतः 'प्राथमिक वस्तूंच्या' न्याय वाटपाची व्यवस्था करण्याशी संबंधित आहे. या प्राथमिक वस्तूंमध्ये मुख्यतः हक्क, स्वातंत्र्य अधिकार आणि संधी त्याचबरोबर उत्पन्न आणि संपत्ती, आत्मसन्मानाची साधने इत्यादींचा समावेश होतो. जेरेमी बेंथॅम यांनी जास्तीत जास्त लोकांचे जास्तीत जास्त कल्याण असा उपयोगितावादाचा निकष वापरला. जॉन रॉल्स यांनी हा विचार अमान्य केला. त्यांनी असे स्पष्ट केले की, दुर्दैवी लोकांच्या हालाखीची नुकसान भरपाई श्रीमंतांच्या चंगळवादाच्या वाढीतून होत नाही, करता येत नाही.

सामाजिक पर्यायातून निवड करण्यासाठी समाजाच्या मूळ स्थितीत व्यक्तिद्वारे तत्त्वांची निवड केली जाते. अशा प्रकारे निवड करताना त्या निवडीच्या परिणामस्वरूप निर्माण होणाऱ्या सामाजिक स्थितीत तत्त्वाची निवड करणाऱ्यांचे स्वतःचे स्थान व व्यक्तिगत वैशिष्ट्ये कोणती असतील याबाबत ते अनभिज्ञ असतात. जॉन रॉल्स यांनी मांडलेली न्यायाची तीन तत्त्वे पुढीलप्रमाणे आहेत -

1. समान स्वातंत्र्याचे तत्त्व - यामध्ये राजकीय सहभाग आणि व्यक्ती, धार्मिक स्वातंत्र्य, कायद्यानुसार समानता यांचा समावेश होतो व तत्वाप्रमाणे कोणत्याही व्यक्तीचे स्वातंत्र्य इतर कोणत्याही लाभासाठी घटविता किंवा कमी करता येणार नाही.

2. अधिकार व पदे मिळविण्यासाठी सर्वांना वाजवी समान संधी मिळाली पाहिजे.

3. फरक तत्त्वाप्रमाणे प्राथमिक वस्तूंचे वाटप करत असताना निर्माण होणारा फरक तेव्हाच समर्थनीय असेल की, जेव्हा त्या फरकामुळे किमान लाभाच्या अवस्थेत असणाऱ्या

घटकास कमाल लाभ प्राप्त होईल. दुसऱ्या शब्दात असे सांगता येईल की, कार्यक्षमतेच्या स्पर्धात्मक बाजाराचा निकष तेव्हाच मान्य होईल, जेव्हा एखाद्याच्या उच्चतर कार्यक्षमतेचा व त्याला त्या प्रमाणात मिळणाऱ्या उत्पन्नामुळे समाजातील सर्वात दुर्बल असणाऱ्या घटकाच्या परिस्थितीत थोडीतरी सुधारणा होईल.

जॉन रॉल्स हा पुनर्वाटपवादी आहे. त्यांनी श्रृंखला संबंध (Chain Connection) ही संकल्पना मांडली. त्यामध्ये असे स्पष्ट केले की श्रृंखला घट्ट अतूट होण्यासाठी सर्वात दुर्बल घटकास सक्षम करावे लागते. म्हणूनच संपूर्ण समाज प्रबल करण्यासाठी प्रथम दुर्बलांना सबल करणे आवश्यक आहे. एकंदरीत असे म्हणता येईल की, जॉन रॉल्स यांनी भांडवलशाही व्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी योग्य व न्यायाधिष्ठित अशी रचना व अटी स्पष्ट केल्या आहेत.

**अमर्त्य सेन**

अमर्त्य सेन यांनी निवड, कल्याण व कल्याणाचे वाटप, दारिद्र्य, सक्षमीकरण, मूलभूत हक्क यासारख्या विविध प्रश्नावर लिखाण केले. सेन यांनी लिहिलेल्या सामूहिक निवड आणि समाजकल्याण यातील अंतर्गत संबंध स्पष्ट करणाऱ्या Collective Choice and Social Welfare(1970) या ग्रंथाने त्यांना अधिक लौकिक मिळवून दिला.

लोकशाही मार्गाने निर्णयाची निवड करीत असताना जेव्हा विविध गट भिन्न पर्यायास प्राधान्य देतात तेव्हा अशा वेळी निर्णय होत नाही. या अनिर्णित अवस्थेलाच केनेथ ॲरो यांचा ॲरो अशक्यता प्रमेय या नावाने ओळखले जाते. अमर्त्य सेन यांनी प्रशांत पटनाईक यांच्या समवेत केलेल्या संशोधनातून हे अशक्यतेचे प्रमेय सोडविले. सेन यांच्यामते, लोकशाही मार्गाने निर्णय शक्य नसेल तर त्याला हुकुमशाही हा पर्याय न ठेवता, समाजाने ज्यांच्या हातात निर्णयशक्ती दिलेली आहे अशा समित्यांच्याकडे तो निर्णय सोपवावा, तसेच या सिद्धांताची गृहीते थोडी बदलून समाजातील सगळ्यांना जरूर असलेले, सगळे सहमत होतील असेच निर्णय घेण्यात यावेत. शिवाय निर्णय घेणाऱ्यांच्या माहितीचा संग्रह वाढविला तर तो निर्णय लोकशाही तत्त्वाच्या जवळचा होईल.

अमर्त्य सेन यांनी सामुदायिक निर्णय प्रक्रियेत मतांचे/मूल्यांचे एकत्रीकरण करणे व त्यात व्यक्तिगत हक्काचे संरक्षण करणे, व्यक्तिला सक्षम करणे, व्यक्तिगत माहितीचे एकत्रीकरण करणे, त्यातून त्यांनी उत्पन्नाच्या वेगवेगळ्या वाटप व्यवस्था लक्षात घेऊन कल्याण पातळीची तुलनात्मक पाहणी करण्यासाठी सैद्धांतिक पार्श्वभूमी यशस्वी पद्धतीने तयार केली आहे. रॉल्स या राजकीय विचारवंताचा 'स्वातंत्र्य' बाबतचा विचार सेन यांनी आर्थिक क्षेत्रात लागू केला. रॉल्स यांच्या मते स्वातंत्र्य उपभोगण्यासाठी वैयक्तिक क्षमता समाजातल्या प्रत्येक घटकाकडे असेल तरच ते खरे परिणामकारक स्वातंत्र्य ठरते. यासाठी प्रत्येक व्यक्तिकडे आरोग्य, प्राथमिक शिक्षण या प्राथमिक घटकांची उपलब्धता असावी लागते. अमर्त्य सेन यांच्यामते, आर्थिक स्वातंत्र्याबाबत आणि आर्थिक विकासाची फळे उपभोगण्याबाबतही याच पूर्व अटींची पूर्तता होणे आवश्यक आहे.

सामाजिक निवड सिद्धांतात निवडीचा आधार म्हणून उपयोगितेऐवजी सेन यांनी शक्ततांची (Capabilities) संकल्पना मांडलेली

आहे. सेन यांनी असे म्हटले आहे की, प्रत्यक्षात माणसाला मिळणाऱ्या संधी किंवा शक्तता ह्या जशा उत्पन्नामुळे प्राप्त होतात त्याचप्रमाणे शक्तता (Capabilities) ह्या माणसाचे आरोग्य व माणसाला मिळालेले शिक्षण यासारख्या घटकावरही अवलंबून असतात. म्हणजेच शिक्षण, आरोग्य यासारख्या घटकांमुळे माणसामध्ये 'शक्तता' निर्माण होतात व त्यामुळे मानवाचे कल्याण घडून येण्यास मदत होते. वस्तुंच्या उपयोगितेतील रूपांतरणापेक्षा शक्ततांमधील रूपांतरण व्यक्तिपरत्वे भिन्न असेल. त्यामुळे उपयोगितेच्या समानतेपेक्षा शक्ततांची समानता वेगळी असेल. परंतु सामाजिक स्थितींचा सामाजिक प्राधान्यक्रम ठरविण्यात ती अधिक अर्थपूर्ण ठरेल असे त्यांना वाटते.

पॅरेटो यानी सार्वजनिक धोरण ठरविताना एखाद्या धोरणामुळे एकाही व्यक्तीची उपयोगिता कमी न करता जर किमान एका व्यक्तीची उपयोगिता वाढविता आली तर ती स्थिती समाजकल्याण वाढविणारी ठरेल. असा सिद्धांत मांडला. त्याला पॅरेटोचा 'इष्टतम सिद्धांत' म्हणतात. सेन यांनी पॅरेटोच्या विवेचनाच्या मर्यादा स्पष्ट केल्या. त्यांनी असे दाखवून दिले की, व्यक्ती स्वहिताच्या उद्दिष्टाबरोबर इतर उद्दिष्टांचाही विचार करते. स्वतःचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी वेळ प्रसंगी इतरांशी सहकार्य करण्यास तयार होते.

थोडक्यात, अमर्त्य सेन यांच्या लिखाणामुळे कल्याणकारी अर्थशास्त्र आणि सामाजिक निवड सिद्धांत विषयांबद्दल वेगळ्या दृष्टिकोनातून विचार व्हायला सुरूवात झाली. त्याचबरोबर संपूर्ण निबंधाच्या विवेचनावरून थोडक्यात असे म्हणता येईल की महत्तम सामाजिक स्थिती परिभाषित करणे आणि तिच्या प्राप्तीसाठी वापरावयाची नीति सांगणे हा आधीच्या काळातील विवेचनाचा केंद्रबिंदू होता तर सामाजिक प्राधान्यक्रम तयार करण्यासाठी सामाजिक निवडीचे तत्त्व, अटी व तिची प्रक्रिया कोणत्या प्रकारची असावी यावर अलिकडच्या काळातील विवेचनात भर दिसतो.

## संदर्भसूची

1. Mithani D.M. (1998), Modern Public Finance Theory & Practice, Himalaya Publishing House, Mumbai.

2.पाटील जे.एफ . : (संपादक) सार्वजनिक अर्थकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

✦✦✦

**सूचना निबंध लेखकांसाठी**

अधिवेशनासाठी/अर्थसंवादसाठी शोधनिबंध पाठविणारे लेखक हे परिषदेचे सभासद असलेच पाहिजे. अध्यक्षांकडे/संपादकांकडे निबंध पाठवितांना आपला सभासद क्रमांक लिहावा. फक्त सभासदांचेच निबंध विचारात घेण्यात येतील.(आमंत्रित लेख सोडून)

कार्यवाह – खजिनदार

## एकोणतिसावे वार्षिक अधिवेशन सूत्रसंचालकांचे अहवाल
## चर्चासत्र पहिले

# सामाजिक निवडीचे सिद्धांत

✦ **सूत्र संचालक - माधव दातार, पुणे.**
*भारतीय औद्योगिक विकास बँक*

Everything should be made as simple as possible but not simpler -- Albert Einstein

उपयुक्तता व सुलभता या निकषांवर सामाजिक निवड सिद्धांताचे मूल्यमापन करावयाचे ठरविल्यास सामाजिक निवड सिद्धांताला संभाव्य उपयुक्तता या निकषावर भरपूर तर सुलभता या निकषावर खूपच कमी गुण मिळतील. पर्यायी उपयोगाच्या पण मर्यादित साधनांच्या सहाय्याने जास्तीत जास्त उपयोगिता मिळविण्याचे प्रयत्न या स्वरूपात नवसनातन अर्थशास्त्राचा विचार मांडला गेल्यानंतर सामाजिक कल्याणाच्या संदर्भात भिन्न व्यक्तिंच्या उपयोगितांचे एकत्रीकरण करण्याचा प्रश्न निर्माण होणे अटळ होते. व्यक्तिकेन्द्रित पद्धतीने उपयुक्ततावादी विचारांच्या चौकटीत सामाजिक कल्याणाचा विचार करताना उपयोगितेचे मोजमाप करणे व भिन्न व्यक्तिच्या उपयोगितांची तुलना करणे आवश्यक ठरते. मात्र तथाकथित वस्तुनिष्ठ विश्लेषणाची चौकट स्वीकारली तर अशी तुलना करता येत नाही. या स्थितीत सामाजिक कल्याणाचा विचार करताना पॅरेटोच्या पर्याप्ततेच्या कल्पनेला महत्त्व प्राप्त झाले. कारण एखाद्या धोरणामुळे इतर कोणाचीही उपयोगिता कमी न होता एकाची उपयुक्तता जर वाढत असेल तर हे धोरण सामाजिक उपयुक्तता वाढवणारे व म्हणून सामाजिक कल्याण साधणारे ठरत होते व असे म्हणताना भिन्न व्यक्तिंच्या उपयोगितेची तुलना करण्याचे धर्मसंकटही टाळता येत होते. या भूमिकेवर अर्थशास्त्राने (अर्थशास्त्रज्ञांनी) मूल्य निर्णय (Value Judgments) का टाळावेत असा आक्षेप घेणे शक्य होते व तसा तो घेतला गेलाही किंवा आर्थिक समस्यांचा विचार करताना व्यक्तिगत निवडीची चौकट कितपत योग्य ठरते, व्यक्तिंच्या निवडीवर सामाजिक वातावरण, परंपरा व बंधने यांचा परिणाम होत असल्याने व्यक्तिकेन्द्रित दृष्टिकोन अपुरा आहे असा विचारही मांडला गेला. पण व्यक्तिकेन्द्रित उपयुक्ततावादी विचारांच्या चौकटीत

व्यक्तिगत निवडीतून सामाजिक निवड कशी सिद्ध होते हा प्रश्न सैद्धान्तिक दृष्ट्या महत्त्वाचा होता.

केनेथ ॲरो (1951) यांच्या विवेचनाने आधुनिक सामाजिक निवड सिद्धांतनाचा पाया रचला गेला असे म्हणता येते. पुढे ॲरो यांनाच नव्हे तर त्यांच्या विवेचनात मौलिक भर घालणाऱ्या अमर्त्य सेन यांनाही नोबेल पारितोषिक मिळाले. यावरून सामाजिक निवड सिद्धान्ताचे नव सनातन अर्थशास्त्रातील महत्त्व स्पष्ट होत असले तरी सामाजिक निवड सिद्धांत फक्त अर्थशास्त्रापुरता मर्यादित मानणे अयोग्य ठरेल. किंबहुना सामाजिक निवड सिद्धान्ताची आधुनिक मांडणी अतिशय सामान्य स्वरूपात तार्किकी/गणितीय पद्धतीने झाल्याने या फेरमांडणीत अर्थशास्त्राच्या अभ्यासकांनी पुढाकार घेतला तरी हा सिद्धांत भिन्न संदर्भात लागू ठरू शकतो. अर्थशास्त्रापुरता विचार करायचा असल्यास निवडीचा प्रश्न केवळ बाजारपेठेत विविक्षित उत्पन्नाच्या मर्यादेत जास्तीत जास्त उपयोगिता प्राप्त करण्याच्या उद्देशाने केलेली वस्तुंची निवड आणि विविध व्यक्तिंच्या अशा अनेक प्रयत्नांतून सिद्ध होणारी सामाजिक निवड याच संदर्भात करणे खूपच मर्यादित ठरते. शिवाय वैयक्तिक निवड अथवा पसंतीक्रमातून सामाजिक निवड किंवा पसंतीक्रम कसे सिद्ध करता येतील हे प्रश्न इतर संदर्भातही (उदा. निवडणूका) केंद्र स्थानी असतात. व्यक्तिंचे पसंतीक्रम कसे ठरतात, भिन्न वैयक्तिक पसंतीक्रमातून कोणत्या पद्धतीने सामाजिक पसंतीक्रम सिद्ध करता येतील व सामाजिक परंपरा, रूढी, तत्त्वज्ञान यांचा व्यक्तिगत पसंतीक्रमावर कसा परिणाम संभवतो ही गोष्ट अर्थशास्त्राच्या अभ्यासकांइतकीच राज्यशास्त्र, समाजशास्त्र यांच्या अभ्यासकांच्या दृष्टिनेही महत्त्वाची ठरते. अर्थशास्त्रज्ञांनीही त्यांच्या विषयाचे राज्यशास्त्रबरोबरचे उघड महत्त्वाचे व तेवढे उघड नसलेले पण महत्त्वाचे, समाजशास्त्राबरोबरचे नाते लक्षांत घेउन सामाजिक निवड सिद्धांताचा विचार करताना त्याचे संभाव्य परिणाम लक्षात घेतले पाहिजेत. ज्या आंतर विद्याशाखीय पद्धतीचा प्रत्यही पुरस्कार केला जातो त्याच्या वापरासाठी सामाजिक निवड सिद्धांताएवढे संभाव्य सुपीक क्षेत्र क्वचितच सापडेल.

## कल्याणकारी अर्थशास्त्र व सामाजिक निवड

अर्थशास्त्र हे 'उदास विज्ञान'(Dismal Science)म्हणून कुप्रसिद्ध असले तरी त्यात समाज कल्याणाचा विचारप्रवाहही समांतर पद्धतीने विकसित झालेला आढळतो. व्यक्तिंची वागणूक जास्तीत जास्त उपयोगिता मिळविण्याचे प्रयत्न या स्वरूपात विचारात घेतल्याने समाज कल्याणाचा विचार करताना समाज कल्याण फलन (Social Welfare Function) ही कल्पना मांडली गेली. व्यक्तिंची उपयोगिता मुख्यत: त्यांनी निवडलेल्या वस्तू (व सेवा) यावर अवलंबून राहते व सामाजिक कल्याण हे विविध व्यक्तिंच्या एकत्रित उपयोगितेवर अवलंबून राहिल असे मानले की समाज कल्याणाचा विचार करताना व्यक्तिंच्या निवडीचे एकत्रीकरण करणे महत्त्वाचे ठरते. यासंदर्भात उपयोगितेचे मोजमाप कसे करायचे हा प्रश्न निर्माण होतो. उपयोगितेचे निरपेक्ष मोजमाप करणे शक्य असेल तर भिन्न व्यक्तिंच्या उपयोगितांचे एकत्रीकरण करणे शक्य होते. पण उपयोगितेच्या मोजमापाचे एकक जरी ठरविले तरी एकत्रीकरण करताना भिन्न व्यक्तिंच्या उपयोगितांची तुलना करण्याचा अधिक जटील प्रश्न निर्माण होतो. असे करणे कठीण आहे हे जाणवल्यावर उपयोगितेची सापेक्ष स्वरूपात मोजणी करण्याचा विचार मांडला गेला. त्यामुळे

विविध वैयक्तिक पसंतीक्रमाच्या एकत्रीकरणातून सामाजिक पसंतीक्रम कसे सिद्ध करता येतील या स्वरूपात सामाजिक निवड सिद्धान्त पुढे आला. भिन्न व्यक्तिंच्या उपयोगितांची तुलना न करता सामाजिक कल्याणाचा विचार करण्याच्या प्रयत्नातून पॅरेटोची पर्याप्ततेची कल्पना महत्त्व पावली.

या प्रकल्पात व्यक्तिच्या निवडीकडे फारच मर्यादित अर्थाने बघण्यात आले. व्यक्तिंची निवड ही प्रामुख्याने वैयक्तिक उपभोग्य वस्तुंच्या संदर्भात बघितली गेली. निवड वा पसंतीक्रम सुसंगत (Consistent) असतील याकडे बारीक लक्ष दिले गेले पण व्यक्तिंची निवड व त्यांचे पसंतीक्रम यांच्यात संभवणारा फरक लक्षात घेतला गेला नाही. व्यक्तिगत उपयोगिता वा समाधानाच्या संदर्भात सार्वजनिक वस्तुंचा उपयोगही महत्त्वाचा ठरतो व सार्वजनिक वस्तुंच्या संदर्भात ''खरे'' पसंतीक्रम उघड होण्यातल्या अडचणी सर्वश्रुत आहेत. बाजारात जाऊन वस्तू खरेदी करण्याची क्रिया वारंवार घडणारी असते पण कित्येक निर्णय (मतदान व नोकरी) ते रोज घेतले जात नसले तरी (किंवा म्हणून) जास्त महत्त्वाचे असतात. हे निर्णय कोणत्या परिस्थितीत घेतले जातात त्यांचा विचार पारंपरिक सामाजिक निवडीच्या चौकटीत समाधानकारक रीतीने करणे कठीण होते. व्यक्ती निवड प्रक्रियेचा विचार अधिक सम्यक स्वरूपात करण्याच्या प्रयत्नातून आधुनिक सामाजिक निवड सिद्धान्ताचा विकास झाला.

सामाजिक निवडीचा विचार इतर प्रश्नांच्या संदर्भात (उदा. बहुमताचे निर्णय) ग्रीसमध्ये अतिप्राचीन काळातही झालेला आढळतो. पण ही चर्चा विशिष्ट उदाहरणांच्या संदर्भात होत असे. विविक्षित उदाहरणांचा संग्रह असे एक रूप, तर अर्थशास्त्रातील बाजारपेठेतील व्यक्ती वर्तणूकीच्या संदर्भात झालेले दुसरे रूप या स्वरूपातील विचारांचे एकत्रित तात्त्विक रूप आधुनिक निवड सिद्धांतात प्रतिबिंबित झाले.

## आधुनिक सामाजिक निवड सिद्धांत

केनेथ ॲरो (1951) यांनी अधिक सामान्य स्वरूपात वैयक्तिक पसंतीक्रमातून सामाजिक निवड सिद्ध करण्याच्या शक्यतेचा विचार केला. वैयक्तिक पसंतीक्रमातून सामाजिक निवड स्पष्ट होण्याच्या ज्या अटी ॲरो यांनी मांडल्या त्यातून सामाजिक निवड सिद्ध होण्यातील अडचणी स्पष्ट झाल्या व ॲरो यांच्या विवेचनास ''असंभाव्यता सिद्धान्त'' म्हणून ख्याती मिळाली. तार्किकीय/गणिती पद्धतीने केलेले सामान्य स्वरूपातील हे विवेचन भिन्न प्रकारच्या परिस्थितीतील वैयक्तिक निवडींचा विचार करू शकत होते. पण त्यामुळेच हे विवेचन अमूर्त पातळीवर राहिले. ॲरो यांच्या विवेचनाच्या अनुषंगाने, त्यांचे स्पष्टीकरण, विस्तार वा प्रतिवाद करण्याच्या प्रयत्नातून सामाजिक निवड सिद्धांताचा विकास झाला व त्यात अनेक लेखकांनी योगदान केले आहे. विशेषत: सेन 1983a , सेन 1983b व सेन 1983 वरून या विविध लिखाणांचा आवाका लक्षात घेण्यास मदत होते. विशेषत: ॲरो यांच्या विविध पूर्व अटीतील जाचकता कमी करून सामाजिक निवडीच्या शक्यता स्पष्ट करण्याचे प्रयत्न, या स्वरूपात आधुनिक सामाजिक निवड सिद्धान्ताकडे पाहता येते.

### पसंती व निवड

ॲरो यांचे विवेचन सामान्य पातळीवरून केल्याने पूर्वसूरींप्रमाणे वैयक्तिक निवडीचा एका विशिष्ट संदर्भातच विचार करण्याचा धोका टाळला गेला पण पसंतीक्रमाच्या सुसंगतपणाकडे लक्ष पुरविताना निवडीच्या इतर परिणामांकडे काहीसे दुर्लक्ष होते. पसंती व निवड यांतील संभाव्य फरकाकडे लक्ष दिले पाहिजे. पसंतीमधील सुसंगती

पसंतीच्या वारंवारितेवरही अवलंबून असेल. आज केळी व उद्या पेरू निवडणे यात विसंगती नाही. शिवाय निवड नेहमीच पसंतीनुरूपच असेल असेही नाही (उदा. भारतातील निवडणूका वा ठरवलेली लग्ने ) शिवाय निवड करताना उपयोगितेचे आधिक्य साधणे हाच नेहमी उद्देश असेल का ? आधिक्य साधण्याच्या उद्देशाने निवड होईल असे गृहित धरणे निराळे पण प्रत्यक्षांत सदैव निवड त्याच पद्धतीने होते का हा ? प्रश्नही महत्त्वाचा आहे. वैयक्तिक पसंतीक्रम नेहमीच बाजारपेठेतील कृतीतूनच अभिव्यक्त होईल असे मानायचे का ? व्यक्त केलेली मते (Opinion) निवडीत समाविष्ट करायची का नाही?

भिन्न व्यक्तिंच्या हितामधील परस्परावलंबित्व मान्य केले तर वैयक्तिक हिताचे आधिक्य साधण्यातून दुय्यम प्रकारचा परिणाम निघेल. या संदर्भात अनुकंपा व बांधिलकी या कल्पना विचारात घेता येतात. सहानुभूतीतून इतरांच्या हालाखीतून त्या व्यक्तीचे सुख कमी होईल तर बांधिलकीमुळे इतरांचे दु:ख दूर करण्याची कृती होऊ शकेल. व्यक्तिंच्या कृतीवर समाजमान्य रूढी व पद्धतींचा परिणाम होतो. मतदानात भाग घेणाऱ्या सर्वांचा उद्देश पसंतीनुसार निवड करण्याची खात्री असल्यानेच घेतला जातो असे नाही. मतदानात सहभाग होणे ही आवश्यक, चांगली बाब आहे; चांगल्या जबाबदार वर्तणूकीचे ते एक मान्यताप्राप्त गमक आहे. समाजमान्य निकषाचे पालन करण्याच्या हेतूने आपल्या एका मताचा निवडणुकीच्या निकालावर निर्णायक परिणाम होईल याची खात्री नसतानाही खूप लोक मतदानात सहभागी होताना आढळतात. समाजवादीच नव्हे तर भांडवलशाही देशांतही सहकारी संस्था व इतर ठिकाणीही या घटकांचा प्रत्यक्ष प्रभाव/परिणाम वास्तवात अनुभवाला येतो पण या बाबी वैयक्तिक पसंती वा कृतीचे विश्लेषण करताना कशा हाताळायच्या हा महत्त्वाचा मुद्दा ठरतो.

**एकत्रीकरण**

वैयक्तिक पसंतीक्रम व सामाजिक निवड यांतील संबंधाचा सामाजिक निवडीत विचार केला जातो असे म्हटले तरी यात तीन प्रकारच्या एकत्रीकरणांचा समावेश होऊ शकतो.

1 समितीचे निर्णय: विविध पर्यायांच्या गुणावत्तेबाबत समितीच्या सभासदात मतभिन्नता असताना समितीला गुणवत्तेवर आधारित विविध पर्यायातून कार्यवाहीसाठी काही निर्णय घ्यायचे असतात.

2. समाजकल्याणाबाबतचा निवाडा : एखाद्या निर्णयाचे भिन्न समाजगटांवर परस्पर विरोधी परिणाम संभवत असताना तो निर्णय समाजहिताचा आहे किंवा नाही हे एका व्यक्तिने ठरविणे व

3. प्रमाणक निर्देशांक: आंतरव्यक्ति भारांक अनुस्युत असणाऱ्या राष्ट्रीय उत्पन्न, गरिबी, असमानता व इतर प्रमाणक निर्देशांकाची आखणी व सुलभ मोजणी.

या तिन्ही परीस्थितीत एकत्रीकरण आवश्यक असले तरी समितीच्या निर्णयात सभासदांच्या भिन्न मतांचे एकत्रीकरण करायचे असते. यात सभासदांच्या (भिन्न) वैयक्तिक हितांच्या एकत्रीकरणाचा विचार आवश्यक नसतो पण समाजकल्याणाबाबतचा निवाडा करताना याचीच गरज असते. समाजकल्याणाचा विचार करताना पर्याप्ततेचा विचार महत्त्वाचा ठरतो (अमुक पेक्षा तमुक चांगले) तर समितीच्या निर्णयांत प्रामुख्याने उपलब्ध पर्यायांपैकी रास्त पर्याय निवडण्याची (मग तो पर्याप्त असलाच पाहिजे असे नाही) गरज असते समाज

कल्याणाचा विचार करताना सामाजिक हित वा अहिताचे प्रमाण ठरविण्याचा व भिन्न व्यक्ती समुहांच्या लाभांची तुलना करण्याचा प्रश्न टाळता येत नाही तर समितीला निर्णय घेताना निवडीचे काम उपलब्ध पर्यायातून एखाद्या पर्यायाची निवड करण्यापुरतेच मर्यादित असते. प्रमाणक निर्देशांक ठरविताना विविध गटांच्या हिताचा सामोपचाराने विचार करावा लागतो; त्यांच्या मतांचा फारसा संबंध येत नाही. प्रत्यक्ष निर्णय घेण्याऐवजी विविध निकषांची निवड करावी लागते या कामाचे साम्य समितीच्या निर्णयापेक्षा सामाजिक कल्याणाच्या निवडीशी जास्त असते. एकत्रीकरण वैयक्तिक हिताचे करायचे का वैयक्तिक निवाड्यांचे हा एक मुद्दा. तर उद्देश निर्णय घेण्याचा आहे की कल्याणाचा निवाडा करण्याचा आहे ही दुसरी बाब. या दोन निकषांच्या आधारे हित-निर्णय, हित-कल्याण, निवाडा-निर्णय, निवाडा-कल्याण असे चार पर्याय संभवतात. या भिन्न एकत्रीकरणांचा एकाच पद्धतीने विचार करणे संयुक्तिक ठरणार नाही. त्यांचा वेगळा विचार करणे अगत्याचे आहे. उदा. बहुमताचा निर्णय निवाड्यांचे एकत्रीकरण करताना उपयोगी पडेल पण हितांचे (हितसंबंधाचे) एकत्रीकरण करताना बहुमताचा नियम नेहमीच उपयोगी पडेल याची खात्री देता येत नाही. उदा फेर वाटपाच्या इष्टतेचा निर्णय बहुमताने घ्यायचे ठरविले व लाभार्थींची संख्या जास्त असेल तर दुर्बलांच्या विरोधी निर्णयही घेतले जाऊ शकतात.

ॲरो यांचा अशक्यतेचा नियम सिद्ध होण्यात माहितीची नियंत्रित उपलब्धता हा एक घटक असल्याचे प्रतिपादन सेन यांनी केले व अधिक समृद्ध माहितीच्या आधारे सामाजिक निवड संभाव्य होऊ शकेल असे प्रतिपादन केले. रॉबर्टस (2005) यांनी या मुद्याचा पाठपुरावा करून समृद्ध माहितीच्या संदर्भातही सामाजिक पसंतीक्रम सिद्ध करण्यातील अडचणी स्पष्ट केल्या आहेत. ॲरो सामाजिक निवड फलनात अमर्याद पसंतीक्रमाचे एक गृहित आहे. व्यवहारात जे पसंतीक्रम उपलब्ध असतात त्यांवर विविध कारणांनी मर्यादा असतात. अशा स्थितीत सामाजिक निवड कशा पद्धतीने होते हा प्रश्न राज्यशास्त्र व अर्थशास्त्राशी संबंधित परिस्थितीत महत्त्वाचा ठरतो. अर्थशास्त्रीय स्थितीच्या संदर्भात निवडीवर मर्यादा असताना सामाजिक कल्याण फलन व सामाजिक निवड या दोन्ही अंगानी केलेल्या लिखाणांचे अलिकडील सर्वेक्षणातून (ब्रेटन व वेमार्क, 2002) हा विषय अजूनही अभ्यासकांच्या आवडीचा आहे असे दिसते.

## सामाजिक निवड व राज्यशास्त्र [1]

सामाजिक निवडीचा विचार राज्यशास्त्राच्या अभ्यासकांना महत्त्वाचा न वाटला तर नवलाचे ठरले असते. राज्यशास्त्रात सामाजिक निवड सिद्धान्ताचा मोठ्या प्रमाणात उपयोग झालेला आढळतो. (पहा. मायरसन, 1996). बहुतेक वेळा सामाजिक निवडीचा विषय द्युत सिद्धांताच्या तुलनेत विचारात घेतलेला आढळतो. या लिखाणातून राजकीय संस्थांचे विश्लेषण (जे भिन्न व्यवस्थात निराळे असते) समाविष्ट केल्याने सामाजिक निवड सिद्धान्त जास्त फलदायी ठरतो असा सर्वसाधारण निष्कर्ष काढता येतो. ब्रॉडवे (2001) यांनी आदर्शवादी दृष्टिकोनातून सार्वजनिक धोरणांचा विचार करताना सामाजिक निवड विचारात घ्यावी काय असा प्रश्न उपस्थित करून त्याचे नकारार्थी उत्तर देताना आदर्शवादी विचारांचा सामाजिक निवडीवर परिणाम होण्याची गरज प्रतिपादन केली आहे. बर्ट (2004) यांनी सामाजिक निवड सिद्धान्त व सामाजिक कल्याण सिद्धान्ताचा वापर करून सामाजिक संघर्षाचे प्रतिमान विकसित केले आहे. यात विशिष्ट

समाज मूल्यांच्या आधारे सोडवणूकीची सामाजिक प्रक्रिया या स्वरूपात सामाजिक संघर्षाचा विचार केला आहे. ॲरो यांच्या सिद्धांताचा वापर करून समाज कल्याण फलन सिद्ध केले आहे. यात सामाजिक कल्याण फलन वैयक्तिक मूल्यांवर अवलंबून रहाते. आदर्श व वास्तवातील फरकावर सामाजिक कल्याण अवलंबून असते तर सत्तेच्या गैरवापरामुळे आदर्श व वास्तवात फरक निर्माण होतो. राज्यशास्त्रातील सामाजिक निवड सिद्धान्त व गैर सहकारी द्युत सिद्धान्ताचा प्रत्यक्षानुसारी राज्यशास्त्राच्या संदर्भात तुलनात्मक विचार करून द्युत सिद्धान्ताची चौकट-तिच्यातून निर्दिष्ट भाकिते निघत असल्याने अधिक स्वीकारार्ह असल्याचा निर्वाळा दिला आहे. (ऑस्टीन-स्मिथ व बँक्स, 1998) मात्र निर्दिष्ट भाकिते प्राप्त होणे, किमान लोकशाही घटक कायम असणे व जटील परिस्थिती विचारणीय ठरणे हे तीन घटक एकदम साध्य करण्याच्या संदर्भात दोन्ही पद्धतीतून निवड करणे कठीण बनते. एपस्टाईन (1998) यांनीही वाटपवादी राजकीय धोरणांच्या संदर्भात केवळ सामाजिक निवड सिद्धान्ताचा अवलंब करण्याऐवजी सामाजिक निवड अवलंबून राहते अशा राजकीय संस्थांचे विश्लेषण करणे अधिक उपयुक्त ठरेल असा अभिप्राय दिला आहे. सामाजिक निवड सिद्धान्ताच्या राज्यशास्त्रातील उपयोगाबाबत जी निराशा आढळते त्यातून तडजोडीचा मार्ग शोधण्याचा प्रयत्न (ड्रायझेक व लिस्ट, 2002) यांनी केला आहे व लोकशाहीत अधिक चर्चा करण्याची प्रवृत्ती जोपासली तर सामाजिक निवड साध्य होऊ शकते असे मत व्यक्त केले आहे.

### पुढील वाटचाल

गेल्या पन्नास वर्षातील सामाजिक निवड सिद्धान्तातील घडामोडी बघितल्या तर हे क्षेत्र अभ्यासकांना सातत्याने आकृष्ट करण्यात यशस्वी ठरले आहे हे उघड आहे. या पुढील काळात या ज्ञानशाखेत काय होईल याचा अंदाज बांधणे कठीण आहे. मात्र आजवर आदर्शवादी अंगाने वाढलेल्या या शाखेतील बदल यापुढे वास्तवाचे स्पष्टीकरण करण्याच्या प्रयत्नातून होण्याची शक्यता वर्तवता येते. वर्तणूकीच्या अर्थशास्त्राचा (Behaviaral economics) उदय व गटांचे वर्तन दोन गोष्टींचा उल्लेख या संदर्भात करता येईल.

निवड सिद्धान्ताचा पाया व्यक्तिची निवड तर्कसंगत (Behavioural Economics) या गृहितकावर आधारलेली आहे. अशा विविध व्यक्तींच्या निवडीतून सामाजिक निवड कशी सिद्ध होते या प्रश्नाचा वेध सामाजिक निवड सिद्धान्ताने घेतला आहे. सुरूवातीला विविध अटींनी जखडलेले उपयोगितेसंबधीचे विवेचन आता वास्तवातील निवडी बाबतच्या अनेक व्यामिश्रता आपल्या कवेत घेत विस्तारले आहे. नव्याने पुढे येणारी (Behavioural Economics) ही शाखा व्यक्तिची निवड नेहमीच तर्कसंगत असेल त्या गृहितकावर आक्षेप घेत निवडीच्या प्रश्नांचा विचार करते. प्रायोगिक पद्धतीचा अवलंब करत असलेली ही शाखा व्यक्तिंच्या निवडीबाबत ज्या गोष्टी मांडते त्यांचे बाजारपेठेतील किंमतीवर काय परिणाम होतील, किंवा अशा व्यक्तिसमूहाची (सामाजिक) निवड काय स्वरूपाची असेल अशा प्रश्नांचा अटळपणे अभ्यासविषयात समावेश होईल त्याचा परिणाम सामाजिक निवड सिद्धान्तावर खचितच होईल.

दुसरी गोष्ट आजवर सामाजिक निवड सिद्धान्ताचा सामाजिक कल्याणाच्या संदर्भात विचार झाला पण निवडणुकांवर आधारित लोकशाही व्यवस्थेत एखाद्या मुद्यावर बहुमत संघटित करण्याऐवजी हितसंबधियांचा दबाव गट बनवून

आपले हित साधण्याचा प्रयत्न केला जातो व अशा भिन्नगटांच्या स्पर्धा तडजोडीतून सार्जजनिक (राजकोषीय) निर्णय घेतले जातात. वस्तुनिष्ठ राज्यशास्त्रातील निवड सिद्धांताच्या वापराबाबत जो तुटपुंजा आढावा इथे मांडला आहे त्यावरून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय राजकारणातील सद्यस्थितीचे विश्लेषण करण्याच्या प्रयत्नात सामाजिक निवड सिद्धांताचा द्युत सिद्धाताच्या बरोबरीने उपयोग होत आहे. या प्रयत्नांतून राजकारणाचे स्पष्टीकरण कितपत होईल यांचा अंदाज करणे कठीण असले तरी सामाजिक निवड सिद्धांताला नवीन धुमारे फुटतील व ही विचारधारा अधिक समृद्ध होईल असा विश्वास वाटतो.

कंपन्यांच्या व्यवस्थापनांत मोठे घोटाळे होण्याचे प्रकार हल्ली मोठ्या प्रमाणात उघडकीस आल्याने निगम शासन (Corporate Governance) हा मुद्दा चर्चेचा विषय बनला आहे. कंपन्यांचा कारभार फक्त भागधारकांचे हित साधण्याच्या उद्देशाने व्हावा की त्यात कर्मचारी, ग्राहक, पुरवठादार व समाज या व्यापक घटकांच्या (Stakeholders) हिताचाही विचार व्हावा हा मतभेदाचा एक मुद्दा आहे. अमेरिका, ब्रिटन या देशांत भागधारकांचे हित हा निकष प्रधान मानावा असा मत प्रवाह आहे. तर जपान, जर्मनी या देशांत भागधारकांच्या बरोबरीने किंवा प्राधान्याने व्यापक समाज घटकांवर होणारा परिणाम विचारात घ्यावा असे मानण्यात येते. या संदर्भात सर्व भागधारकांचे हित समान असते का ? भागधारकांच्या भिन्न गटांच्या हितसंबंधात अंतर्विरोध निर्माण झाला तर कुणाच्या हिताला प्राधान्य मिळावे/मिळते ? भागधारकांच्या बरोबरीने इतर घटकांचा विचार करताना परस्पर विरोधी हितसंबंध असण्याची शक्यता अधिकच बळावते. या ठिकाणीही विविध गटांच्या (विरोधी असणाऱ्या) हितसंबंधातून सामान्य हिताच्या बाबी कशा निश्चित करता येतील ही बाब महत्त्वाची बनते. भागधारकांच्या लोकशाहीतून हे साध्य होईल का? कंपन्यांवर ताबा मिळवण्याच्या चढाओढीतून हे साध्य होईल का ? कंपन्यांवर नियंत्रणे असणे आवश्यक आहे का ? हे प्रश्न आहेत. या प्रश्नांचा विचार करतानाही सामाजिक निवड सिद्धान्ताचा उपयोग करता येईल का ? याचा शोध घेता येईल.

## सादर केलेले निबंध

या गटातील चर्चेसाठी सादर केलेल्या निबंधाच्या संख्येवर (सहा) भाष्य करणे कठीण व अनावश्यकही आहे. यापैकी बहुतेक निबंध लेखकांनी सामाजिक निवड सिद्धांताचा कल्याणाच्या संदर्भात विचार केला आहे. कदाचित अमर्त्य सेन यांना इ.स. 1999 चे नोबेल पारितोषिक मिळाल्यामुळे असेल पण सेन यांच्या विचारांबाबत दोन निबंध सादर झाले आहेत. उर्वरित चार निबंधातही सेन यांच्या विचारांचे प्रतिबिंब ठळकपणे पडलेले आढळते. नवीन आर्थिक धोरण व कामगार हा सातवा निबंध विषय कक्षेत येतो का नाही याबाबत मतभेद संभवतात. प्रस्तुत लेखकाच्या मते हा निबंध विषय कक्षेत बसत नाही.

''अमर्त्य सेन एक कल्याणकारी विचारवंत'' ह्या सी.आर. जाधव यांच्या निबंधात सेन यांच्या विचारांचा आढावा घेतला आहे. सेन यांनी विविध विषयांवर विपुल लिखाण केले असल्याने दुष्काळ, शिक्षण व आरोग्य, दारिद्र्य, सामाजिक कल्याण, सार्वजनिक कृती व सामाजिक निवड या सर्व मुद्यांचा परामर्श घेण्याचा प्रयत्न केला म्हणजे अटळपणे प्रत्येक मुद्यांचा अत्यंत त्रोटक पद्धतीने विचार करता येतो तसे या निबंधात झाले आहे. सेन यांनी हाताळलेले बरेच विषय सामाजिक निवडीशी संबंधित आहेत. निबंधात हाताळलेल्या अनेक

विषयांचा सामाजिक निवड सिद्धान्ताशी नेमके काय नाते आहे त्या मुद्द्याचा समावेश निबंधात झाला असता तर निबंधाचे या चर्चेचील महत्त्व वाढले असते. ''अमर्त्य सेन यांचे सामाजिक कल्याणाचे निकष'' हा सुरेखा देसाई यांचा निबंधही सेन यांच्या सामाजिक कल्याणाबाबतच्या लिखाणाच्या अनेक अंगाना स्पर्श करणारा आहे. अमर्त्य सेन यांच्या सामाजिक कल्याण या क्षेत्रातील योगदानाबाबत सविस्तर चर्चा करण्याचा या निबंधाचा उद्देश असला तरी उत्पन्न आणि वितरण, शिक्षण आणि आरोग्य, दारिद्र्याचे मोजमाप, कल्याणाचे निर्देशांक, स्त्रियांचा दर्जा व निरक्षरता अशा विविध मुद्यांचा समावेश असल्याने निबंधातील चर्चा त्रोटकच रहाते. सेन यांचे विचार भारतासारख्या देशातील धोरणकर्त्यांना दिपस्तंभ ठरतील असा विश्वास लेखिकेने व्यक्त केला आहे. खरे तर 6-14 या वयोगटातील मुलांना प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे देण्याचे उद्दिष्ट भारतीय राज्य घटनेत प्रथमपासूनच समाविष्ट केले होते. प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराबाबत असमाधान असले तरी त्याची कारणे सदोष अंमलबजावणीत शोधावी लागतील. सेन यांच्या लिखाणाने प्राथमिक शिक्षणाचे महत्त्व राज्यकर्त्यांना कळले असे नाही. सेन व इतरांच्या लिखाणाने अर्थशास्त्राने राष्ट्रीय उत्पन्न वाढविण्यासाठीही शिक्षण, आरोग्य यांचे महत्त्व ओळखले असे म्हणणे अधिक बरोबर ठरेल.

विकास नीतितील सामाजिक निवड सिद्धांताचे स्थान या मंजुषा मुसमाडे यांच्या वैशिष्टपूर्ण निबंधातील विवेचन प्रस्तुत विषय कक्षेत मांडण्याचा स्तुत्य प्रयत्न केला आहे. सामाजिक निवड सिद्धातांत अर्थशास्त्राच्या अभ्यासकांनी भर घातली असली तरी या सिद्धातांचा संभाव्य आवाका मोठा असून या सिद्धांताच्या विकासात निवडीच्या अनेक पैलूंचा अभ्यास होत राहिल्याने विकासाची प्रक्रिया तिच्या बहु आयामी पैलूसकट समजण्यास मदत झाली आहे हा मुद्दा विवेचनातून परिणामकारकरित्या मांडला जातो. सामजिक निवड सिद्धांतनाचे संभाव्य उपयोग राज्यशास्त्र, समाजशास्त्र, सामाजिक व राजकीय मानसशास्त्र अशा विविध क्षेत्रात होऊ शकतो ही बाबही प्रकर्षाने पुढे येते. सामाजिक निवड सिद्धान्तातील विविध लेखकांच्या लिखाणाचा परामर्श घेताना त्यांच्या विवेचनाचा उल्लेख थोडक्यात करणे टाळता येत नसले तरी ज्या लिखाणांचा उल्लेख केला आहे त्याचा संपूर्ण संदर्भ निबंधाच्या शेवटी दिल्याने निबंधाचे संदर्भ मूल्य वाढले असते. उदा. गिबार्ड यांच्या निवडीच्या विरोधाभासावर निबंधात सविस्तर चर्चा आहे पण गिबार्ड यांच्या नेमक्या कुठल्या लिखाणांचा संदर्भ लेखिकेच्या विवेचनात आहे हे वाचकांच्या लक्षात येत नाही. निवडीचे स्वातंत्र्य म्हणजे विकास या मुद्यांचे विवेचन करताना सेन यांच्या Development as Freedom चा उघड उल्लेख येत नाही हे काहीसे आश्चर्यकारक वाटते.

''सामाजिक निवडसंदर्भात एक वेचक साहित्य सर्वेक्षण'' या संतोष बबनराव यादव यांच्या निबंधात सामाजिक निवड सिद्धांतातील व्यापक बदलांच्या पार्श्वभूमीवर ॲरो, सेन व जॉन रॉल्स यांच्या विवेचनाचा परिचय करून दिला आहे. सामाजिक निवड सिद्धान्तातील आधुनिक घडामोडींचा उद्देश प्रामुख्याने निवडीच्या प्रक्रियेची विविध अंगे विचार कक्षेत आणणे निवडीची प्रक्रिया तिच्यातील सर्व गुंतागुंतीसकट समजून घेणे हा आहे; कल्याणाचा विचार सामाजिक निवड सिद्धाताच्या सहाय्याने करता आला तरी सामाजिक निवडीचा विचार कल्याणापुरताच मर्यादित ठेवणे इष्ट नाही हा मुद्दा लेखक यशस्वीपणे मांडतो.

मुक्ता जहागिरदार यांच्या ''सामाजिक

निवड सिद्धान्त-स्वरूप आणि मूल्यांकनाच्या परिदृष्टीतून उपयोगितावादी विश्लेषण'' या निबंधाची रचना सामाजिक निवड सिद्धांताचे कल्याणकारी अर्थशास्त्राच्या परिघातील विवेचन करण्याच्या उद्देशाने केली आहे. यामुळे सामाजिक निवड सिद्धांताकडे काहीशा मर्यादित आवाक्यातून बघितले गेले तरी त्याची भरपाई निवडलेल्या बाबींचा तपशीलवार विचार करण्यातून होते. कल्याणकारी विचाराच्या संदर्भात समानतेचे महत्त्व विशद करत उपयोगितावादी दृष्टिकोनातून समानतेचा पुरस्कार कशा पद्धतीने होउ शकतो हे स्पष्ट करून उपयोगितेच्या मोजमाप करण्यातील अडचणींचा विचार जहागिरदार यांनी केला आहे. समानता व कार्यक्षमता यांचा आंतरसंबंध स्पष्ट करत निवडीच्या स्वरूपात स्वातंत्र्याचे महत्त्व विशद करत आपल्या निबंधात सेन यांच्या संबधित लिखाणाच्या महत्त्वाच्या बाबींचा लक्षणीय व उपयुक्त आढावा घेतला आहे.

ककडे, नलवडे व भोसले यांचा नवीन आर्थिक धोरण व कामगार कल्याण या निबंधाचा सामाजिक निवड सिद्धांताच्या संदर्भात विचार करता येणे कठीण आहे. पण कोल्हापूरातील औद्योगिक कामगारांच्या रोजगार व अनुषगिंक बाबींवरील परिणामाबाबतचे प्रत्यक्ष निरिक्षणावर आधारलेले विवेचन निराळ्या संदर्भात उपयोगी पडावे.

**चर्चेसाठी मुद्दे**

या चर्चासत्रात समाविष्ट निबंधात ज्या मुद्यांचा उहापोह केला आहे. त्या सर्व मुद्यांवर व त्या अनुषंगाने उपस्थित होणाऱ्या इतर बाबींवर अर्थातच चर्चा संभवते. पण याशिवाय आणखी काही मुद्दे संभाव्य चर्चेसाठी मांडले आहेत. चर्चेसाठी त्या मुद्दयांचा विचार व्हावा.

1. सामाजिक निवड सिद्धांताच्या सध्याच्या अमूर्त स्वरूपातील चर्चेमुळे हा विषय मर्यादित कक्षेत राहिला आहे का ? हा सामान्यांच्या कक्षेत येण्यासाठी काय करता येईल? सामाजिक निवड सिद्धांत माहिती झाल्याने सामाजिक निवडीवर काही परिणाम होईल का ?

2. सामाजिक निवड सिद्धांतामुळे समाजकल्याण साधण्यास मदत होणे अपेक्षित होते का ? तशी ती झाली का ?

3. सामाजिक निवड सिद्धांतामुळे वास्तव समजावून घेण्यास मदत होईल का ? झाली का ?

4. सामाजिक निवड सिद्धांतात पुढील काळात काय घडामोडी/बदल संभवतात. या पुढील काळात सामाजिक निवड सिद्धांताचा लाभ राज्यशास्त्रास मिळेल की अर्थशास्त्रास ?

**चर्चेचा गोषवारा**

निबंध लेखकांनी आपापले निबंध सादर केल्यानंतर झालेल्या चर्चेत विविध मुद्यांचा उहापोह करण्यात आला. नी.भा. सप्रे यांनी सामाजिक निवड कठीण होण्यात बाह्य घटकांचे महत्त्व विशद करून सामाजिक निवडीचा परिणाम खाजगी निवडीवर होण्याच्या शक्यतेकडे लक्ष वेधले. सुभाष दगडे यांनी मानवी कल्याणाचा विचार म.फुले आदी भारतीय विचारवंतांनी केला होता असे मत व्यक्त करून मानवी कल्याण साधण्यातील विविध अडथळ्यांची चर्चा केली. विजयकुमार अदवंत यांनी भिन्न गटांना एकत्र येउन कल्याणकारी तत्त्वांचा स्वीकार कसा करता येईल या प्रश्नाचा विचार करण्याची गरज प्रतिपादन केली. ज.फा पाटील यांनी सामाजिक निवडीच्या प्रक्रियेत कालौघात झालेल्या बदलांची चर्चा करताना नगरपालिकांसारख्या संस्थामधील निर्णय प्रक्रियांची चर्चा केली. संमेलनाध्यक्ष सर्जेराव

ठोंबरे यांनी निवड व कल्याण यातील द्वंद्वाकडे लक्ष वेधले. सध्याच्या काळात सैद्धांतिक विषयांकडे दुर्लक्ष होत असल्याची खंत व्यक्त करत अशा विषयांकडे अधिक लक्ष पुरविण्याची गरज त्यांनी प्रतिपादन केली.

## संदर्भसूची


1. Arrow K.J. (1951) Social Choice and Individual Values, Wiely New York

2. Austin-Smith David, Banks Jeffrey S (1998) Social Choice Theory, Game Theory and Political Theory Annual Review of Political Science pp. 259-87

3. Breton Michel Le Weymark John A (2002) Arrovian Social Choice Theory on Economic Domains.

4. Burt Gordon (2004) Modelling Conflict : Social Choice Theory and Social Welfare Theory.

5. Broadway Robin (2001) The Role of Public Choice Consideration in Normative Public Economics.

6. Dryzek John S, List Christin (2002) Social Choice Theory and Deliberative Democracy: A Reconciliation.

7. Epstein David (1998) Uncovering some subtleties of uncovered set : Social Choice Theory and Distributive Politics Social Choice & Welfare (15) 81-93.

8. Myerson Roger B (1996) Fundamentals fo Social Choice Theory Northwestern University, Evanston, Discussion Paper 1162.

9. Sen A.K. (1970) Collective Choice and Social Welfare Holden-day San Francisco.

10. Sen Amartya (1983 B) Social Choice Theory : A Re-examination in Sen Amartya (1983).

11. Sen Amartya (1983a) Introduction in Sen Amartya (1983).

12. Sen Amartya (1983) Choice, Welfare and Measurement Oxford University Press, Delhi


♦♦♦


## आजीव सभासद व्हावयाचे असल्यास

आपल्याला मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सभासद व्हावयाचे असल्यास रू. 1200/- व साधारण सभासद (वार्षिक) व्हावयाचे असल्यास रू.250/- कार्यवाह-खजिनदारांकडे पाठवावेत. सभासद होण्यासाठी कार्यवाह-खजिनदारांकडे अर्ज करावा लागेल व कार्यकारिणीने मंजूरी दिल्यावरच सभासदत्व प्राप्त होऊ शकेल. अर्ज कार्यवाह खजिनदारांकडे उपलब्ध आहेत

कार्यवाह – खजिनदार

चर्चासत्र दुसरे

# भारतातील घटक राज्यांची ऋणग्रस्तता

✦ सूत्र संचालक - भगवान सो. म्हस्के, औरंगाबाद.

*प्राध्यापक, (सेवानिवृत्त) अर्थशास्त्र विभाग,*

*डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.*

बारामती जि. पूणे येथे संपन्न झालेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या 29 व्या अधिवेशनासाठी ''घटक राज्यांची ऋणग्रस्तता'' या तांत्रिक सत्रात एकूण तेरा निबंध सादर झाले. त्यापैकी 6 निबंध संयुक्तरित्या तर सात निबंध स्वतंत्ररित्या सादर करण्यात आले. निबंध लेखकांनी राज्यांच्या ऋणग्रस्ततेचे स्वरूप, कारणे, परिणाम व उपाय त्याचबरोबर राष्ट्रातील वित्त आयोग व राज्यांच्या ऋणमुक्तीसाठी विविध वित्त आयोगांनी केलेल्या शिफारशींची उपयुक्तता यावर सांगोपांग चर्चा केली.

इ.स. 1991-92 ते 2003-04 या कालावधीत महाराष्ट्र राज्याने आंध्रप्रदेश, बिहार, कर्नाटक, मध्यप्रदेश, पंजाब, उत्तरप्रदेश इत्यादी घटक राज्यांपेक्षाही जास्तीचे कर्ज घेतलेले असून राज्याच्या योजनेतर खर्चातील वाढीमुळे महाराष्ट्र राज्यात उत्तरोत्तर महसुली तूट निर्माण झाली व ही तूट भरून काढण्यासाठी महाराष्ट्र राज्याला केन्द्रसरकारकडून व खुल्या भांडवल बाजारातून मोठ्या प्रमाणात कर्ज उभारावे लागले. राजकीय पक्षांच्या सवंग व लोकप्रियतेसाठी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी राज्यसरकारचा अनुत्पादक खर्च वाढत असून केन्द्र सरकारचे कर्ज विषयक धोरण व राज्याच्या आर्थिक व्यवस्थापनाच्या आधारे महाराष्ट्र राज्याला कर्जाच्या विळख्यातून बाहेर काढणे शक्य आहे असे मत माधव गायकवाड व मधुकररावजी खंदारे (औरंगाबाद) यांनी त्यांच्या '' महाराष्ट्रावरील वाढता ऋणभार: एक अर्थशास्त्रीय अवलोकन'' या निबंधात नोंदविले. तर रामदास माहोरे (नागपूर) यांनी ''घटक राज्यांची ऋणग्रस्तता आणि 12 वा वित्त आयोग'' या निबंधात राष्ट्रातील समग्र राज्यांच्या ऋणग्रस्ततेचा आढावा घेऊन राज्यांकडील थकित कर्जाच्या समस्येचे गांभिर्य विशद केले. माहोरे यांनी 12व्या वित्त आयोगाच्या अहवालात घटक राज्यांच्या

ऋणग्रस्ततेसाठी केलेल्या शिफारशींचा चिकित्सक आढावाही घेतला.

भारतीय राज्यघटनेनुसार अधिक महसूल मिळवून देणारी उत्पन्नाची साधने केन्द्रसरकारच्या वाट्याला, तर कमी महसूल मिळवून देणारी उत्पन्नाची साधने राज्य सरकारच्या वाट्याला आलेली आहेत. एवढेच नव्हे तर अधिक खर्च येणारी व लोकांच्या दैनंदिन व्यवहारातील जनकल्याणकारी कार्ये करण्याचे राज्यांना घटनात्मक बंधन आहे त्यामुळे घटक राज्यांना उत्पन्न कमी व खर्च जास्त अशी स्थिती निर्माण होते. परिणामत: घटकराज्यांना कर्ज घेणे अनिवार्य ठरते याचे विश्लेषण वर्षा नेहते (भालादे) यांनी केले. शशिकांत गाडगीळ (कराड) यांनी ''घटक राज्यांच्या वाढत्या कर्जबाजारीपणाच्या समस्येचे स्वरूप'' या निबंधात, देशातील घटक राज्यांच्या एकूण कर्जाची रचना स्पष्ट करून केन्द्र सरकारच्या जास्तीच्या व्याजदराच्या कर्जाची झळ घटक राज्यांना सहन करावी लागत असल्याचे मत व्यक्त केले तर सूमित्रा पवार (भुसावळ) यांनी मानवी व नैसर्गिक आपत्तीच्या काळात घटकराज्यांना कर्जे घ्यावी लागत असल्याने भारतातील घटक राज्यांची ऋणग्रस्तता वाढत असल्याचे मत नोंदविले.

लता धेंडे व स्वाती आदक (पुणे) यांनी संयुक्तरित्या लिहिलेल्या निबंधात महाराष्ट्राच्या ऋणग्रस्ततेचे स्वरूप व ऋणग्रस्ततेची कारणे, स्पष्ट करून राज्यात राज्यासाठी 'आदर्श वित्तीय जबाबदारी कायदा' केल्यास राज्याला कर्जमुक्त करता येण्याची शक्यता वर्तवली. तर बाळासाहेब पाटील(इस्लामपूर) यांनी सहसंबंधगुणक (Corre-lation) या सांख्यिकिय साधनाचा वापर करून महाराष्ट्र राज्याचे उत्पन्न व खर्च यांचा जवळचा संबंध असल्याचे सिद्ध केले. तसेच राज्याची ऋणग्रस्तता कमी करण्यासाठी राज्याच्या महसुली उत्पन्नात वाढ करण्याचा उपाय त्यांनी सूचविला.

महाराष्ट्र राज्याच्या दरडोई थकित देयतेमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असून त्यामध्ये अंतर्गत कर्जाचे प्रमाण वाढत असतानाच केन्द्रसरकारचे कर्जाचे प्रमाण कमी होत आहे असे मत व्ही.एस.सुतार,आर.एस.वाईगंडे व आर.एस. म्होपरे (कोल्हापूर) या तीन संशोधक विद्यार्थ्यांनी संयुक्तरित्या लिहिलेल्या निबंधात मांडले. तर सौ निता चोरडीया (भुसावळ) यांनी महाराष्ट्र राज्याच्या कर्जबाजारीपणा या संदर्भातील राजकारण आपल्या निबंधात स्पष्ट केले. महाराष्ट्र राज्याचे कर्ज कमी करण्यासाठी राज्याने उत्पन्न वाढीचे नवीन स्रोत शोधावे व राज्याच्या अनुत्पादक खर्चात कपात करून महसुली तूट कमी करावी अशी सूचना बाळासाहेब माने व जगन्नाथ पाटील यांनी संयुक्तरित्या लिहिलेल्या निबंधात केली. तर रमेश कटके (शिसर-घोडनदी) यांनी व्यापारी, उद्योगपती, घरबांधणी करणारे, राजकीय नेते यांच्या करचुकवेगिरीमुळे महाराष्ट्र राज्याचे उत्पन्न कमी होत असल्यामुळे राज्याला कर्जाचा आधार घ्यावा लागत असल्याचे मत नोंदविले.

पाटील ज.फा. व राहुल म्होपरे(कोल्हापूर) यांनी त्यांच्या ''घटक राज्यांचा कर्जबाजारीपणा व वित्त आयोगांच्या शिफारशी'' या निबंधात पहिल्या वित्त आयोगापासून ते बाराव्या वित्त आयोगापर्यंतच्या घटक राज्यांच्या ऋणमुक्ततेसाठी केलेल्या शिफारशींचा आढावा घेतला तर अमोल कांबळे व रोहिणी पाटील यांनी घटक राज्यांच्या ऋणग्रस्ततेचा राज्याच्या गुंतवणूक, उत्पादन, उपभोग, वितरण इत्यादी बाबींवर होणाऱ्या परिणामाचे विश्लेषण केले. कल्पना भागवत व विद्या पाटील यांनीही राज्यांच्या ऋणग्रस्ततेचे गांभिर्य स्पष्ट करणारा निबंध सादर केला.

उपरोक्त निबंधाच्या सादरीकरणानंतर अनेक अभ्यासकांनी काही प्रश्न उपस्थित केलेत, त्या प्रश्नांची निबंध लेखकांनी समर्पक उत्तरे दिली. विजयकुमार अदवंत यांनी घटक राज्यांची सामाजिक कल्याणासाठी केलेला खर्च व घटकराज्यांनी सामाजिक कल्याणासाठी केलेला खर्च व घटक राज्यांचे कर्ज यांचा सहसंबधात्मक अभ्यास होण्याची निकड व्यक्त केली तर कृष्णराव पाटील यांनी आर्थिक विकासासाठी अर्थसंकल्पीय तूट व तूट भरून काढण्यासाठी कर्ज ही बाब अनिवार्य असून राज्याच्या कर्जबाजारीपणाला घाबरण्याचे कारण नाही असे मत मांडतानाच केन्द्र सरकारने पर्याप्त प्रमाणात घटक राज्यांना अनुदाने दिल्यास कर्जाची गरजच भासणार नाही असे मत व्यक्त केले. मुक्ता जहागिरदार यांनी बाराव्या वित्त आयोगाच्या शिफारशी संदर्भात आपले मत मांडतांना असे सांगितले की, '' बाराव्या वित्त आयोगाने घटक राज्यांच्या -ऋणमुक्ततेसाठी केलेल्या सूचना निरूपयोगी आहेत'' नि. भा. सप्रे यांनी घटक राज्यांच्या ऋणग्रस्ततेचे गांभिर्य विशद करताना असे मत मांडले की, ''राज्य सरकारने राज्यातील विविध महामंडळांच्या कर्जाची हमी घेतलेली असते त्यामुळे राज्यातील विविध महामंडळांचये कर्ज हे राज्यसरकारचेच कर्ज असते'' तर राज्यांची ऋणग्रस्तता व राजकीय डावपेच यांचा घनिष्ठ सहसंबंध असून या संदर्भात अभ्यास होणे अनिवार्य आहे असे मत के.जी.पठाण यांनी मांडले. प्रत्येक घटक राज्यांना, राज्यातील दुर्बल व शोषित घटकाच्या कल्याणासाठी मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागत असल्यामुळे कर्ज घेणे अनिवार्य ठरते. या पार्श्वभूमीवर शोषित व दुर्बलांवर होणारा खर्च आणि राज्यांचे कर्ज यांचा परस्पर संबंध स्पष्ट करणारे व शोषितांच्या शोषणाचे विश्लेषण करणारे नवे अर्थशास्त्र अभ्यासकांनी निर्माण करण्याची मौलीक सूचना एच.एम. देसरडा यांनी केली.

सत्राच्या शेवटी परिषदेच्या स्थानिक कार्यवाह मनिषा काकडे यांनी निबंध वाचक व उपस्थितांचे आभार मानले.

✦✦✦

## मराठी अर्थशास्त्र परिषद

## अंक परत आल्यास

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ज्या आजीव सदस्यांचा पत्ता बदललेला असेल त्या सदस्यांनी आपला बदललेला पत्ता कार्यवाहांना लेखी कळवावा. म्हणजे कार्यालयातील दस्ताऐवजात आवश्यक तो बदल करून घेऊन त्या पत्त्यावर अर्थसंवाद चे अंक पाठविले जातील. पत्ता बदलल्यामुळे अथवा अन्य कोणत्याही कारणाने अर्थसंवाद चा अंक परत आल्यास त्यापुढील अंक पाठविण्याचे बंद करण्यात जाते. सर्व आजीव सदस्यांनी कृपया याची नोंद घ्यावी.

**चारूदत्त गोखले**
कार्यवाह - खजिनदार

चर्चासत्र तिसरे

# महाराष्ट्रातील जिल्हा नियोजन

✦ **सूत्र संचालक - रामदास य. माहोरे, नागपूर.**

*प्राध्यापक, पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग,*

*राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.*

### उपोद्घात

जिल्ह्याचा समतोल विकास साधणे हा जिल्हा नियोजनाचा उद्देश असतो. जिल्हा नियोजन हे स्थानिक गरजांच्या पूर्ततेचे आणि स्थानिक विकासाचे साधन होय. व्ही.के.आर.व्ही राव यांच्या मते जिल्हा नियोजन ही जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्र व साधन संपत्तीच्या विकासाची प्रभावी यंत्रणा होय. जिल्हा नियोजन सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. म्हणूनच नियोजनाचा आराखडा तयार करताना पुढील बाबींचा विचार होणे आवश्यक आहे.

1) जिल्ह्यात उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधा

2) जिल्ह्याची भौगोलिक स्थिती, आकार आणि उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्ती

3) जिल्ह्याची विचाराधीन वर्षातील प्रक्षेपित लोकसंख्या

4) मानव संसाधन विकास आणि रोजगाराच्या संधी

5) अस्तित्वात असलेल्या विविध संस्था आणि त्यांचे विकासातील योगदान

6) कार्यरत असलेल्या विकासाच्या विविध योजना इत्यादी.

जिल्हा नियोजनात स्थानिक स्वराज संस्थांना योजना तयार करण्यात आणि त्यांची अंमलबजावणी करण्यात स्वायत्तता असली पाहिजे. जर या संस्थांना स्वायत्तता असली तर नियोजनाचे खऱ्या अर्थाने लोकशाही विकेंद्रीकरण होऊ शकेल. परिणामी समतोल आणि सर्वांगिण विकास साधता येऊ शकेल. राज्याची वार्षिक योजना तयार केल्यानंतर निधीची जिल्हानिहाय विभागणी म्हणजे जिल्हा नियोजन नव्हे. जिल्हा नियोजनात स्थानिक योजनांची निवड अग्रक्रमानुसार केली तरच जिल्हा नियोजनाद्वारे

स्थानिक गरजांची पूर्तता होऊ शकेल. 73 व्या आणि 74 व्या घटना दुरूस्तीनुसार पंचायत राज संस्था आणि नगरपालिका व महानगरपालिकांच्या वित्तीय आणि प्रशासकीय अधिकारात वाढ अपेक्षित होती.

भारतीय राज्य घटनेच्या 74 व्या घटना दुरूस्तीमधील अनुच्छेद 243 Z (d) नुसार महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा नियोजन समितीची स्थापना करण्यात आली. 15 मार्च 1999 पासून जिल्हा नियोजन व विकास मंडळे बरखास्त करण्यात आली. जिल्हा नियोजन यशस्वी करण्यासाठी जिल्हा स्तरावरील नियोजन समिती अधिकार संपन्न आणि सक्षम असली पाहिजे. नियोजनाच्या योग्य कार्यवाहीसाठी तज्ज्ञ मार्गदर्शक आणि कर्तव्यदक्ष अधिकारी उपलब्ध असले पाहिजेत. त्यांनी पंचायत समिती आणि ग्रामपंचायत पातळीवर योजना तयार करण्यासाठी मार्गदर्शन केले पाहिजे.

महाराष्ट्र शासनाच्या 4 मे 2000 च्या सुधारित अधिसूचनेनुसार जिल्हा नियोजन समिती गठित केली जाते. या समितीची सदस्य संख्या जिल्ह्याच्या लोकसंख्येवर अवलंबून असते. जिल्ह्याची लोकसंख्या 20 लाखापर्यंत असेल तर सदस्य संख्या 30, लोकसंख्या 20 ते 30 लाखापर्यंत असेल तर सदस्य संख्या 40 आणि जिल्ह्याची लोकसंख्या 30 लाखापेक्षा जास्त असेल तर सदस्य संख्या 50 असते.

जिल्हा नियोजन समितीत 4 प्रकारचे सदस्य असतात.

अ) पदसिद्ध सदस्य - यात पालक मंत्री, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष आणि जिल्हाधिकाऱ्यांचा समावेश होतो.

ब) नाम निर्देशित सदस्य - यात

1) राज्यपालांद्वारे वैधानिक विकास मंडळाच्या सदस्यांपैकी एका सदस्याचे नाम निर्देशन केले जाते.

2) राज्यशासनाद्वारे जिल्हा नियोजन समितीच्या क्षेत्रात वास्तव्य करणारे किंवा त्या क्षेत्रातून निवडून आलेल्या विधीमंडळ व संसदेच्या सदस्यांमधून दोन सदस्य.

3) वरील दोन प्रकारच्या नाम निर्देशना व्यतिरिक्त जिल्हा नियोजनाचे ज्ञान असलेले तज्ज्ञ सदस्य. यात 40 सदस्य असलेल्या जिल्हा नियोजन समितीमध्ये 2 तर 50 सदस्य असलेल्या जिल्हा नियोजन समितीमध्ये 4 सदस्यांचे नाम निर्देशन केले जाते. जर शासनाद्वारे नाम निर्देशित सदस्य मंत्री असेल तर त्यांना सहअध्यक्ष म्हणून पद निर्देशित केले जाते.

क) निवडून दिलेले सदस्य - एकूण सदस्य संख्येच्या 80 टक्के सदस्य निवडून दिलेले असतात.

ड) विशेष आमंत्रित सदस्य -

1) राज्य शासनाने नाम निर्देशित केलेल्या विधीमंडळ किंवा संसद सदस्याव्यतिरिक्त इतर विधीमंडळ किंवा संसद सदस्य.

2) विभागीय आयुक्त

3) जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यपालन अधिकारी

4) विभागीय आयुक्त कार्यालयातील विशेष कार्यकारी अधिकारी (नियोजन)

5) जिल्हा नियोजन अधिकारी

6) पालकमंत्र्याच्या संमतीने राज्यशासनाने नियुक्त केलेल्या अनुभवी व्यक्ती.

विशेष आमंत्रित सदस्यांची संख्या जिल्हा नियोजन समितीच्या सदस्य संख्येनुसार 10,12, किंवा 15 असते.

जिल्हा नियोजन समितीला अनेक कार्ये पार पाडावी लागतात. जिल्ह्यातील पंचायतींनी आणि नगरपालिकांनी तयार केलेल्या योजनांचे एकत्रीकरण करून संपूर्ण जिल्ह्यासाठी विकास योजनांचा आराखडा तयार करावा लागतो. जिल्हा वार्षिक योजनेच्या प्रगतीचा आढावा घेवून संनियंत्रण (Monitoring) करावे लागते. राज्यशासनाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार जिल्हा वार्षिक योजनेच्या मंजूर तरतुदींचे पुनर्विनियोजन करावे लागते. पुनर्विनियोजन म्हणजे एखाद्या क्षेत्रासाठी जास्त निधीची तरतूद करण्यात आली असेल आणि तो निधी त्या क्षेत्रासाठी अतिरिक्त आहे असे जर जिल्हा नियोजन समितीला वाटत असेल तर नियम व अटींच्या मर्यादांमध्ये हा जास्त वाटत असलेला निधी दुसऱ्या क्षेत्राकडे वळविणे होय.

जिल्हा नियोजन समितीची प्रमुख चार प्रारूपे आढळतात.

1) मंत्री अध्यक्ष प्रारूप - हे प्रारूप महाराष्ट्र, गुजरात, उत्तरप्रदेश आणि बिहार मध्ये आहे.

2) आयुक्त किंवा जिल्हाधिकारी अध्यक्ष प्रारूप - हे प्रारूप आसाम, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मिर, पंजाब, हरियाणा, राजस्थान, कर्नाटक आणि नागालँडमध्ये आहे.

3) बिगर सरकारी अध्यक्ष प्रारूप - हे प्रारूप मध्यप्रदेश आणि मेघालयमध्ये आहे.

4) विधायक अध्यक्ष प्रारूप सिक्किम मध्ये आहे.

जिल्हा नियोजन हे विकास प्रक्रियेच्या केंद्र स्थानी असते. त्याला देशाचे सार्वत्रिक नियोजन यशस्वी करण्याचे महत्त्वाचे साधन मानले जाते. जिल्हा योजनेचा आराखडा तयार करतांना जिल्हा नियोजन समित्यांना राज्य शासनाच्या नियोजन विभागाकडून आर्थिक मर्यादा कळविण्यात येतात. त्यासाठी सर्व साधारण मार्गदर्शक तत्त्वे, आर्थिक आणि भौतिक उद्दिष्टे कळविली जातात. राज्य पातळीवर आर्थिक मर्यादांचा विचार करून जिल्हा योजनेत फेरबदल केले जातात. जिल्हा नियोजन समित्यांना आपल्या अधिकाराचा उपयोग करता येत नाही. जिल्हा नियोजन समिती 100 टक्के नियोजनापैकी फक्त 28 टक्के निधीचे नियोजन करते. त्यापैकी 45 टक्के निधी केंद्र पुरस्कृत योजनांसाठी राखीव ठेवला जातो. 72 टक्के निधीचे नियोजन राज्य स्तरीय नियोजन समिती करते. यात राज्य योजनांचा वाटा 29 टक्के, अनुशेषासाठी तरतूद 38 टक्के आणि आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांचा वाटा 5 टक्के होता. (2004-05 च्या तरतुदींनुसार) वाढत्या अनुशेषाच्या आणि योग्य नियोजनाच्या अभावाचा जिल्ह्याच्या विकासावर विपरित परिणाम होतो. जिल्हास्तरीय नियोजनामध्ये लाभार्थ्यांना समान लाभ देणाऱ्या अनेक योजना आहेत. त्यामुळे मदतीचा योग्य उपयोग होत नाही.

प्रत्येक जिल्ह्याला दिली जाणारी मदत खालील निकषावर आधारित असते. जिल्ह्याची एकूण लोकसंख्या 60 टक्के, शहरी लोकसंख्या 5 टक्के, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीची लोकसंख्या 5 टक्के, कृषी क्षेत्रातील अनुशेष 5 टक्के, पाटबंधारे क्षेत्रातील अनुशेष 4 टक्के, उद्योग क्षेत्रातील अनुशेष 5 टक्के, वाहतूक क्षेत्रातील अनुशेष 5 टक्के, अवर्षण प्रवण क्षेत्रातील विशेष समस्या 3 टक्के, किनारपट्टीच्या विशेष समस्या 1.5 टक्के, वन खात्याच्या विशेष समस्या 1.5 टक्के, राज्य सरकारच्या विशेष अडचणीसाठी राखीव निधी 5 टक्के राखून ठेवण्यात येतो. निधी वाटपासाठी गाडगीळ सूत्र उपयोगात आणले जाते. यासाठी आजही 1971 च्या जनगणनेचा आधार घेतला

जातो. त्याऐवजी विद्यमान जनगणनेचा आधार घेतला पाहिजे. निधी वाटपाच्या निकषानुसार 70 टक्के निधी लोकसंख्येनुसार 19 टक्के निधी अनुशेषानुसार, 6 टक्के निधी विशेष समस्येनुसार वितरित केला जातो. तर 5 टक्के निधी राज्य सरकारच्या विशेष अडचणींसाठी राखीव ठेवला जातो.

जिल्ह्याच्या आर्थिक नियोजनात खालील 8 क्षेत्रे विचारात घेतली जातात. ती म्हणजे (1) कृषी व संलग्न सेवा, (2) ग्रामीण विकासाकरिता विशेष कार्यक्रम (3) पाटबंधारे व पूर नियंत्रण (4) विद्युत विकास (5) उद्योग व खाणकाम (6) वाहतूक व दळणवळण (7) सर्व साधारण आर्थिक सेवा (8) सामाजिक व सामुहिक सेवा. प्रत्येक क्षेत्राची काही उपक्षेत्रे आहेत. एकूण उपक्षेत्रांची संख्या 33 आहे.

भारतासारख्या विकसनशील देशात बिहार, मध्यप्रदेश, राजस्थान, उत्तरप्रदेश, आसाम, ओरिसा, पश्चिम बंगाल इत्यादी आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या राज्यांना सर्वांगिण विकासाकरिता जिल्हा नियोजन आवश्यक आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, पंजाब, केरळ इत्यादी प्रगत राज्यातील मागासलेल्या जिल्ह्यांच्या आर्थिक व सामाजिक समस्या सोडविण्यासाठी जिल्हा नियोजन आवश्यक आहे.

जिल्हा नियोजनात अनेक दोष आहेत. ते दूर झाले पाहिजेत. जिल्हा नियोजन समिती केंद्र व राज्य सरकारच्या अग्रक्रमाच्या योजनांसाठी असलेल्या तरतुदीच्या आधारावर जिल्हा नियोजन करीत असल्यामुळे स्थानिक उत्पादन घटक आणि स्थानिक गरजांच्या अग्रक्रमाकडे दुर्लक्ष होते. जिल्हा नियोजन अधिक यशस्वी होण्यासाठी जिल्ह्यातील लोक प्रतिनिधी, स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी व जिल्हा नियोजन समितीमधील अधिकारी वर्ग यांनी आपल्या कार्यक्षमतेचा पुरेपूर उपयोग करून सामान्य जनतेला नियोजनाचे लाभ मिळवून देण्यासाठी कार्यरत राहिले पाहिजे. तरच जिल्हा नियोजन ग्रामीण व शहरी जनतेचे महत्तम कल्याण साध्य करू शकेल.

### सादर झालेल्या निबंधांचा परामर्श

महाराष्ट्रातील जिल्हा नियोजन याविषयावर 13 निबंध सादर झाले. त्या निबंधाचे 3 गटात वर्गीकरण करता येईल.

1) महाराष्ट्रातील जिल्हा नियोजनाशी संबंधित - 11 निबंध

2) आदिवासींच्या नियोजनाशी संबंधित - 1 निबंध

3) गहू उत्पादन व विपणनातील समस्यांशी संबंधित - 1 निबंध

### निबंधांचा गोषवारा : महाराष्ट्रातील जिल्हा नियोजनाशी संबंधित

घाटगे आणि वावरे यांनी आपल्या शोध निबंधात सातारा जिल्ह्याचे अध्ययन करून जिल्हा नियोजनाची वास्तवता आणि भविष्यकालीन वेध घेण्याचा प्रयत्न केला. सातारा जिल्ह्याचे नियोजन दहाव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात यशस्वी करण्यासाठी त्यांनी काही उपाय सुचविले आहेत. सोनाली मोरे यांनी आपल्या शोध निबंधात पुणे जिल्ह्याच्या संदर्भात 2000-01 आणि 2004-05 या दोन वार्षिक योजनांच्या आधारे काही निष्कर्ष काढले आहेत. त्यांच्या मते राजकारण आणि आर्थिक स्थितीत झालेले बदल लक्षात घेऊन राज्य व जिल्हा संबंधाचा विचार झाला पाहिजे. जयश्री भंगाळे यांनी जळगाव जिल्ह्याच्या संदर्भात जिल्हा नियोजनाचा आढावा घेतला आहे. त्यांच्या मते जिल्हा नियोजन फलदायी करण्यात विकास केंद्रे महत्त्वाची भूमिका पार पाडू शकतात. जे.के. पवार यांनी 1995-96 ते

2004-05 या 10 वर्षांच्या काळातील शीर्षनिहाय खर्च आणि त्याचे एकूण खर्चाशी असलेले प्रमाण कोल्हापूर जिल्ह्याच्या संदर्भात अभ्यासले आहे. तालुकानिहाय असंतुलन कमी करण्यात जिल्हा नियोजन समितीला अपेक्षित यश प्राप्त झाले नाही. त्यांनी पर्यटन व्यवसायाला अग्रक्रम देण्याची शिफारस केली.

पा.ना. गावडे यांनी कोल्हापूर जिल्हा नियोजन समितीच्या रचनेचे आणि कार्याचे विवेचन केले. त्यांच्या मते नियत व्यया एवढी रक्कम राज्य सरकारकडून प्राप्त झाली तर जिल्हा नियोजन समितीला योग्य नियोजन करता येईल. श्रीरंग मंडले यांनी आपल्या शोध निबंधात सिंधुदुर्ग जिल्हा नियोजनाच्या क्षेत्रीय खर्चाचे तुलनात्मक विश्लेषण केले. जिल्ह्यात पर्यटन विकासावर भर देण्याची शिफारस त्यांनी केली. स्त्रियांची संख्या पुरूषापेक्षा जास्त आहे ही समस्या त्यांनी दर्शविली आहे. परंतु ही समस्या नसून विकासाचे महत्त्वाचे लक्षण होय. उदय काळे आणि संजय दांदडे यांनी महाराष्ट्रातील जिल्हा नियोजनावर निबंध सादर केला. त्यांनी विदर्भ, मराठवाडा आणि कोकण विभागाचा अनुशेष वाढल्याचे निबंधात प्रतिपादन केले. त्यांच्या मते आर्थिक मर्यादा वाढवून दिल्यास प्रादेशिक असमतोलाचा आणि अनुशेषाचा प्रश्न निर्माण होणार नाही. नितीन जाधव यांनी आपल्या शोध निबंधात जिल्हा नियोजनाचा समतोल विकास या उद्देशावर भर दिला. जिल्हा नियोजनात स्थानिक गरजांचा व अग्रक्रमाचा विचार होत नसल्यामुळे अनेक खेड्यात पिण्याचे पाणी, रस्ते इत्यादी मूलभूत सुविधा उपलब्ध होऊ शकल्या नाहीत.

मोहन चौधरी यांनी आपल्या निबंधात पुणे जिल्हा नियोजन समितीची रचना, उद्दिष्टे आणि कार्ये विशद केली आहेत. त्यांच्या मते पुनर्विनियोजनांतर्गत तरतुदींचे अग्रक्रमाने वाटप करण्याच्या दृष्टीने गाभा क्षेत्र आणि बिगर गाभा क्षेत्र महत्त्वाचे आहे. प्रकाश जाधव यांनी जिल्हा नियोजन समितीमध्ये तालुकानिहाय प्रतिनिधित्वाची शिफारस केली. तसेच महाविद्यालये ग्रामविकासाची केंद्रे बनली पाहिजेत असे सुचविले. बोधले यांनी 2004-05 आणि 2005-06 या दोन वर्षांच्या संदर्भात सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा नियोजनाचा विचार केला. हा जिल्हा दुष्काळी जिल्हा म्हणून ओळखला जात असल्यामुळे पाण्याचे समन्यायी तत्त्वावर वाटप झाले तर जिल्ह्याचा सर्वांगिण विकास होऊ शकेल अशी शिफारस त्यांनी केली.

सुरेखा घारे-रोंगटे यांनी आपल्या शोध निबंधात नाशिक जिल्ह्यातील आदिवासींच्या नियोजनाचा विचार केला. त्यांनी नाशिक जिल्ह्यातील 5 तालुक्यातील आदिवासी कुटुंबांचे विवेचन केले. त्यांच्या मते आदिवासींच्या विकासाकरिता कुपोषण आणि बालमृत्यू थांबले पाहिजेत. अरूण वितोंडे आणि राजेंद्र सरोदे यांनी आपल्या निबंधाने यवतमाळ जिल्ह्यातील गहू उत्पादन व विपणनातील समस्यांचा अभ्यास केला. त्यांनी जिल्हा नियोजन या विषयाशी सांगड घालण्याचा प्रयत्न करावयास हवा होता.

### चर्चेसाठी प्रस्तुत करण्यात आलेले मुद्दे

निबंधावरील चर्चेसाठी खालील विषय सुचविण्यात आले.

1) जिल्हा नियोजन समितीच्या कार्यातील अडचणी
2) जिल्हा नियोजनात स्थानिक गरजांना दिले जाणारे प्राधान्य
3) जिल्ह्यातील उपलब्ध साधनसामग्री आणि उत्पादन रचना
4) जिल्हा नियोजनात आर्थिक मर्यादांची व्याप्ती
5) जिल्हा नियोजनात विकास केंद्रांची भूमिका

6) निधी वाटपाच्या सूत्रात बदल करण्याची आवश्यकता

7) जिल्हा नियोजन यशस्वी करण्यात विविध घटकांचा सहभाग

8) जिल्हा नियोजनात पालक मंत्र्यांचे योगदान

9) जिल्ह्याच्या प्रगतीत विविध क्षेत्रांचा वाटा

10) जिल्ह्याच्या विकासाकरिता महत्त्वाच्या प्रकल्पांची अंमलबजावणी

11) जिल्ह्याच्या विकासात कृषी उत्पादनाचे योगदान

12) वैधानिक विकास मंडळाची प्रादेशिक समतोल साधण्याच्या दृष्टीने कार्यवाही

13) जिल्हा नियोजनात आदिवासी योजनांना दिले जाणारे प्राधान्य

**चर्चेत सहभाग**

या चर्चासत्रात खालील मान्यवरांनी भाग घेतला. श्री. आ. देशपांडे यांनी असे सूचविले की निबंध लेखकांनी विषयाला धरून निबंध सादर करावेत. आपल्या विषयाची मूळ विषयाशी सांगड घालण्याचा प्रयत्न करावा. एच.एम. देसरडा यांनी असा प्रश्न उपस्थित केला की विकास तळापासून करावा की तळापर्यंत करावा. जिल्हा नियोजन समितीला जास्त निधि उपलब्ध करून दिला पाहिजे. र.पु.कुरूलकर यांनी असे प्रतिपादन केले की, निधीची उपलब्धता आणि निधीची आवश्यकता यातील तफावत कमी केली पाहिजे. सर्वोत्तम कुळकर्णी यांनी तातडीच्या गरजांची क्रमवारी लावली पाहिजे तसेच नियोजनात मानव विकासाचाही विचार झाला पाहिजे असे मत मांडले. विनायक देशपांडे यांनी आंतर जिल्हा आर्थिक विषमतेच्या उच्चाटनाला महाराष्ट्रात 5 व्या पंचवार्षिक योजनेत सुरूवात झाली असे सांगून शिलकी निधीचे वाटप करतांना जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न विचारात घेतले जात नाही असे निदर्शनास आणून दिले. शशिकांत गाडगीळ यांनी असे म्हटले की जिल्हा नियोजनाची अंमलबजावणी करणाऱ्यांना वित्त प्रबंधनाची माहिती नसते. राजकोषीय उत्तरदायित्व अधिनियमाचा नियोजनावर परिणाम घडून येतो. आ.गो. पुजारी यांनी असा प्रश्न उपस्थित केला होता की, नियोजन मंडळावर ज्यांची नियुक्ती होते ते अभ्यासपूर्ण पद्धतीने विचाराची मांडणी करीत नाहीत त्यामुळे नियोजन समितीच्या बैठकीत विसंगती आढळते.

**समारोप**

निबंध लेखकांनी जिल्हा नियोजन समितीची रचना, निधीचा क्षेत्रनिहाय विनियोग, जिल्ह्याच्या समस्या वा गरजा इत्यादीचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला. वैधानिक विकास मंडळांनी राज्याचा प्रादेशिक समतोल साधण्यात कोणती भूमिका पार पाडली यावर काही निबंध अपेक्षित होते. राज्य स्तरीय कार्यक्रमांतर्गत जिल्हानिहाय निधी वितरणात काही जिल्ह्यांना झुकते माप दिल्यामुळे प्रादेशिक असमतोल वाढला आहे. प्रत्येक बाबीवरील खर्चाची तरतूद आणि प्रत्यक्ष खर्च यात तफावत आढळते. महाराष्ट्रात जिल्हानियोजन समितीच्या बैठकांना पालक मंत्र्यांची बरेचदा अनुपस्थिती असते त्यामुळे अनेक समस्या निर्माण होतात. निधी वाटपाचे कालबाह्य झालेले सूत्र बदलणे आवश्यक आहे. जिल्ह्याच्या भौगोलिक क्षेत्राचा विचार, निधी वाटप करतांना झाला पाहिजे. जिल्हा नियोजनातील दोष दूर करून जिल्हा नियोजनाची अंमलबजावणी झाली तर समतोल आर्थिक विकास साध्य करता येईल.

◆◆◆

# 'अर्थसंवाद'वार्षिक अहवाल :2004-05

(खंड 28, अंक 1 ते 4)

✦ विनायक श्रीधर देशपांडे, नागपूर.

*प्रमुख संपादक 'अर्थसंवाद' आणि प्रपाठक, पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग,*
*राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.*

सन 2004-05 हे 'अर्थसंवाद' चे अठ्ठाविसावे वर्ष. अर्थसंवादच्या वाटाचालीतील तिसऱ्या दशकातील पहिली आठ वर्षे देखिल पूर्ण होत आहेत. अठ्ठाविसाव्या वर्षातील अर्थसंवादचा 2004-05 या वर्षाचा अहवाल आपणा समोर केवळ औपचारिक गोष्टीची पूर्तता म्हणून नव्हे तर आपल्याशी हितगुज करण्याचे भावनेने सादर करीत आहे. माझ्या संपादकीय कारकिर्दीतील हा तिसरा अहवाल आहे.

एप्रिल 2002 पासून 'अर्थसंवाद' नागपूरहुन प्रथमच प्रकाशित होऊ लागला. मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या या त्रैमासिकाच्या एकंदर जडणघडणीत आंतरबाह्य सदस्यांनी वेळोवेळी केलेल्या सूचना लक्षात घेऊनचबदल करण्यात आले. सदस्यांनी या बदलांचे उस्फुर्तपणे स्वागत केले. 'अर्थसंवाद'च्या अठ्ठाविसाव्या खंडात एकूण 19 स्वतंत्र लेख, 2 भाषणे, 2 चर्चा/संवाद , 1 ग्रंथपरिक्षण, 1 टिपण, 4 सांख्यिकी पुरवणी,6 अधिवेशन अहवाल, 3 विषयांच्या रूपरेषा,3 संकीर्ण(यात 1 श्रद्धांजलीपर लेख आहे) ह्याशिवाय 1 पीएच. डी प्रबंध सारांश असा विविधांगी मजकूर प्रसिद्ध झाला. चारही अंक मिळून लेखांची पृष्ठ संख्या 393 होती. प्रत्येक अंकाची सरासरी पृष्ठ संख्या 98 होती. अंकाच्या पृष्ठ संख्येबाबतचे निर्धारित उद्दिष्ट यावर्षी देखील आपण साध्य करू शकलो ही एक जमेची बाजू आहे. अठ्ठाविसाव्या खंडासाठी एकूण 39 लेखकांचे सहकार्य लाभले.

अहवाल वर्षातील विशेष उल्लेखनिय बाब म्हणजे 'अर्थसंवाद' चा ऑक्टोबर डिसेंबर 2004 हा अंक 'सहकार शतक महोत्सव' विशेषांक म्हणून प्रसिद्ध झाला. एखाद्या विषयाला धरून प्रकाशित झालेल्या या अर्थसंवादच्या अंकाचे वाचकांनी उस्फूर्तपणे स्वागत केले. लेखक मंडळीं कडून असाच उत्तम प्रतिसाद मिळाला तर

विविध विषयांच्या अनुषंगाने अर्थसंवादचे विशेष अंक तयार होऊ शकतील. या बाबत आपण सर्वच गांभिर्याने विचार करून भावी अंकासाठी विषय निश्चित करू या. 2004-2005 हे वर्ष सहकार शतक महोत्सवी वर्ष म्हणून साजरे करण्यात आले. मराठी अर्थशास्त्र परिषदेने देखिल या वर्षाचे अध्यक्ष मधुकर शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राच्या विविध भागात चर्चासत्र/अधिवेशनाचे आयोजन केले होते. या शतक महोत्सवाचाच एक भाग म्हणजे अर्थसंवादचा सहकार शतक महोत्सव विशेषांक होता.

'अर्थसंवाद' चा अंक वाचकांच्या हातात पडायला उशीर होतो ह्याची मला संपूर्ण जाणीव आहे. ह्या बद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो. वितरणात येणाऱ्या अडचणी,खंडीत विद्युत प्रवाह, जाहिरातींसाठी करावी लागणारी प्रतिक्षा ही प्रमुख कारणे 'अर्थसंवाद' वेळेवर न पोहचण्यामागे होती. आपले त्रैमासिक शक्यतोवर त्या त्या तिमाहीच्या काळात सदस्यांना आणि वर्गणीदारांना देण्याच्या प्रयत्नात आम्ही आहोत. हे साधण्यासाठी प्रामुख्याने जाहिराती आणि दर्जेदार लेखन सामग्री वेळेवर प्राप्त होणे आवश्यक आहे.

महाविद्यालयांकडून वार्षिक वर्गणी वेळेवर म्हणजे साधारणपणे मे महिन्या पर्यंत कार्यवाहांकडे पाठविण्यात यावी. वर्षाच्या पहिल्या अंकापासून सर्व अंकांची मागणी वर्षभर येत राहिल्यास अंक पाठविण्याचे काम जिकिरीचे होते. अंकाच्या किती प्रति नेमक्या छापाव्या या बाबतचा अचूक अंदाज करता येत नाही. परिणामी काही अंकाच्या प्रति खूप जास्त तर काही अंकाच्या कमी अशी परिस्थिती निर्माण होते. वार्षिक साधारण सदस्य आणि शैक्षणिक संस्थांसाठी वार्षिक वर्गणी आता 250 रू. आहे. हा बदल होऊन देखिल एक वर्षापेक्षा अधिक काळ लोटला. परंतु अजून देखिल बरीच महाविद्यालये 150 रू. वार्षिक वर्गणी पाठवितात. अर्थसंवादच्या दुसऱ्या पृष्ठावर वर्गणी बाबतचा

**तक्ता**

**अर्थसंवादची महत्त्वपूर्ण तौलनिक माहिती**

| तपशील | 2002-03 | 2003-04 | 2004-05 |
|---|---|---|---|
| 1. चारही अंकांच्या एकूण प्रती | 4,760, | 5,380 | 5,843 |
| 2. चारही अंकांची एकूण पृष्ठे | 408 | 418 | 412 |
| 3. चारही अंकांचा एकूण खर्च (रू.) | 1,52,540 | 1,56,699 | 1,58,142 |
| 4. दर नगाचा सरासरी खर्च (रू.) | 32.05 | 29.13 | 27.06 |
| 5. दर पानाचा सरासरी खर्च (रू.) | 0.31 | 0.28 | .26 |
| 6. जाहिराती पासून उत्पन्न (रू.) | 40,500 | 27,000 | 30,000 |

तपशील प्रत्येक अंकात देण्यात येतो. वाचकांनी/ संबंधितांनी कृपया याची दखल घेऊन वर्गणी कार्यवाहांच्याच पत्त्यावर पाठवावी. वर्गणीची रितसर पावती कार्यवाहांकडून लगेच प्राप्त होवू शकेल.

आता 'अर्थसंवाद' संबंधीचा काही महत्त्वाचा तपशील मी आपणा पुढे ठेवतो. ह्या आधारे अर्थसंवादच्या वाटचाली बाबत एका दृष्टिक्षेपात कल्पना येऊ शकेल.

**अर्थसंवाद - सर्वसाधारण तपशील**

'अर्थसंवाद' च्या सर्वसाधारण तपशीलाकडे आता आपण वळूया. ( त क त ा पहा)

1 अंकाच्या छपाईचा खर्च सातत्याने वाढतो आहे, त्याची प्रमुख कारणे म्हणजे छपाईच्या कामाचे वाढणारे दर आणि टपाल खर्चात झालेली भरमसाठ वाढ. ह्या गोष्टी अपरिहार्य असल्याने स्वीकाराव्या लागणार आहेत.

2 2004-2005 या वर्षात 'अर्थसंवाद' च्या प्रत्येक अंकाच्या सरासरी 1,460 प्रति छापण्यात आल्या. संपूर्ण वर्षात चारही अंकांच्या मिळून एकंदर 5,843 प्रति छापण्यात आल्या. गत वर्षाच्या तुलनेत प्रतिंची संख्या जवळपास 460 ने जास्त आहे. अंकांच्या प्रतिंच्या संख्येत लक्षणीय वाढ होऊन देखिल एकूण खर्चात निव्वळ 1,443 रू. चीच वाढ झाली, ही बाब ध्यानात घ्यावी.

3 अहवाल वर्षातील चार अंक मागील वर्षाप्रमाणेच वेगवेगळ्या आकर्षक रंगसंगतीत छापण्याचा प्रयत्न केला. अर्थसंवादच्या अंतर्बाह्य स्वरूपाची गुणवत्ता कायम राखुन देखील प्रती अंक सरासरी खर्च तसेच प्रती पानाचा सरासरी खर्च गत वर्षाच्या तुलनेत कमी करण्यात यश मिळाले आहे.

4 जाहिराती मिळण्याच्या बाबतीत प्रस्तुत वर्षात फारशी सुधारणा नाही. मात्र गत वर्षीच्या तुलनेत यंदाचे जाहिरातीपासुनचे उत्पन्न 3,000 रूपयाने वाढले. लक्षात घेण्यासारखी बाब म्हणजे अहवाल वर्षात जाहिरातीसाठीची 4 पाने कोरी राहिल्यामुळे आपण सुमारे 14,000 रूपयाचे उत्पन्न आपण प्राप्त करू शकलो नाही. वाढता खर्च लक्षात घेता आपण सर्वांनीच अर्थसंवादची आर्थिक बाजू बळकट करण्याचे दृष्टिने प्रयत्न करण्याची नितांत आवश्यकता आहे.

5 अनेक सदस्यांना त्यांचे पत्ते बदलल्यामुळे अंक पाठविण्याचे बंद करण्यात आले आहे. परंतु अद्याप या मंडळींनी पत्ता बदलल्याची माहिती कळविली नाही. यामुळे देखिल अंकांच्या प्रतिंच्या संख्येचा अंदाज चुकतो.

6 'अर्थसंवाद' ची जबाबदारी पार पाडण्यात मला मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष मधुकर शिंदे, कार्याध्यक्ष ज.फा. पाटील, कार्यवाह सर्जेराव ठोंबरे, सहायक संपादक रवीन्द्र जोशी यांचे सहकार्य लाभले. माझे मित्र किशोर महाबळ (प्रपाठक, राज्यशास्त्र विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ) यांची संपादनाच्या कार्यात मला मोलाची मदत प्राप्त होते. या सर्वांचा मी ऋणी आहे. दर वर्षीप्रमाणे यंदाही भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद , दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांच्याकडून अनुदान मिळाले. टेक्नो एंटरप्रायजेसचे मदन आणि मनिषा पालोरकर, स्पार्क असोसिएट्सचे शैलेष देशपांडे यांनी अंकांची छपाई चांगली करून देण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. अंक वितरणाच्या कामात निलेश धोटे यांनी मोलाची मदत केली.

परिषदेचे आजीव सदस्य किशोर वाघमारे, चारूदत्त गोखले, अर्थसंवादचे सहायक संपादक

रवीन्द्र जोशी, कार्यवाह खजिनदार सर्जेराव ठोंबरे, जितेन्द्र बदानी यांचे जाहिराती मिळविण्यात सहकार्य लाभले. या सर्वांचे, सल्लागार मंडळातील सदस्यांचे, जाहिरातदारांचे आणि लेखकांचे मी मन:पूर्वक आभार मानतो.

'अर्थसंवाद' च्या अनेक सदस्यांनी, वाचकांनी, लेखकांनी समक्ष भेटीत आणि पत्राने अंका बाबत समाधान व्यक्त करून मोलाच्या सूचना वेळोवेळी दिल्या. अर्थसंवाद दर्जेदार होण्याच्या दृष्टिने या मौलिक सूचनांचा नक्कीच उपयोग होईल या बाबत खात्री वाटते. या सर्वांविषयी मी कृतज्ञता व्यक्त करतो.

✦✦✦

## "पद्मजा गंधे पारितोषिक"

डॉ. शशिकांत गंधे, माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद, यांनी त्यांची पत्नी कै. पद्मजा गंधे यांचे स्मरणार्थ 'पद्मजा गंधे पारितोषिक' देण्याकरिता रू. 25,000 ची देणगी मराठी अर्थशास्त्र परिषदेला दिली आहे. कै.पद्मजा गंधे या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या आजीव सदस्य होत्या. त्यांचे निधन 8 एप्रिल 2003 ला झाले. पारितोषिकाच्या संबंधित तपशील खालील प्रमाणे :

1. मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वार्षिक अधिवेशनात महिला सदस्यांनी सादर केलेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधाला पद्मजा गंधे पारितोषिक प्रदान करण्यात येईल. हे पारितोषिक फक्त महिला सदस्यांसाठीच सीमित आहे.

2. पहिले ' पद्मजा गंधे पारितोषिक' श्रीरामपूर येथे होणाऱ्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सन 2006 च्या 30 व्या वार्षिक अधिवेशनात प्रदान करण्यात येईल.

3. पारितोषिकाची रक्कम देणगीतून दरवर्षी मिळणाऱ्या व्याजाच्या रकमेएवढी राहील.

4. एखादे वर्षी पारितोषिकासाठी दर्जेदार शोधनिबंध उपलब्ध नसल्यास त्या वर्षीच्या व्याजाएवढी रक्कम देणगीच्या मूळ रकमेत समाविष्ट करण्यात येईल.

प्रमुख संपादक
**'अर्थसंवाद'**

# कार्यवाहांचा अहवाल
# एकोणतिसावे वार्षिक अधिवेशन

✦ चारूदत्त गोखले, जळगाव.
*कार्यवाह-खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद*

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे 29 वे राष्ट्रीय स्तरावरील वार्षिक अधिवेशन 25,26,27 नोव्हेंबर 2005 या कालावधीत, विद्या प्रतिष्ठानचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, विद्यानगरी, बारामती येथे संपन्न झाले. अधिवेशनाच्या अध्यक्षपदी संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री जि. औरंगाबाद येथील प्राचार्य सर्जेराव ठोंबरे हे होते.

**उद्घाटन**

अधिवेशनाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे वित्त व नियोजन मंत्री जयंतराव पाटील यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षपदी जलसंपदा मंत्री अजितदादा पवार होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य अरूण अडसूळ यांनी केले. यावेळी त्यांनी अल्पकाळात महाविद्यालयाने केलेल्या नेत्रदीपक प्रगतीचा आढावा घेतला.

राज्यात नव्याने गुंतवणूक करण्यास परदेश व परराज्यातील कंपन्या तयार आहेत, त्यांचे आम्ही स्वागत करतो, मात्र विकास प्रक्रियेत मराठी माणूस कोठे होता व आहे याचा अभ्यास मराठी अर्थशास्त्र परिषदेने करावा असे विचार आपल्या अभ्यासपूर्ण उद्घाटनपर भाषणात व्यक्त करून जयंतराव पाटील यांनी महाराष्ट्र राज्याच्या गेल्या 10 वर्षातील आर्थिक विकासाचा आढावा घेतला.

उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षीय भाषणात जलसंपदा मंत्री व विद्या प्रतिष्ठानचे विश्वस्त अजितदादा पवार यांनी या परिषदेत होणाऱ्या चर्चेची व राज्याच्या अर्थसंकल्पाच्या दृष्टीने महत्त्वाच्या मुद्यांची माहिती शासनाकडे पाठवावी असे सूचविले तसेच परिषदेला पुण्यात कायमस्वरूपी वास्तू विकत घेण्यासाठी सर्वतोपरी मदत केली

जाईल असे भरघोस आश्वासन दिले.

ग्रामीण विकास या विषयावर सर्जेराव ठोंबरे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात असे मत व्यक्त केले की, भारताला नैसर्गिक संपदा व मनुष्यबळ या दोहोंच्याबाबत तुलनात्मक अनुकुलता आहे. आवश्यकता आहे ती उपलब्ध असलेल्या तंत्रज्ञानाच्या आधारे मनुष्यबळाची क्षमता वाढवून प्रत्यक्ष नैसर्गिक संपदेचे देशव्यापी प्रवाही व समन्वयीत कृषी व इतर जैविक उत्पादन प्रक्रियेस सहाय्यकारी होणारे जाळे निर्माण करण्याची.

परिषदेच्या 28 व्या अधिवेशनाचे अध्यक्ष मधुकर शिंदे, कार्याध्यक्ष ज.फा. पाटील, कार्यवाह-खजिनदार चारूदत्त गोखले यांनीही आपली मते याप्रसंगी व्यक्त केली. स्थानिक कार्यवाह मनिषा काकडे यांनी आभार मानले.

तीन दिवसाच्या कालावधीत एकूण 4 चर्चासत्रे पार पडली. यापैकी सामाजिक आर्थिक निवडीचे सिद्धांतन या चर्चासत्राचे सूत्रसंचालन माधव दातार, पुणे यांनी केले. भारतातील घटक राज्यांची ऋणग्रस्तता या विषयावरील चर्चासत्राचे सूत्र संचालन बी.एस.म्हस्के, औरंगाबाद यांनी केले तर महाराष्ट्रातील जिल्हा नियोजन या विषयावरील चर्चासत्राचे सूत्रसंचालन रामदास माहोरे, नागपूर यांनी केले. आयत्या वेळचा विषय म्हणून जैव तंत्रज्ञानाचे आर्थिक सामाजिक परिणाम या विषयावर अरूण अडसूळ यांचे अत्यंत अभ्यासपूर्ण बीजभाषण झाले.

26 नोव्हेंबर 2005 रोजी संध्याकाळी परिषदेची सर्वसाधारण सभा संपन्न झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी परिषदेचे अध्यक्ष सर्जेराव ठोंबरे हे होते. सभेतील काही महत्त्वाचे निर्णय पुढीलप्रमाणे

1. 2006-07 या वर्षातील परिषदेच्या तिसाव्या वार्षिक अधिवेशनासाठी रयत शिक्षण संस्थेचे रा.ब.ना. बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर जि. अहमदनगर यांचे निमंत्रण एकमताने स्वीकारण्यात आले.

2. तिसाव्या अधिवेशनासाठी पुढील तीन विषय निश्चित करण्यात आले.

अ. भारतातील आर्थिक विचारांचा विकास

ब. भारतातील स्वयंसहायता गट - पार्श्वभूमी व वाटचाल

क. महाराष्ट्रातील आदिवासी भागातील कुपोषण-समस्या व उपाय

3. श्रीरामपूर येथे होणाऱ्या तिसाव्या अधिवेशनाचे अध्यक्ष दिलीप सयाजीराव कदम, हडपसर, पुणे यांची बहुमताने निवड झाली.

4. 2006 ते 2009 या कालावधीसाठी कार्याध्यक्ष म्हणून ज.फा. पाटील, कोल्हापूर यांची बहुमताने लागोपाठ दुसऱ्यांदा निवड झाली.

5. 2006 ते 2009 या कालावधीसाठी विश्वस्त म्हणून अरूण अडसूळ, बारामती यांची एकमताने निवड झाली.

6. 2006 ते 2009 या कालावधीसाठी कार्यकारी मंडळावर (1) कृष्णराव पाटील, नागपूर (2) सुभाष टकले, हिंगोली (3) माधव गायकवाड औरंगाबाद या तिघांची बिनविरोध निवड करण्यात आली.

7. पुणे येथे वास्तू विकत घेण्यासाठी प्रत्येक सभासदाने 31 मार्च 2006 पूर्वी किमान 1 हजार रूपये द्यावेत व माजी अध्यक्ष, कार्याध्यक्ष व कार्यवाह यांनी किमान 5 हजार रू. द्यावेत असा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.

**पारितोषिके**

1. अधिवेशनात सादर केलेल्या उत्कृष्ट शोधनिबंधासाठी देण्यात येणारे ग.प्र. पिंपरकर

पारितोषिक व के.एच. ठक्कर ऋणमुक्ती प्रतिष्ठानचे अमर्त्य सेन पारितोषिक महाराष्ट्रातील वाढता ऋणभार या प्राचार्य एम.पी. खंदारे व प्रा. माधव गायकवाड यांनी संयुक्तपणे लिहिलेल्या लेखाला व सामाजिक निवड संदर्भात एक वेचक साहित्य सर्वेक्षण या संतोष बबनराव यादव यांनी लिहिलेल्या लेखांना विभागून देण्यात आले.

2. अर्थसंवादमधील 2004-2005 या वर्षातील उत्कृष्ट लेखाबद्दलचे मो. स. भावे पारितोषिक शरद शंकर जोशी, पुणे यांच्या अशक्य(दर)त्रयी -व्यवस्थापनाचा वस्तूपाठ या लेखाला देण्यात आले.

3. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने दिले जाणारे उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पारितोषिक विनायक गोविलकर, नाशिक यांच्या विश्व व्यापार संघटनेची मंत्री परिषद, जिनिव्हा ते कॅनकून आणि पुढे या ग्रंथाला देण्यात आले.

**अधिवेशनाचा समारोप**

अधिवेशनाचा समारोप 27 नोव्हेंबर 2005 रोजी दुपारी झाला. समारोपाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पुणे विद्यापीठाचे वित्त व लेखा अधिकारी एम.एस. जाधव तर प्रमुख अतिथी म्हणून भारतीय रिझर्व्ह बँकेचे सहायक सल्लागार आणि अर्थसंवाद या त्रैमासिकाच्या सल्लागार मंडळाचे सदस्य आशुतोष रारावीकर हजर होते. दोघांनीही अत्यंत प्रभावी भाषेत श्रोत्यांना संबोधित केले. परिषदेच्या वतीने अधिवेशनाच्या यशस्वी संयोजनासाठी प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व उपस्थितांचे परिषदेचे अध्यक्ष सर्जेराव ठोंबरे यांनी आभार मानले. शेवटी परिषदेच्या वतीने कार्यवाह चारूदत्त गोखले तर आयोजकांच्या वतीने स्थानिक कार्यवाह मनिषा काकडे यांनी आभार मानल्यानंतर अधिवेशनाची सांगता झाली.

✦✦✦

## मराठी अर्थशास्त्र परिषद

## वार्षिक वर्गणीची मुदत संपली असल्यास

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे वार्षिक सदस्य आणि अर्थसंवाद चे वार्षिक वर्गणीदार यांना आम्ही आठवण करून देऊ इच्छितो की, अर्थसंवादच्या जानेवारी-मार्च 2006 या अंकाबरोबर ज्यांची वार्षिक वर्गणीची मुदत संपली आहे त्यांनी 1 एप्रिल 2006 ते 31 मार्च 2007 या वर्षासाठी आपल्या सदस्यत्वाचे आणि अर्थसंवादच्या वर्गणीदाराचे नूतनीकरण करून घ्यावे . ही वर्गणी कार्यवाह-खजिनदार चारूदत्त गोखले, जळगाव यांच्या पत्त्यावर पाठवावी.

**चारुदत्त गोखले**

कार्यवाह-खजिनदार

# मराठी अर्थशास्त्र परिषद
# तिसावे वार्षिक अधिवेशन

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे तिसावे वार्षिक अधिवेशन 2006 मध्ये रयत शिक्षण संस्थेचे रा.ब्.ना. बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर जि. अहमदनगर येथे आयोजित होणार आहे. दिलीप सयाजीराव कदम हे अध्यक्षस्थान भूषवितील. अधिवेशनातील चर्चासत्रांसाठी खालील विषय निश्चित करण्यात आले आहेत.

1) भारतातील आर्थिक विचारांचा विकास

2) भारतातील स्वयंसहायता गट - पार्श्वभूमी व वाटचाल

3) महाराष्ट्रातील आदिवासी भागातील कुपोषण - समस्या व उपाय

या विषयांची रूपरेषा 'अर्थसंवाद' च्या याच अंकात देण्यात आली आहे. चौथा विषय तत्कालिन परिस्थितीशी संबंधित असेल आणि तो परिषदेचे अध्यक्ष यथावकाश जाहीर करतील. त्या विषयावर निबंध मागविले जात नाही.

निबंध लेखकांनी जास्तीत जास्त 2,000 शब्दात विषय मांडावयाचा असून निबंधासोबत 300 शब्दात त्याचा गोषवारा सादर करणे अनिवार्य आहे. निबंधाच्या दोन प्रती आणि सोबत गोषवारा सादर करणे जरूरीचे आहे. निबंधाच्या दोन प्रती आणि सोबत गोषवारा पाठविल्याखेरीज त्याविषयीचा निर्णय अध्यक्षांकडून पाठविला जाणार नाही.

निबंध मराठीत असावेत. ते पूर्वी कोठेही सादर केलेले वा प्रसिद्ध केलेले नसावेत. लेखकांनी आपले संपूर्ण नाव व पत्ता, महाविद्यालयाचे /विद्यापीठाचे/शैक्षणिक व अन्य संस्थांचे नाव, पत्ता हा सर्व तपशील मराठीतच देणे आवश्यक आहे.

प्रत्येक निबंध लेखकाचा केवळ एकच निबंध (स्वतंत्र वा संयुक्तपणे लिहिलेला) अधिवेशनासाठी स्वीकारला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

31 ऑगस्ट,2006 ही निबंध स्वीकारण्याची अंतिम तारीख असून त्यांनतर पाठविलेले निबंध स्वीकारले जाणार नाहीत. निबंध लेखकांनी आपले निबंध पुढील पत्त्यावर पाठवावेत :

दिलीप सयाजीराव कदम
अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद
अमरनगरी, बी-12 कॅनरा बँकेच्या मागे,
हडपसर पुणे -411028

**चारूदत्त गोखले**
कार्यवाह-खजिनदार

## निबंध लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

(1) चर्चासत्रासाठी विषयाचे जे शिर्षक जाहीर केलेले असते तेच आपल्याही निबंधाला द्रेणे आवश्यक नाही. त्याच्या अंतर्गत एखादा उप-विषय निवडून त्या अनुषंगाने योग्य असे शीर्षक आपणास देता येईल.

(2) सामान्यपणे विषयाचा ऐतिहासिक आढावा घेण्यासाठी पूर्ण निबंधाचा उपयोग करू नये. त्यात अनेक वादग्रस्त मुद्यांचे विश्लेषण असल्यास आणि त्यातून नवीन अर्थ लावण्याचा प्रयत्न करणार असल्यासच विस्तृत आढावा घ्यावा.

(3) जी माहिती एम.ए. पर्यंतच्या पाठ्यपुस्तकांमध्ये उपलब्ध असते तिचा संदर्भ म्हणून उपयोग करावा. परंतु त्या पातळीचे विश्लेषण निबंधात असू नये; कारण ते सर्वांना माहित असते. माहितीतील सांख्यिकी संबंध शोधून त्यापलीकडे जाऊन विश्लेषणाचा प्रयत्न करणे योग्य राहिल.

(4) समाजाच्या आर्थिक जीवनाचा (राष्ट्रीय/प्रादेशिक आणि आवश्यकतेनुसार स्थानिक) सामाजिक-सांस्कृतिक जीवनाशी येणारा संबंध, त्यात होणारे बदल आणि शासनाचे आर्थिक धोरण यावर निबंधात त्या त्या विषयाच्या अनुषंगाने भर असावा.

(5) निबंधात वेगवेगळ्या भागांमध्ये जे संबंध आपण दर्शवितो आणि निष्कर्ष प्रस्थापित करतो त्यांच्यात अंतर्गत सुसंगती साधण्याचा प्रयत्न केला जावा.

(6) निबंधात शक्य तो महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या 'अर्थशास्त्र परिभाषा कोश', आणि 'शासन व्यवहार कोश' यातील परिभाषेचा उपयोग करावा.त्यातील शब्दांचा अर्थ पटत नसल्यास इतर शब्दांचा उपयोग करावा. महत्त्वाच्या मराठी संज्ञांचे मूळ इंग्रजी शब्द कंसात द्यावेत.

(7) निबंधातील आकडेवारी संदर्भ सूचक, सुस्पष्ट, परिपूर्ण आणि मान्य पद्धतीनुसार असणे आवश्यक आहे.

(8) निबंधाची माहिती केवळ सांख्यिकी माहितीचे संकलन करून वर्णन करणारी न ठेवता संशोधनात्मक पद्धतीची असावी. त्यामुळे निबंधाची पातळी उंचावेल. निबंध इतर भाषेतून केवळ भाषांतरित नसावे.

(9) निबंधाच्या शेवटी संदर्भ टीपा/संदर्भ सूची प्रमाणित पद्धतीने असावी.

(10) निबंधाच्या अखेरीस गोषवारा द्यावा (300 शब्द)

## निबंध लेखकांच्या मार्गदर्शनासाठी विषयांची रूपरेषा

# 1. भारतातील आर्थिक विचारांचा विकास

✦ निरज हातेकर, मुंबई.

*प्रपाठक, अर्थशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई*

*(अनुवाद : विनायक देशपांडे नागपूर. प्रमुख संपादक 'अर्थसंवाद')*

1. भारतातील आर्थिक विचारांच्या विकासाचा मागोवा घेताना कौटिलिय अर्थशास्त्रापासून सुरूवात करण्याची सर्वसाधारण प्रवृत्ती असते. परंतु भारतातील आर्थिक विचारांच्या पद्धतशीर मांडणीला खऱ्या अर्थाने 19 व्या शतकापासून आरंभ झाला. धोरणांबाबतचे नियम आणि आर्थिक तत्त्वांची सैद्धांतिकमांडणी या दोन भिन्न बाबी आहेत. धोरणासंबंधिच्या नियमांना अर्थपूर्णता प्राप्त करून देण्यात कौटिल्याचे योगदान तर महत्त्वपूर्ण होतेच परंतु रामचंद्रपंत अमात्य यांच्या 'आज्ञापत्रांसारख्या दस्तऐवजांमध्ये देखील आर्थिक तत्त्वांची मांडणी केल्याचे आढळून येते'.आर्थिक धोरणासंबंधिची नियमावली आणि सैद्धांतिकीकरण या दोहोतील फरक लेखकांनी या विषयावर लेखन करतांना सातत्याने ध्यानात ठेवणे आवश्यक आहे.

2. भारतीय आर्थिक तत्त्ववेत्त्यांबाबत चर्चा करताना साधारणत: (अ) दादाभाई नौरोजी (आ) महादेव गोविंद रानडे (इ) आर.सी.दत्त (ई) महात्मा गांधी (उ) गोपालकृष्ण गोखले (ऊ) पि.सी. महालनोबिस (ऋ) ए.के.सेन (ए) बाबासाहेब आंबेडकर (ऐ) एस. चक्रवर्ती (ओ) व्ही.के.आर.व्ही.राव या लेखकांच्या लिखाणाचे विश्लेषण करण्यात येते. परंतु या व्यतिरिक्त इतर बरीच नावे आहेत ज्यांची सामान्यत: चर्चा होत नाही, या क्षेत्रातील त्यांचे योगदान देखील महत्त्वपूर्ण आहे. उदाहरणार्थ (1) जे.के.मेहता (2) बि. आर. शेनॉय (3) ब्रिज नारायण (4) व्ही.जी.काळे, ही काही नावे सांगता येतील. 1800 शतकाच्या मध्य काळात स्टुडंट्स सायंटिफीक आणि लिटररी सोसायटी या नियतकालीकात काही उत्कृष्ट लेख या संदर्भात प्रकाशित झाले आहेत. या व्यतिरिक्त 1914 साली

प्रकाशित झालेल्या दत्त समिती अहवालासारखे इतर काही शासकीय अहवाल देखील मुद्रा स्फिती सारखे विषय समजावून घेण्याचे दृष्टिने महत्त्वपूर्ण ठरू शकतील. खूप नावाजलेल्या लेखकांच्या योगदानावर संपूर्णपणे लक्ष केंद्रित न करता तुलनात्मक दृष्ट्या जे लेखक प्रसिद्धीच्या झोतात नाहीत परंतु ते सातत्याने चित्तवेधक विचार मांडीत आले आहेत अशा लेखकांचा विचार होणे आवश्यक आहे. अगदीच परिचित नसलेल्या योगदानाला प्रकट करण्याचे काम या माध्यमाने साध्य होऊ शकेल. ग्रंथालयातील जुन्या साहित्याचा शोध,वर्तमानपत्रे, मासिके या माध्यमाने असे अनेक लेखक सामोरे आणता येतील. उदाहरणार्थ 1920 च्या सुमारास मराठामध्ये विद्वांस नावाच्या विचारवंताने कृषी आणि पतपुरवठा या विषयावर विपुल लेखन केले आहे. याच वर्तमानपत्रात आर्थिक घडामोडीबाबत अनेक निबंध आढळतात. ग्रामीण पतपुरवठ्यासंबंधी विलियम वेड्डरबर्न सारख्यांनी केलेले योगदान देखील जवळपास अज्ञात राहीले आहे. निबंधलेखनाचे विषय, उदाहरणार्थ ब्रिज नारायण यांच्या आर्थिक विचारांचे सर्वेक्षण किंवा भारतातील ग्रामीण पतपुरवठा अशा प्रकारे असू शकतील. या विषयांतर्गत लेखाचे पद्धतशीरपणे वेगवेगळे भाग करावे. उदाहरणार्थ ब्रिज नारायण यांच्या योगदानाचे सर्वेक्षण असा लेखाचा विषय असल्यास त्याचे पोटविभाग खालील प्रमाणे करता येतील. (अ) थोडक्यात जीवनचरित्रविषयक रेखाकृती (ब) ब्रिज नारायण यांचे भारताच्या दारिद्र्यावरील विचार (क) भारताच्या राजकोषाबाबत ब्रिज नारायण यांचे विचार (ड) विनिमय दर धोरणाबाबत ब्रिज नारायण यांचे विचार (इ) समारोप (फ) परिशिष्टे यात ब्रिज नारायण यांनी लिहिलेल्या विविध लेखांची/ग्रंथांची यादी देता येईल. ब्रिज नारायण हे भारतातील सुरूवातीचे अर्थमिती तज्ज्ञ (Econometrician) होते. त्यामुळे इतरांपेक्षा त्यांचे कार्य भिन्न स्वरूपाचे होते.

3. भारतीय आर्थिक विचारांचा मागोवा घेताना त्यांची निव्वळ स्तुती न करता चिकित्सक संतुलित मूल्यांकन करण्याचा प्रयत्न लेखकांनी करावा. बहुतांश आर्थिक विचारवंतानी तेंव्हाची परिस्थिती लक्षात घेऊन विचारांची मांडणी केली होती. लेखकांनी ही बाब देखील ध्यानात ठेवण्याची गरज आहे. बऱ्याच महत्त्वाच्या तत्त्वांचा शोध भारतीय आर्थिक विचारवंतांनीच लावला असे विधान करण्याचा देखील मोह बरेचदा या विषयाच्या अभ्यासकांना होतो. परंतु अशा प्रकारचा दावा अत्यंत काळजीपूर्वक करावा. यातील बरेच भारतीय आर्थिक विचारवंत अर्थशास्त्राच्या संबंधीत विचार ते मांडीत आहेत असा दावा देखील करीत नव्हते. राजकीय आणि सामाजिक प्रश्नांचे विश्लेषण करताना अर्थशास्त्राचा आश्रय घेणे त्यांना सोयीचे होत असे. त्यामुळे या लेखकांच्या योगदानाचे मूल्यांकन करताना काळजी घेणे आवश्यक आहे. खरे तर, या सर्व लेखकांनी मांडलेले अर्थशास्त्र आणि त्यांनी त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक कार्यक्रमांशी जोडलेला आर्थिक तत्त्वांचा संबंध जाणून घेण्याचे दृष्टिने लेख लिहिणे आवश्यक आहे. परंतु हे करताना या आर्थिक विचारवंतांच्या सामाजिक आणि राजकीय उद्दिष्टांचे उदात्तीकरण (Glorification) न करता अधिक वस्तुनिष्ठपणे त्यांच्या कार्याचे विश्लेषण व्हावे. उदाहरणार्थ, महादेव गोविंद

रानडे यांच्या आर्थिक विचारांची पद्धतशीरपणे चर्चा करून मवाळ सुधारक म्हणून त्यांनी घेतलेल्या भूमिकेशी संबंध जोडता येईल. भारतासाठी सार्वभौमत्व दर्जा प्राप्त व्हावा या दृष्टिने रानडे इतर जहाल नेत्यांच्या संपूर्ण स्वातंत्र्याच्या मागणीपेक्षा वेगळा विचार मांडीत होते. त्या विचारांचा मागोवा आर्थिक दृष्टिकोन ध्यानात ठेऊन देखील लेखकांना घेता येईल. भारतीय समाजाबाबत साकल्याने विचार करताना महात्मा फुले यांनी 'शेतकऱ्याचा आसूड' या संबंधात मांडलेले प्रश्न देखील सामाजिक सुधारणेचा विचार करतांना उपयुक्त ठरू शकतील. परंतु महात्मा फुले यांचे अर्थशास्त्र वेगळेपणाने चर्चेला घेतल्यास ते तितकेसे उद्‌बोधक ठरणार नाहीत.

4. रॉउट्लडज या संस्थेने प्रकाशित केलेले ए.के. दासगुप्ता लिखित 'इंडियन इकॉनॉमिक थॉट' हा ग्रंथ या विषयाच्या संदर्भात एक उत्तम पथ दर्शक ठरू शकतो. डी.एन. नाचणे यांनी संपादीत केलेला आणि हिमालय पब्लिकेशन्स ने नुकताच प्रकाशित केलेला Founding Fathers of Indian Political Economy' हा ग्रंथ देखील निबंध लेखकांना उपयुक्त ठरू शकेल.

5. या संदर्भातील एक दूसरे दुर्लक्षित राहीलेले क्षेत्र म्हणजे भारत शासनाने प्रकाशित केलेले अहवाल. आर्थिक समस्यांबाबतचा शासकीय स्तरावर झालेल्या विचारांचा आढावा या अहवालाद्वारे घेता येऊ शकेल. उदाहरणार्थ दुष्काळ आयोग अहवाल प्रस्थापित मतांमध्ये परिवर्तन आणण्याचे दृष्टिने महत्त्वपूर्ण ठरला. असे काही महत्त्वाचे अहवाल जे दुर्लक्षित राहीले आहेत, ते उपयोगात आणून त्या अहवालांची चर्चा देखील लेखकांना करता येईल. त्यांचे महत्त्वाचे निष्कर्ष, विश्लेषणाची पद्धत आणि आर्थिक विचारांवर झालेला परिणाम या बाबी देखील बघता येऊ शकतील.

साधारणपणे निबंध लेखकांनी खालील पैलूंवर अधिक लक्ष केंद्रित करावे.

अ) प्रसिद्धिस न आलेले लिखाण सामोरे आणण्याचा निबंध लेखकांचा प्रयत्न असावा. (निव्वळ एक लेख ज्यात महत्त्वाचे चिकित्सक मौलिक विचार आढळतात त्याचा देखील आढावा निबंध लेखकांना घेता येईल)

ब) जे लेखक सुप्रसिद्ध आहेत त्यांच्या संपूर्ण लिखाणाबाबत चर्चा करता येईल, भारतीय समाजाबाबतचा त्यांचा दृष्टिकोन आणि त्या संदर्भात त्यांनी बसविलेले अर्थशास्त्र यावर देखील भर देता येऊ शकेल.

क) निबंध लेखकांनी टीकाविरहित गुणगाण करणे टाळावे आणि भारतीय आर्थिक विचारवंतांच्या विचारांचा संतुलित टीकात्मक आढावा घ्यावा.

### संदर्भसूची

1. अमत्या रामचंद्र पंत, 'आज्ञापत्र' ए.आर. कुळकर्णी संपादीत ग्रंथ पुणे 2004

2. आगरकर गोपाळ गणेश, संपूर्ण आगरकर, खंड 1, वराड प्रकाशन पुणे 1994 पृष्ठ 419-20, 83-87.

3. केळकर (संपादीत) लोकमान्य टिळकांचे केसरीतील लेख खंड 1, केसरी मराठा संस्था, पुणे 1992 पृष्ठ 128-33, 102, 182-91.

4. देशव्यवहार व्यवस्था या शास्त्राची मूलमत्त्वे - हरि केशवजी आणि व्ही.एन.

मंडलीक, गणपत कृष्णाजी यांची प्रेस मुंबई 1854 डी के बेडकर यांनी संपादीत केलेल्या ग्रंथात पुनर्मुद्रित चार जुने मराठी अर्थशास्त्रीय ग्रंथ गोखले इन्स्टिट्यूट आफ पॉलिटिक्स पुणे 1969.

5. लक्ष्मीज्ञान - लोकहितवादी गोपाळ हरि देशमुख ज्ञानप्रकाश प्रेस 1849 पुणे डी. के. बेडेकर संपादीत ग्रंथात पुनर्मुद्रित चार जुने मराठी अर्थशास्त्रीय ग्रंथ गोखले इन्स्टिट्यूट ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिक्स, पुणे 1969.

6. लोहिया राम मनोहर, अर्थशास्त्र: मार्क्स के आगे लोकभारती प्रकाशन अलाहाबाद 1994 पृ. 9.

7. हिंदूस्थानची प्राचीन व सांप्रतची स्थिती व पुढे काय त्याचा परिणाम होणार ? या विषयी विचार, रामकृष्ण विश्वनाथ प्रभाकर प्रेस मुंबई 1843, पुनर्मुद्रित चार जुने मराठी अर्थशास्त्रीय ग्रंथ, संपादक डी.के.बेडेकर गोखले इंस्टिट्यूट ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिक्स पुणे 1969.

8. Chandra, Bipan, 'Indian Nationalists and the Drain 1880-1905', Indian Economic and Social History Review, Vol 2, No 2, April 1965, pp 87-144

9. Chandra, Bipan, 'Indian's Struggle for Independence, Penguin Books, New Delhi, 1999, pp 96-98. Bipan Chandra (eds), Economic Writings of Mahadev Govind Ranade, Gyan Publishing House, New Delhi, 1990

10. Dasgupta, History of Indian Economic Thought, Routledge and Kagan Paul, London 1991. Gokhale GK, 'Welby Commission Evidence'(written) in R P Patwardhan and D V Ambekar (eds), Speeches and Writings of Gopal Krishna Gokhale (Economic), Vol I, Asia Publishing House, Mumbai, 1962, pp 456-509.

11. For a review of J K Mehta's work, see N Hatekar, 'J K Mehta : The Philosopher Theorist' in N Modi (ed) Parisis of Western India, Mumbai, 2001.

12. Ganguly,B.N.'Dadabhai Naoroji and the Mechanism of External Drain', Indian Economic and Social History Review, Vol 2, No 2, April; 1965, pp 86-102

13. Kale V.G., Introduction to a Study of Indian Economics, Fourth edition, Abhudaya Press, Poona, 1992, p4. Rev Killogg James,'Ranade and After, Journal of Indian Economics, 1942.

14. Narain Brij "Indian Economic problems : Past and Present", Sultan Chand and Company 1982 (this is a reprint of a 1929 book).

15. Parvate T V, Tilak : The Economist, Maharashtra State Board of Literature and Culture, Bombay, 1985.

16. Wedderburn W. Writings and Speeches of Sir. William Wedderburn, Natesan and Company , Madras 1919.

◆◆◆

# 2. भारतातील स्वयंसहायता गट : पार्श्वभूमी व वाटचाल

✦ मेधा देशपांडे, पुणे.
*प्रपाठक, ना.दा.ठा. महिला विद्यापीठ, पुणे.परिसर*

स्वयंसहायता गटाच्या माध्यमाने, व्यापारी, ग्रामीण विकास आणि सहकारी बँका या वित्तीय संस्थांचा संबंध सामान्य नागरिकांशी सहजपणे जोडता आला. समाजाच्या खालच्या स्तरापर्यंत वित्तीय व्यवहार आता या गटांमार्फत होऊ लागले. स्वयंसहायता गटाच्या माध्यमाने बचतीला प्रोत्साहन मिळून या बचतीचा उपयोग, उत्पादक कार्यासाठी कर्जवाटपाच्या सहाय्याने होऊ लागला. बचत आणि अंतर्गत कर्ज वाटप या दोहोत समन्वय प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने 10-20 गरीब लोक एकत्रित येऊन स्वत:च्या मालकीच्या अनौपचारिक वित्तीयसंस्था, स्वयंसहायता गटाच्या स्वरूपात स्थापन करू शकतात. भारतातील व्यष्टीय वित्त यंत्रणेची पार्श्वभूमी व वाटचाल यांचा परामर्श घेतांना विषयाला योग्य दिशा देण्यासाठी वित्तीय यंत्रणेची सैद्धान्तिक व अनुभवाधिष्ठित पार्श्वभूमी मांडणे आवश्यक आहे. या टिपणाच्या सुरूवातीला यापैकी काही महत्त्वाच्या पैलूंची चर्चा करून, निबंध लिहितांना लक्षात घ्यावयाचे मुद्दे मांडलेले आहेत.

**व्यष्टीय वित्त व्यवस्था : पार्श्वभूमी**

अलीकडल्या काळात, विशेषत: नव उदारमतवादी आर्थिक धोरणे, लॅटिन अमेरिका, आफ्रिका आणि आशियाई देशात राबविण्यास सुरूवात झाल्यानंतर विकासाचे अर्थशास्त्र या विषयाच्या अभ्यासकांच्या आणि विकास कार्यक्रमांची अंमलबजावणी करणाऱ्यांच्या दृष्टिकोनातून व्यष्टीय वित्त व्यवस्था (Micro Financing) मानवी विकासाचे आश्वासक साधन ठरले आहे. व्यष्टीय वित्त व्यवस्थेत दारिद्र्यरेषेखालील लोकांना वित्तीय सेवा उत्पादक कार्यासाठी उपलब्ध

करण्यात येऊन जीवनमान उंचावण्यास सहाय्य करण्यात येते. व्यष्टीय वित्त व्यवस्था आणि आर्थिक विकास या दोहोतील परस्पर संबंध खालील गृहितांवर आधारित आहेत.

1. वित्तीय सेवांचा विस्तार (widening) आणि घनीकरण (deepening) हे आर्थिक विकासाचे घटक आहेत.

2. आर्थिक विकास म्हणजे केवळ उत्पादनातील वृद्धी नसून 'मानवी विकास देखील साध्य होणे आवश्यक आहे'. व्यक्तींमधील क्षमतांचा विकास करून त्यांना योग्य त्या संधी उपलब्ध करण्यात येऊन त्यांचे जीवनमान उंचावणे हे विकासाचे साध्य आहे.

3. गरिबांना विकासाच्या प्रमुख प्रवाहात आणल्याशिवाय खऱ्या अर्थाने विकास साध्य होणार नाही. आवश्यकतेनुसार वित्तसेवांचा पुरवठा त्यांच्यापर्यंत पोचविण्यासाठी संस्थात्मक चौकटीच्या मर्यादा लक्षात घेऊन (जास्त व्यवहार खर्च इ.) लवचिक, संवेदनाक्षम आणि संविदिष्णु अशा वित्तीय यंत्रणेची आवश्यकता आहे. बचत करण्याच्या आणि कर्ज घेण्याच्या उद्देशाने एकत्र आलेल्या समान परिस्थितीतील शेजाऱ्यांच्या गटांच्या आधारे निर्माण झालेली व्यष्टीय वित्त यंत्रणा ही मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी योग्य साधन ठरेल. गरिबांच्या वित्तीय गरजा कार्यक्षमरितीने पूर्ण करणारे स्वयंसहायता गट आणि संस्थात्मक वित्त यंत्रणेची प्रशासकीय क्षमता आणि संसाधने यांचा मेळ घातल्यास व्यष्टीय वित्त यंत्रणा अधिक व्यावहारिक ठरू शकेल. अशा प्रकारच्या वित्तीय यंत्रणेत व्यक्तीऐवजी गट कर्जदार (barrower) असल्यामुळे औपचारिक वित्तिय संस्थांच्या मार्फत दारिद्र्यनिर्मूलनासाठी गरिबांना कर्जपुरवठा करतांना या संस्थांच्या चौकटीत अंतर्निष्ठ असणाऱ्या अनिवार्य समस्यांचे (उदाहरणार्थ कर्जदाराची अयोग्य निवड, त्यामुळे कर्जपरतफेडीचे अल्प प्रमाण, जास्त व्यवहार खर्च)निराकरण करणे शक्य होते.

व्यष्टीय वित्त यंत्रणेत मानवी विकास साध्य करण्याचे साधन म्हणून 1990 च्या दशकात नव उदारमतवादी आर्थिक धोरणांच्या गरिबांवरील संभाव्य प्रतिकूल परिणामांची तीव्रता कमी करणाच्या दृष्टिकोनातून या यंत्रणेचा जागतिक पातळीवरील संस्थांनी पुरस्कार केला. या संस्थांनी दिलेल्या वित्तिय सहाय्याच्या पाठिंब्याने विकसनशील देशात जणूकाही व्यष्टीय वित्त चळवळच निर्माण झाली. आशियाई व इतर विकसनशील देशातील, संस्थात्मक वित्तसहाय्यापर्यंत पोहचू न शकणाऱ्या लोकांनी/लोकांसाठी स्वतःच्या/त्यांच्या वित्तीयसेवेच्या गरजांच्या पूर्तीसाठी निर्माण केलेल्या अनौपचारिक पद्धतीतून व्यष्टीय वित्त प्रतिमाने निर्माण झाली. उदाहरणार्थ बांगला देशात ग्रामीण बँक, तर भारतात स्वयंसहाय्यता गट आणि बँक यातील संबंध प्रस्थापित करणारी ही प्रतिमाने रूजली. भारतात सामाजिक आणि आर्थिक उन्नतीसाठी ग्रामीण भागात सक्रिय असणाऱ्या म्हैसूर पुनर्निवारण आणि विकास एजन्सी (MYRADA) सारख्या स्वयंसेवी संस्थांनी बचतकर्ज या मुद्यावर स्वयंसहाय्यता गटांची केलेली बांधणी आणि त्यांची यशस्वी कार्यरीती हा नाबार्ड प्रणित स्वयंसहाय्यता गट बँक जोडणी या व्यष्टीय वित्त प्रकल्पाचा आधार ठरला.

## भारतातील व्यष्टीय वित्त यंत्रणा

भारतात धोरणकर्त्यांनी विकास प्रक्रियेतील वित्तसेवांची भूमिका, उत्पादन-उत्पादकता वृद्धी व दारिद्र्यनिर्मूलन ही उद्दिष्टे नजरेसमोर ठेवून वित्तिय धोरणे आखली. यासाठी योग्य वेळी पुरेशा प्रमाणात वित्तपुरवठा सर्वदूर, विशेषत: ग्रामीण भागात पोचावा म्हणून राष्ट्रीयीकृत व्यापारी बँकांच्या शाखांचा विस्तार वेगाने केला. दुर्बल क्षेत्र आणि दुर्बल ग्राहक यांच्यापर्यंत कर्जपुरवठा पोचावा म्हणून कर्जवाटपाचा 40 टक्के भाग या अग्रक्रमी क्षेत्रासाठी निर्देशित केला. केवळ गरिबांच्या वित्तसेवेच्या गरजांच्या पूर्तीसाठी क्षेत्रीय ग्रामीण बँका स्थापन केल्या. स्वयंरोजगार निर्मितीचे एकात्मीकृत ग्रामीण विकासा (IRDP) सारखे कार्यक्रम बँकांमार्फत राबविले. परंतु या सर्व प्रयत्नांनंतरही 1981 मधे ग्रामीण भागातील 39 टक्क्यांच्या आसपास घरकुले बिगरसंस्थात्मक वित्तीय व्यवस्थेवर अवलंबून होती. 1991 मध्ये हे प्रमाण थोडेसे कमी होऊन 36 टक्क्यांवर आले. समाजाच्या तळातल्या आर्थिक स्थितीतील 50 टक्क्यांच्यावर लोकांना जास्त व्याजदर असणारा बिगरसंस्थात्मक वित्त स्रोतच उपलब्ध होता (रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया,1992). दारिद्र्यरेषेखालील लोकांसाठी राबविण्यात आलेल्या कार्यक्रमांतर्गत केलेल्या कर्जवाटपात कर्जदाराची निवड चुकीची (adverse selection) झाल्यामुळे परतफेडीचे प्रमाण कमी राहिले. बँकांचा गरीब ग्राहकांबाबतचा दृष्टिकोन उदासीन राहिला. या पार्श्वभूमीवर ग्रामीण वित्तपुरवठ्यात नवीन उपक्रमांना चालना देऊन संस्थात्मक वित्तसेवांची गुणवत्ता सुधारण्यासंबंधी जागतिक पातळीवर झालेल्या चर्चेत आशियाई देशातील गरिबांच्या अनौपचारिक वित्त संस्थांच्या कार्यपद्धतीची (स्वयं सहाय्यता गटांची) दखल घेण्यात आली आणि हे गट व औपचारिक वित्तसंस्था यांचा मेळ घालणाऱ्या वित्त यंत्रणेची संकल्पना पुढे आली. रिझर्व्ह बँकेच्या पाठिंब्याने नाबार्डने म्हैसूर पुनर्निवारण आणि विकास एजन्सी (MYRADA) या स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने 1986-87 मध्ये स्वयंसहाय्यता गटांसंबंधी प्रकल्प सुरू केला. या प्रकल्पातील व्यष्टीय व्यूह रचनेत खालील तीन घटकांचा समावेश होता.

1. स्वयंसेवी संघटनांनी स्वयं सहायता गटांची स्थापना करून बचतीच्या मार्गाने भांडवल निर्मिती करण्याची क्षमता वाढविणे.

2. नाबार्डने स्वयंसेवी संघटनांना वित्तपुरवठा करणे.

3. कालांतराने बँकांनी, विकसित झालेल्या स्वयंसहायता गटांना विशिष्ट कारणांसाठी बांधील नसणारे कर्ज देणे व यातून गटाने सदस्यांना उपभोगासाठी, उत्पादक गुंतवणुकीसाठी गटाने ठरविलेल्या व्याजदराने कर्जाचे वाटप करणे.

या प्रकल्पातून निघालेल्या निष्कर्षांची परिणती 1992 मध्ये स्वयंसहायता गट बँक जोडणी या व्यष्टीय वित्त व्यवस्थेच्या नावीन्यपूर्ण प्रतिमानात झाली. नाबार्ड ने 500 स्वयंसेवी गटांना सार्वजनिक व्यापारी बँकांशी जोडण्याचा पथदर्शी प्रकल्प सुरू केला. रिझर्व्ह बँक/नाबार्ड यांनी अनौपचारिक स्वयंसहायता गटांना वित्तपुरवठा करण्यासंबंधीची मार्गदर्शक तत्त्वे बँकांना वितरित केली. हे आशियाई देशातील लक्ष्य गट अभिमुख (Target Group Oriented) ग्रामीण बँकव्यवसायातील प्रथम पाउल होते. (Kropp and Surana 2002) यानंतर 1996 मध्ये रिझर्व्ह बँकेने स्वयंसहायता गट बँक जोडणी व्यष्टीय वित्त यंत्रणेचा बँकांच्या अग्रक्रमी

क्षेत्राच्या कर्जात समावेश करून या यंत्रणेला बँक व्यवहारांच्या मुख्य प्रवाहात आणले. बँकांना स्वयंसहायता गटांशी जोडणी करण्याची क्षमता असणाऱ्या शाखांना त्यांच्या सेवा क्षेत्र योजने मध्ये स्वयंसहायता गटांना कर्जपुरवठा करण्यासाठी आधारभूत सेवा देण्याचे आदेश देण्यात आले. बँकेच्या शाखेच्या अधिकाऱ्यांनी स्वयंसेवी संघटनांच्या सतत संपर्कात राहून त्यांच्या अनुभवांचा फायदा घ्यावा अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. रिझर्व्ह बँक आणि नाबार्ड यांच्या निकट सहकार्यानी 1999 पर्यंत या व्यष्टीय वित्त चळवळीची वाढ झाली. (Reddy Y.V. 2005) अधिकाधिक स्वयंसहायता गट निर्माण होऊन ते बँकांशी जोडले जाऊ लागले. या प्रक्रियेत वित्तिय संस्थांची कार्यक्षमता वाढवून त्यांच्यात स्पर्धात्मकता निर्माण करण्याच्या प्रयत्न करण्यात आला. कर्ज परत फेडीचे जवळजवळ 100 टक्के प्रमाण असणाऱ्या या यंत्रणेच्या बाबतीतील बँकांच्या सकारात्मक दृष्टिकोनामुळे स्वयंसेवी संघटनांबरोबर बँकांनीही स्वयंसहायता गट स्थापन करण्यास सुरूवात केली.

केन्द्र सरकारने 1999 साली दारिद्र्य निर्मूलनासाठी घोषित केलेल्या स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना (SGSY) या कार्यक्रमात स्वयंसहायता गटांमार्फत अनुदानारूपी कर्जाचे वाटप करून स्वयंरोजगार निर्माण करणे अभिप्रेत होते. या योजनेत अंतर्भूत असणारे स्वयंसहायता गटही बँकांच्या कर्जखातेवाटपात आले.

वरील पार्श्वभूमीवर भारतातील स्वयंसहायता गट बँक जोडणी व्यष्टीय वित्त कार्यक्रमाच्या विकासाचे तीन टप्पे दिसतात. (1) 1992 ते 1995 मधील या संकल्पनेची पथदर्शी चाचणी (2) 1996 ते 1998 च्या दरम्यान या कार्यक्रमाचा वित्तयंत्रणेच्या मुख्य प्रवाहात समावेश (3) 1998 नंतरचा विस्तार. यापैकी तिसऱ्या टप्प्यात ही यंत्रणा व्यष्टीय कर्जाच्या पलीकडे जाऊन यात इतर वित्तीय व बिगर वित्तीय सेवांचा समावेश करण्यात आला.

नाबार्ड, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया आणि केन्द्र सरकार यांच्या धोरणात्मक निर्णयांमुळे व्यष्टीय वित्त यंत्रणेचा विस्तार, होऊन ती बळकट झाली. बँकांना जोडलेल्या स्वयंसेवी संघटनांची संख्या 1993 मार्च अखेर केवळ 255 होती ती 2005 मार्च अखेर 16.17 लाख एवढी झाली आणि कर्जवाटप याच कालावधीत रू. 0.3 कोटीपासून रू. 6,898 कोटी एवढे प्रचंड वाढले. भारतातील ही वित्तीय व्यवस्था जगातील सर्वात मोठी व्यष्टीय बचत व कर्ज यंत्रणा ठरली!

स्वयंसहायता गटात झालेली ही संख्यात्मक वाढ प्रामुख्याने स्वयंसेवी संघटनांच्या पुरस्कारामुळे झाली. देशभरात निर्माण झालेल्या स्वयंसहायता गटांपैकी 80 टक्के गट स्यंसेवी संघटनांनी सुरू केलेले आहेत आणि त्यांचा कर्जातील वाटा 85 टक्के आहे. महिला सदस्य असणाऱ्या स्वयंसहायता गटांचे प्रमाणही लक्षणीय आहे. स्थानिक सामाजिक संदर्भ आणि त्या त्या भागातील स्वयंसेवा गटांचे स्वरूप लक्षात घेता देशभर विखुरलेल्या स्वयंसहायता गटात भिन्नत्त्व असणे अपेक्षित आहे. बचत-कर्ज या तत्त्वावर एकत्र येणे हा व्यष्टीय वित्त यंत्रणेतील स्वयंसहायता गटांमधील समान गुणधर्म आहे तरी व्यष्टीय वित्त यंत्रणेतील स्वयंसहायता गटांकडून सदस्यांच्या उपभोग व आपत्कालीन खर्चाच्या गरजा पूर्ण करण्याची देखील अपेक्षा आहे.

स्वयंसहायता गटांच्या पार्श्वभूमीत सैद्धान्तिक, अनुभवाधिष्ठित प्रवाह आहेत. तसेच स्वयंसहायता गटांच्या वाटचालीलाही गटांच्या

भिन्नत्त्वाचा संदर्भ आहे. हे भिन्नत्वही विविध पातळ्यांवरचे आहे. निबंध लिहितांना वरील बाबी ध्यानात ठेवणे आवश्यक आहे. चर्चासत्राच्या निबंधासाठी खालील मुद्यांचा विचार करता येईल.

1) गेल्या दोन दशकात जागतिक पातळीवर विकासाच्या कार्यक्रमातील दारिद्र्य निर्मूलनाला असणारा अग्रक्रम हे साध्य करण्यासाठी व्यष्टीय वित्त यंत्रणेला साधन म्हणून मिळालेली मान्यता आणि भारतातील स्वयंसहायता गट बँक जोडणी प्रतिमानाची भरीव प्रगती या पार्श्वभूमीवर अनेक संशोधनपर अभ्यास झाले आणि चर्चासत्रे आयोजित करण्यात आली. या अभ्यासांचा टीकात्मक आढावा घेणारा निबंध चर्चेला उत्तम पार्श्वभूमी देईल.

2) स्वयं सहायता गटावर आधारित व्यष्टीय वित्त यंत्रणेच्या कार्यक्षमतेचे नवसंस्थात्मक अर्थशास्त्राच्या चौकटीत सैद्धांतिक पातळीवर विश्लेषण करणारे निबंधचर्चेला सैद्धान्तिक स्वरूप प्राप्त करून देण्याच्या दृष्टिने महत्त्वाचे ठरतील. उदाहरणार्थ स्वयं सहाय्यता गटांच्या अनौपचारिकतेमुळे, सामाजिक संदर्भामुळे, वित्तिय शिस्तीचे नियंत्रण करणाऱ्या गटांतर्गत दबावामुळे व्यवहार खर्च कमी कसा होतो, याचे सैद्धांतिक विश्लेषण नवसनातन अर्थशास्त्राची तत्त्वे वापरून निबंधात करता येईल.

3) संकल्पनात्मक पातळीवर स्वयंसहायता गट बँक जोडणी प्रतिमानाची गृहीते, स्वरूप, स्वयंसहायता गट सुरू करणाऱ्या स्वयंसेवी संघटनांच्या स्वरूपावर गटांची ठरणारी गुणवत्ता इत्यादी विषय निबंधात चर्चेसाठी घेता येतील.

4) समष्टी पातळीवरील अनुभवाधिष्ठित अभ्यासाला स्वयं सहायता गटांची संख्यात्मक वाढ, विभागीय वृद्धीचे कल, या कलातील असमतोलाची कारणे यांचे विश्लेषण करणारे निबंध वित्तीय समावेशाचे (Financial inclusion) उद्दिष्ट कितपत साध्य झाले आहे यावर प्रकाश टाकतील. तसेच दरडोई कर्ज वाटप व बचत संकलन यांचे विश्लेषण करणारे निबंध वित्तीय समावेशाचा स्तर लक्षात आणून देऊ शकतील.

5) देशभर पसरलेल्या स्वयंसहायता गटांचे विविध स्तरावरील भिन्नत्त्व लक्षात घेता, व्यष्टीय पातळीवरील स्वयंसहायता गटांची निर्मिती, याला लागणारा कालावधी, गटांचा स्तर, बचत कर्ज व्यवहारांची कार्यपद्धती व कार्यक्षमता, टिकाउपणा यांची चौकशी करणारे निबंध स्वागतार्ह ठरतील. हे निबंध विश्लेषणात्मक असावेत हा महत्त्वाचा मुद्दा लक्षात घेणे आवश्यक आहे.

6) व्यष्टीय पातळीवरील अभ्यासात स्वयं सहायता गटाच्या आधारे निर्माण झालेल्या व्यष्टीय वित्त यंत्रणेच्या कार्यसंपादनाचे, कर्जपुरवठ्याची पर्याप्तता, कर्जदारांच्या उत्पन्नातील वाढ, सक्षमीकरण (विशेषत: महिलांचे) या निर्देशकांच्या सहाय्याने मूल्यमापन निबंधात करता येईल. विशेषत: विविध स्वयं सहायता गटाच्या सदस्यांची भिन्न आर्थिक सामाजिक परिस्थिती असतांना स्वयं रोजगार निर्मितीचे कार्यक्रम यशस्वी होऊ शकतील का ? तो यशस्वी एकात्मीकृत ग्रामीण विकास कार्यक्रमाच्या (IRDP)अनुभवाच्या पार्श्वभूमीवर व्हावयाचा असेल तर कोणत्या अटी पूर्ण होणे आवश्यक आहे याचा उहापोह निबंधात करता येईल. अर्थशास्त्रातील अनुभवाधिष्ठित अभ्यासाची पद्धती आणि समाजशास्त्र व मानववंशशास्त्र या शाखातील व्यष्टीय अभ्यासाची कथन पद्धती अशा पद्धतीचा उपयोग करून केलेले अभ्यास वस्तुस्थितीचे अधिक योग्य रीतीने स्पष्टीकरण देण्यास समर्थ ठरतील.

योग्य संशोधन पद्धतीचा काटेकोरपणे वापर

करून वर उल्लेख केलेल्या व इतरही विविध विषयांवर सादर झालेल्या निबंधांच्या चर्चेतून विकास साध्य करण्याची आवश्यकता असणाऱ्या या साधनाचे मूल्यमापन होऊन भविष्यकालीन वाटचालीवर प्रकाश टाकता येणे हे या चर्चासत्राच्या यशस्वीतेचे गमक असेल !

## संदर्भसूची


1. Harper, M(2002a),'Self-help groups and Grameen Bank Groups: What are the Differences?' in Thomas Fisher and M S Sriram (eds), Beyond Microcredit : Putting Development Back into Microfinance, Vistaar Publications, New Delhi, Oxfam, Oxford, UK, Published in association with New Economics Foundation, London.

2. Harper (2002b), 'Promotion of Self Help Groups under the SHG Bank Linkage Programme in India', paper presented at the Seminar on the SHG-bank Linkage Programme at New Delhi on November 25-26, published by Microcredit Innovations Department, NABARD, Mumbai.

3. Hoff, K and J Stiglitz (1990) Introduction : Imperfect Information and Rural Credit Markets - Puzzles and Policy Perspectives', World Bank Economic Review, Vol, No.3

4. Goldsmith,Raymond (1969) Financial Structure and Development (New Haven:Yale University Press).

5. K.Kalpana (2006), Shifting Trajectories in Micro Finance Discourse, Economic and Political Weekly, December, 17,2005.

6. King Robert and Levine Ross, 1993, Finance and Growth : Schumpeter might be Right, Quantitative Journal of Economics, Vol, 108, No.3(August) pp 717-737.

7. Kropp, Eahard W and B S Suran (2002), 'Linking Banks and (Financial)' Self-Help Groups in India - An Assessment, paper presented at seminar on SHG bank Linkage Programme at New Delhi on November 25-26, published by Microcredit Innovations Department, NABARD, Mumbai.

8. Mahajan Vijay (2005), From Microcredit to Livelihood Finance", Economic and Political Weekly, October 8,2005.

9. National Bank for Agriculture and Rural Development (1999) Task Force on Supportive Policy and Regulatory Framwork for Microfinance : Report, NABARD, Mumbai.(NABARD Website: www.nabard.org)

10. Mckinnon, Ronald (1973) Money, Credit and Capital in Economic Development (Washinton, DC:Brookings Institution).

11. Rangrajan, C (2005)Keynote address at the High Level Policy Conference in India, New Delhi 03 May to 05 May 2005)

12.Rangrajan (2006) 'Agricultural Credit in India : Status, Issues and Future Agenda', Economic and Polititcal Weekly, March 2006.

13. Reddy Y.V. (2005) Microfinance : Reserve Bank's Approach', Address delivered at the Micro Finance Conference organized by the Centre for Analytical Finance Indian School of Business, Hyderabad on Agugust 6,2005.

14. Shaw, G.S (1973) Financial Deepening in Economic Development (Oxford University Press, New York).

15. Stiglitz, JE (1990), Peer Monitoring and Credit Markets", World Bank Economic Review, Vol 4, No 3, 351-66.

16. Thorat,Y.S. (2005), Microfinance in India : Sectoral level Issues and Challenges', Theme Paper at the High Level Policy Conference.


✦✦✦

# 3. महाराष्ट्रातील आदिवासी भागातील कुपोषण समस्या व उपाय

✦ दि. व्यं. जहागिरदार, अमरावती.
*माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद*

**1. कुपोषणाचे स्वरूप**

भारतात अन्नधान्याच्या उत्पादनात लक्षणीय वाढ झाली आहे. रोग नियंत्रणावरही प्रभावी उपाय होत आहेत. आर्थिक व सामाजिक विकास देखील समाधानकारक होत आहे. तरीही भारतात स्त्रिया व मुलांच्या विविध समस्या आपण अनुभवत आहोत. या विविध समस्यांपैकी महत्त्वाची समस्या म्हणजे कुपोषण आणि त्याचा अपरिहार्य परिणाम म्हणजे बालमृत्यू होय. कुपोषणाची समस्या ही वैद्यकशास्त्र आणि आहारशास्त्राशी निगडित असली तरी त्या समस्येला आर्थिक तसेच सामाजिक आयाम आहेत. त्यामुळे या समस्येचे अध्ययन, संशोधन विविध विद्याशाखांमधील तज्ज्ञ, स्वयंसेवी संघटना आणि व्यावसायीक मंडळी करित आहेत.

मानव हा अन्नाच्या सेवनातून आवश्यक ती ऊर्जा (energy) प्राप्त करतो. अन्नातून प्राप्त ऊर्जेच्या सहाय्याने मान्यता प्राप्त मानकांच्या आधारावर कुपोषणाची व्याप्ती मोजली जाते. सुखात्मे यांनी संशोधनाद्वारे दाखवून दिले आहे की, अन्नाची ऊर्जेत परिवर्तन करण्याची क्षमता ही पिण्यायोग्य पाण्याची उपलब्धता, आरोग्याच्या सोयी आणि सभोवतालचे वातावरण या घटकांवर अवलंबून असते. व्यक्तीला अन्न सेवनातून शरीराचे पोषण करण्यासाठी पुरेशी ऊर्जा मिळाली का, याचे मापन करणे बरेच अवघड आहे. अशा मापनातून कुपोषण मोजता येते. बालकांच्या संदर्भात कुपोषण मोजण्यासाठी ऊर्जेचे शरीरावर होणारे परिणाम विचार घेऊन विविध पद्धतींचा वापर करून कुपोषण मोजले जाते. प्रौढ व्यक्तींच्या बाबतीत कुपोषण हा

शब्द प्रयोग न करता न्यून पोषण हा शब्द प्रयोग अधिक प्रचारात आहे. प्रौढ व्यक्तींच्या बाबतीत वैद्यकीय परिभाषेत याला दीर्घकालीन ऊर्जा न्यूनता (Chronic energy deficiency) म्हणतात. प्रौढांच्या बाबतीत ही दीर्घकालीन ऊर्जा न्यूनता ही एकप्रकारे सतत होत असणारी उपासमार असते. अगदी तीव्र उपासमार झाली तरच व्यक्तीचा मृत्यू संभवतो. मात्र, बालकांच्या बाबतीत कुपोषणाचा परिणाम त्वरित मृत्यूत होणे शक्य असते असे बालरोग तज्ज्ञांचे मत आहे.

ऊर्जेचे शरीरावर होणारे परिणाम मोजून कुपोषण झाले का हे बालकांच्या बाबत निश्चित करण्यासाठी पुढील 3 निर्देशके वापरली जातात : 1) वयानुसार उंची 2) उंचीनुसार वजन आणि 3) वयानुसार वजन. यापैकी वय संबंधित वजन या निर्देशकाचा वापर करून कुपोषण ठरविले जाते. बालकाचे वय (महिन्यात) माहित असते आणि वजन मोजणे सुलभ सोपे असते म्हणून हा निर्देशक वापरला जातो. बालकांमधील प्रथिन ऊर्जा कुपोषणाचे या निर्देशकाद्वारे मापन करण्याच्या विविध पद्धती आहेत. त्यापैकी गोमेझ (1956) पद्धती आणि इंडियन ॲकॅडेमी ऑफ पिडीयाट्रीक्स यांनी सुचविलेल्या पद्धती लोकप्रिय आहेत. या पद्धतीत वेगवेगळया वयाच्या (महिन्यात) बालकांचे अपेक्षित योग्य वजन दर्शविणारे कोष्टक असते. बालकाचे प्रत्यक्ष वजन करून त्याची अपेक्षित योग्य वजनाशी तुलना केली जाते व कुपोषण ठरविले जाते. बालकाचे प्रत्यक्ष वजन हे अपेक्षित वजनाच्या 90 प्रतिशत पर्यंत असले तर त्याला सामान्य बालक म्हटले जाते. हा बालक न्यून पोषित नाही. जर बालकाचे वजन अपेक्षित वजनाच्या 75 ते 90 प्रतिशतच्या दरम्यान असेल तर त्याला अल्प कुपोषित किंवा पहिल्या श्रेणीचे कुपोषण म्हटले जाते; बालकाचे प्रत्यक्ष वजन अपेक्षित वजनाच्या 60 ते 75 प्रतिशत असेल तर त्याला मध्यम कुपोषण किंवा दुसऱ्या श्रेणीचे कुपोषण मानले जाते. मात्र प्रत्यक्ष वजन हे अपेक्षित वजनाच्या 60 प्रतिशतपेक्षा कमी असेल तर त्याला तीव्र कुपोषण किंवा तिसऱ्या श्रेणीचे कुपोषण म्हणतात. प्रौढांच्या बाबतीत दीर्घकालीन उर्जा न्यूनता मोजण्यासाठी शरीर वजन देशनांक (Body Mass Index) याचा वापर केला जातो. श.व.दे. = वजन (कि.ग्र.)/ उंची (मिटर$^2$) { BMI = Weight (kg)/ Hight (Meter$^2$)} या सूत्राचे उत्तर जर 18.5 पेक्षा कमी असेल तर संबंधित प्रौढ व्यक्तीत दिर्घकालीन ऊर्जा न्यूनता आहे असे मानले जाते.

### 2. महाराष्ट्रातील कुपोषणाची व्याप्ती, कारणे

भारतात नॅशलन न्यूट्रीशन मॉनीटरिंग ब्युरो (NNMB) यांनी तीन वेळा पोषण संबंधात पाहणी करून अहवाल प्रसिद्ध केले आहेत. तसेच त्यांनी ग्रामीण भागातील आहाराबाबत नऊ राज्यांमध्ये 1990-91 आणि 2000-01 मध्ये पाहणी केली होती. त्याच प्रमाणे 'राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण' 1992-93 आणि 1998-99 मध्ये करण्यात आले. दुसऱ्या सर्व्हेक्षणात सर्व प्रांतामधील 90 हजार स्त्रियांकडून प्रश्नावलीचा सहाय्याने माहिती गोळा केली. या सर्व्हेक्षणाचे 52 अहवाल प्रसिद्ध झाले आहेत. कुपोषण निर्धारित करण्याच्या दृष्टिने या विविध अहवालांचा अभ्यास करता येईल. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाच्या (1998-99) अहवालाचा या दृष्टिने उपयोग करता येईल. राष्ट्रीय कुटुंब

आरोग्य सर्वेक्षणाच्या (1998-99) अहवालावरून असे दिसते की 3 वर्षाखालील मुलांच्या बाबतीत ग्रामीण भागातील 20.3 प्रतिशत मुले तीव्र कुपोषित होती तर 30.2 प्रतिशत मुले ही मध्यम कुपोषित होती. विशेष बाब म्हणजे, महाराष्ट्रात ग्रामीण भागातील 22.5 प्रतिशत मुले तीव्र कुपोषित तर 32.1 प्रतिशत मुले मध्यम कुपोषित होती.

विशेष म्हणजे शहरी भागातही मध्यम कुपोषित बालकांचे प्रमाण 33.5% होते. नॅशनल न्यूट्रीशन मॉनिटरिंग ब्युरोने दर्शविले की, भारतातील 9 प्रातांमध्ये (ग्रामीण क्षेत्र) 1996-97 मध्ये न्यून पोषित बालकांचे प्रमाण 50.5 टक्के होते. 1975-76 मध्ये हे प्रमाण 62.5 टक्के होते. 1996-97 मध्ये केरळ मध्ये ग्रामीण भागात न्यून पोषित बालकांचे प्रमाण सर्वात कमी म्हणजे 27.1% तर महाराष्ट्रात हे प्रमाण 57.2 प्रतिशत होते. इ.स. 2000-01 मध्ये ग्रामीण भारतात 37.4 टक्के प्रौढ पुरूषांमध्ये आणि 39.4 प्रौढ स्त्रियांमध्ये दीर्घकालीन उर्जा न्यूनता होती. महाराष्ट्रातील ग्रामीण भागात हे प्रमाण अनुक्रमे 41.3 आणि 45.1 टक्के होते.

महाराष्ट्राच्या ग्रामीण क्षेत्रात NNMB अहवाल 2002 नुसार तीव्र कुपोषित बालकांचे प्रमाण 7.2 टक्के असून मध्यम कुपोषित बालकांचे प्रमाण 45.0 टक्के आहे.या आकडेवारीत 5 वर्षापर्यंतची बालके अन्तर्भूत आहेत. अनेक वेळा असे दिसते की, महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील हे आकडे संपूर्ण महाराष्ट्र बाबत दर्शविले जातात. महाराष्ट्र शासनाच्या बालमृत्यू मूल्यमापन समितीच्या ऑगस्ट 2004 च्या अहवालातही असे झाले आहे. इथे हेही लक्षात घेतले पाहिजे की, ही सर्व आकडेवारी नमुना पद्धतीने गोळा केली जाते. बालकांच्या कुपोषणाचा परिणाम हा अखेरीस त्यांच्या मृत्यूत होऊ शकतो. महाराष्ट्रात जे बालमृत्यू तसेच मृतजन्म होतात, त्याच्या नोंदणीसाठी शासकीय व्यवस्था कार्यरत असते. शासकीय व्यवस्थेतून उपलब्ध बाल मृत्यूची आकडेवारी अचूक नसते. सर्व बाल मृत्यूंची नोंद होत नाही. अर्थात उपलब्ध आकडेवारीपेक्षा प्रत्यक्षातील बालमृत्यू हे बरेच जास्त आहेत.

अभय बंग यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या बालमृत्यू मूल्यमापन समितीच्या अहवालात बालमृत्यूची कारणेही दिली आहेत. एकूण बालमृत्यूंपैकी 10.4 टक्के बालमृत्यू कुपोषणामुळे होतात. नवजातबाल मृत्यू हे बालमृत्यू होणाचे कारण दर्शविले असून एकूण बालमृत्यूपैकी 58.7 टक्के नवजात बालमृत्यू असतात. नवजात बालमृत्यूचे स्वतंत्र अध्ययन झाले पाहिजे. कारण हे मृत्यू बऱ्याच वेळा मातेच्या निम्न दर्जाच्या पोषणामुळे झाले असतात. अजूनही न्युमोनिया आणि हगवण यामुळे 23.4 टक्के बालकांचे मृत्यू होतात. बालमृत्यूच्या प्रमाणात जिल्हा निहाय भिन्नता असेल तसेच कारणांमध्येही तफावत असू शकेल. त्यावरही भर देता येईल.

कुपोषण होण्याची जी अनेक कारणे आहेत त्यात दारिद्र्य हे प्रमुख कारण आहे. अमर्त्य सेन यांच्या दृष्टिकोनातून सांगायचे झाल्यास अधिकारितेचा अभाव हे कुपोषणाचे कारण सांगता येते. याखेरीज, पिण्यायोग्य पाण्याचा अभाव, सार्वजनिक स्वच्छतेच्या सोयींचा अभाव, आरोग्य विषयक सोयींची

उणीव, वाहतूक व्यवस्था, अल्पशिक्षण, अंधश्रद्धा, वैद्यकीय उपचार-माहितीचा अभाव, कुटुंबाचा मोठा आकार, स्त्रियांची कमी अंतराने होणारी अनेक बाळंतपणे इ. विविध कारणे कुपोषण व पर्यायाने बालमृत्यूस जबाबदार आहेत.

### 3. अपेक्षित विवेचन

कुपोषण नियंत्रित करण्यावर व त्यासोबत बालमृत्यू होऊ नयेत म्हणून शासकीय स्तरावर विविध उपाय योजले जात आहेत. राज्यस्तरावर तसेच जिल्हा निहाय या उपायांचा व त्यांच्या परिणामकारकतेचा अभ्यास करता येईल. शासकीय यंत्रणा विशेषकरून प्राथमिक आरोग्य केंद्रे व ग्रामीण रूग्णालये यांच्याही कार्यांचा आढावा घेतला पाहिजे. स्वयंसेवी संघटनांनी महाराष्ट्राच्या आदिवासी विभागात कार्य सुरू केले आहे. तसेच ग्रामीण भाग व झोपडपट्ट्यांमध्येही त्या कार्यरत आहेत. त्यांनी केलेल्या कार्याचाही या अनुषंगाने विचार करता येईल. कुपोषित बालकांच्या कुटुंबांची नमुना पद्धतीने आर्थिक सामाजिक पाहणी करून काही नवीन तथ्ये समोर येतील. आदिवासी क्षेत्रात या दृष्टीने विशेष समस्या व उपाय सांगता येतील.

शोध निबंध लिहितांना संबंधित विषयांचे शीर्षक न देता निवडलेल्या पैलूच्या आधारे शीर्षक द्यावे व आकडेवारी सोबत विश्लेषणावर भर द्यावा.

### संदर्भ सूची


1. Bang Abhay & others (2002):"Child Mortality in Maharashtra EPW, Dec. 7-13.

2. International Institute of Population Studies(2000) National Family Health Survey, 1998-99.

3. National Institute & Nutrition (2002) : Diet and nutritional status of Rural population.

4. Ravi C Rashakrishna R. (2004) : Malnutrition in India, trends and Determinants, EPW Feb. 14-20.

5. Roy T.K. & other (2004) Social enqualities in health and nutrition EPW, Feb 14-20.

6. Sachdev H.P.S. (1998): Nutrition and Child Development Paras publishing Hydrabad.

7. जहागिरदार दि. व्यं. (1996) : महाराष्ट्रातील सार्वजनिक आरोग्याचे अर्थशास्त्र, अर्थसंवाद जाने-मार्च 96 पृ. 324-389.

8. जहागिरदार दि. व्यं. (2005) : भारतातील बालकांच्या पोषण स्थितीची गंभीर अवस्था, आर्थिक जगत मधील लेख पृ. 89-92, सेंटर फॉर एकॉनोमिस्ट ॲन्ड सोशल स्टडीज, अमरावती.

9. महाराष्ट्र शासन (2004) : बालमृत्यू मूल्यमापन समिती.


✦✦✦

# 2005-2006 या वर्षात झालेले आजीव सभासद

1) प्रा. सौ. वाचासुंदर अंजली (नागपूर)
2) डॉ. टक्कामोरे संगीता गोकुळचंद (रामटेक)
3) प्रा. सौ.देशपांडे प्राची (नागपूर)
4) प्रा. घबक सी.एस. (मुंबई)
5) प्रा. कावळे एस.एस.(देसाईगंज)
6) डॉ. अदवंत विजयकुमार (हैदराबाद)
7) डॉ. गोविलकर विजयकुमार (नाशिक)
8) डॉ. सौ. ठाकरे एम.आर (नागपूर)
9) प्रा. डॉ. मगदूम अे.जी. (कोल्हापूर)
10) फुसे सुभाषराव त्र्यंबक (जळगांव)
11) प्रा. मुलाणी एम.यू. (पुणे)
12) सौ. ठाकरे वर्षा राजेश (नागपूर)
13) आदक स्वामी गंगाधर (पुणे)
14) धेंडे लता दिगंबर (पुणे)
15) भांडवलकर रामदास बापूरावजी (यवतमाळ)
16) देशपांडे विजय कृष्णराव (बुलढाणा)
17) गुर्जर सुभाष रामचंद्रजी (बुलढाणा)
18) प्रा. पाटील विलास हिम्मतराव (जळगाव)
19) डॉ. मगरे सुरेश कचरू (नाशिक)
20) प्रा. कचरे लक्ष्मण शामराव (सातारा)
21) प्रा. डॉ. पाते शिवाजी बाबूराव (परभणी)
22) प्रा. सामाले सुरेश त्रिंबकराव (परभणी)
23) प्रा. सौ. नेहेते वर्षा कमलाकर (जळगाव)
24) प्रा. माळशिखरे एन.एस. (जालना)
25) भरत गौतम कमलाकर (वर्धा)
26) सोनोने सुधाकर चंपतराव (वर्धा)
27) कोरे सिंधुदेवी कृष्णराव (सांगली)
28) प्रा. गायकवाड यशवंत सदाशिव (सांगली)
29) प्रा. अवघडे लक्ष्मण आबाजी (पुणे)
30) प्रा. सुर्यवंशी अंकुश काशीनाथ (पुणे)
31) प्रा. कासार एकनाथ कृष्णदास (जळगांव)
32) डॉ. जगताप सुरेश रामरावजी (अमरावती)
33) प्रा. भोर भिमाजी काशिबा (पुणे)
34) प्रा. वेडे संजय गोविंदराव (सातारा)
35) जाधव प्रतिभा जयवंत (मुंबई)
36) प्रा. कुलकर्णी प्रदिप रामराव (बीड)
37) सावंत वासदेव नारायण (सिंधुदुर्ग)
38) प्रा. दातार प्रकाश दामोदर (रायगड)
39) प्रा. चौगुले कुंडलिक भीमराव
40) प्राचार्य शिंदे कुंडलिक हौसराव(सातारा)
41) प्रा. मोरे भीमराव पांडुरंग (पुणे)
42) शिंदे सुभाष बाजीराव(पुणे)
43) प्रा. शिंदे मोहन बळीबा (अहमदनगर)
44) गावंडे रविकांत नीनाजी(बुलढाणा)
45) रहाणे अशोक भाऊसाहेब (अहमदनगर)
46) तळतकर संजय भागवतराव (बीड)
47) गोंधळेकर माधव मंजिरी (मुंबई)
48) सौ. बापट आसावरी विजय (मुंबई)
49) श्रीमती देशकर शुभांगी एस. (ठाणे)

# 2005-2006 या वर्षात झालेले आजीव सभासद

50) प्रा. मैद सुरेश नामदेव (ठाणे)
51) प्रा. पाटील शुभा राजधर (पुणे)
52) शिंदे नीलकंठ विठ्ठल (महाबळेश्वर)
53) विभूते सोमनाथ सर्जेराव (ठाणे)
54) डॉ. पटेल विभूती (मुंबई)
55) डॉ कर्णे मनीषा (मुंबई)
56) प्रा. डॉ. अडसूळ अरूण (बारामती)
57) प्रा. गोलाहित सुरेश बळीराम (धुळे)
58) कठरे एच.एन. (नागपूर)
59) खेरडे दिनेश भास्करराव (अमरावती)
60) राठोर दयाळू किसन (अकोला)
61) ताकतोडे मधुकर श्रीराम (वाशिम)
62) प्रा. मायूरकर राजेश हरीभाऊ (वाशिम)
63) प्रा. पिस्तुलकर निवृत्ती आत्माराम (यवतमाळ)
64) हिरूळकर कविता प्रल्हादराव (अमरावती)
65) प्रा. हिवरे दौलत यशवंत (जळगांव)
66) डॉ. गायकवाड बी.आर. (जालना)
67) डॉ. कदम विश्वास (जालना)
68) प्रा. भारती दिपक महादेव (औरंगाबाद)
69) प्रा. पाटील बाळासाहेब साहेबराव (मुंबई)
70) प्रा. करंडे संदिपान बी. (मुंबई)
71) भालेराव सुभाष लक्ष्मण (नंदुरबार)
72) अकोले सत्यशिल अे. (जळगाव)

✦✦✦

**MARATHI ARTHASHASTRA PARISHAD (Estd. 1997)**
**ANNOUNCEMENT**

The Parishad has constituted an Endowment Fund for the award, on an annual basis, of Dr. R.S. Sabnis Memorial Prize of Rupees Four Thousand only for outstanding contribution in the form an article published during calender years 2005 and 2006 in standard accredited journals on themes belonging to the areas: Central Banking, Industrial Finance and General Industrial Economics. Last date for the submission of entries (Two copies) for the year's contest is 10th September 2006. For further details contact the undersigned at his address : Dr. J.F. Patil, Akshay, B-6, Tara Terraces, S.S.C. Board Road, Samrat Nagar, Kolhapur.

**J.F. Patil** Executive President

# 2005-2006 या वर्षात इमारत निधी दिलेल्या सभासदांची नावे

| | | |
|---|---|---|
| 1) | न.भी. कुलकर्णी (नाशिक) | 15000/- |
| 2) | बी.जी. चितळे (सांगली) | 10000/- |
| 3) | सरोज आयर्न इंडस्ट्रीज (कोल्हापूर) | 10000/- |
| 4) | धनंजय कमलापूरकर (पुणे) | 10000/- |
| 5) | अश्विन होंकण (पुणे) | 10000/- |
| 6) | व्ही.जी. पेंढारकर (पुणे) | 10000/- |
| 7) | किसान टायर्स (कोल्हापूर) | 5001/- |
| 8) | श्री. आ. देशपांडे (नागपूर) | 5000/- |
| 9) | प्रा. डॉ. सर्जेराव ठोंबरे (औरंगाबाद) | 5000/- |
| 10) | प्रा. डॉ. संतोष दास्ताने (पुणे) | 5000/- |
| 11) | प्रा. डॉ. ज.फा. पाटील (कोल्हापूर) | 5000/- |
| 12) | प्रा. दिलीप कदम (पुणे) | 5000/- |
| 13) | डॉ. शशिकांत गंधे (पुणे) | 5000/- |
| 14) | श्री प्रभाकर जोशी (मुंबई) | 5000/- |
| 15) | ललिता शिरपूरकर (नागपूर) | 5000/- |
| 16) | डॉ. सु.दा. तुपे (पुणे) | 5000/- |
| 17) | सुखदेव नवले (पुणे) | 5000/- |
| 18) | डॉ. अ. रा. पडोशी (गोवा) | 5000/- |
| 19) | नलीनी पंडीत (मुंबई) | 5000/- |
| 20) | विनायक श्रीधर देशपांडे | 5000/- |
| 21) | श्री पद्माकर दुभाषी (पुणे) | 4000/- |
| 22) | डॉ. व्यं. सु. पाटणकर (पुणे) | 2500/- |
| 23) | प्रा. व्ही. डी. पाटील (जळगांव) | 2000/- |
| 24) | डॉ. माधव दातार (पुणे) | 2002/- |
| 25) | वसुधा जोशी (पुणे) | 1050/- |
| 26) | व्ही. डी. चव्हाण (सांगली) | 1020/- |
| 27) | विलास हिलगे (कोल्हापूर) | 1020/- |
| 28) | के.एस. चिपडेसराफ (कोल्हापूर) | 1020/- |
| 29) | डॉ. निळकंठ सप्रे (पुणे) | 1100/- |
| 30) | श्री. राहूल म्होपरे (कोल्हापूर) | 1001/- |
| 31) | प्रा. डॉ. दिलीप खंडेराव पाटील (सांगली) | 1000/- |
| 32) | प्रा. शिवाजी दत्तू साळुंखे (कोल्हापूर) | 1000/- |

# 2005-2006 या वर्षात इमारत निधी दिलेल्या सभासदांची नावे

| | | |
|---|---|---|
| 33) | प्रा. हिरालाल चव्हाण (जळगाव) | 1000/- |
| 34) | श्री. एल.एम. पालके (जयपूर) | 1000/- |
| 35) | प्रा. दिनकर बोरीकर (औरंगाबाद) | 1000/- |
| 36) | प्रा. शांताराम गोमासे (बुलढाणा) | 1000/- |
| 37) | प्रा. कुंदा मुळे (बुलढाणा) | 1000/- |
| 38) | प्रा. राजेंद्रकुमार गव्हाळे (बुलढाणा) | 1000/- |
| 39) | प्रा. संजय वराडे (बुलढाणा) | 1000/- |
| 40) | प्रा. डॉ शोभा नेमाडे (जळगाव) | 1000/- |
| 41) | डॉ एस.के. गंधे (पुणे) | 1000/- |
| 42) | प्रा. डॉ. शैला बिराजदार (जळगाव) | 1000/- |
| 43) | सु.गो. भानुशाली (पुणे) | 1000/- |
| 44) | प्रा. दिनकर टकले (जालना) | 1000/- |
| 45) | प्रा. अविनाश निकम (नंदुरबार) | 1000/- |
| 46) | प्राचार्य आर. डी. राणे (जळगाव) | 1000/- |
| 47) | सौ सावित्री जीठीगुंठा (कोल्हापूर) | 1000/- |
| 48) | डॉ. सौ. मुक्ता जहागीरदार (अमरावती) | 1000/- |
| 49) | प्रा. जी.एस. हारकुड (सोलापूर) | 1000/- |
| 50) | प्रा. जे.एस.पाटील (सातारा) | 1000/- |
| 51) | प्रा. दिलीप महाजन (बुलढाणा) | 1000/- |
| 52) | प्रा. रजनी पाठक (ठाणे) | 1000/- |
| 53) | प्रा. शेखर गाडगीळ (पुणे) | 1000/- |
| 54) | श्री पांडुरंग जनार्दन ताम्हनकर (सांगली) | 1000/- |
| 55) | प्रा. डॉ. सरला चौधरी (जळगाव) | 1000/- |
| 56) | श्री बाजीराव मुडेकर (कोल्हापूर) | 1000/- |
| 57) | सौ. तेजस्वीनी मुडेकर (कोल्हापूर) | 1000/- |
| 58) | श्री संतोष यादव (कोल्हापूर) | 1000/- |
| 59) | श्री पी.जी. पाटील (कोल्हापूर) | 1000/- |
| 60) | श्री व्ही.बी. ककडे (कोल्हापूर) | 1000/- |
| 61) | श्रीमती एस.एस. पाटील (कोल्हापूर) | 1000/- |
| 62) | श्री. कालीदास जोशी (औरंगाबाद) | 1000/- |
| 63) | सौ. जयश्री भंगाळे (जळगाव) | 1000/- |
| 64) | श्री सर्वोत्तम कुळकर्णी (नाशिक) | 1000/- |

## 2005-2006 या वर्षात इमारत निधी दिलेल्या सभासदांची नावे

| | | |
|---|---|---|
| 65) | सौ. लिला कुळकर्णी (नाशिक) | 1000/- |
| 66) | श्री विश्वास नाईकनवरे (पुणे) | 1000/- |
| 67) | श्री. र.पु. कुरूलकर (औरंगाबाद) | 1000/- |
| 68) | कमलाकर हणवंते (यवतमाळ) | 1000/- |
| 69) | के. टी. राणे (जळगाव) | 1000/- |
| 70) | एम. जी. भिडे (मुंबई) | 1000/- |
| 71) | ए.बी. देवगिरीकर (औरंगाबाद) | 1000/- |
| 72) | अभय शेंडे (पुणे) | 1000/- |
| 73) | एस.एस. देशमुख (पुणे) | 1000/- |
| 74) | देवदत्त दाभोळकर (सातारा) | 1000/- |
| 75) | आर. के. शिंदे (सातारा) | 1000/- |
| 76) | पी.एन.जोशी (कोल्हापूर) | 1000/- |
| 77) | ए.पी. देसाई (सातारा) | 1000/- |
| 78) | अ.कृ. वावरे (कोल्हापूर) | 1000/- |
| 79) | प्रभा भास्कर कदम (सातारा) | 1000/- |
| 80) | जयश्री डी. खांबेटे (सातारा) | 1000/- |
| 81) | एन.एम. आचार्य (सातारा) | 1000/- |
| 82) | प्रकाश जे. जाधव (सातारा) | 1000/- |
| 83) | दिलीप पाटील (मुंबई) | 1000/- |
| 84) | शर्वरी कुलकर्णी (सांगली) | 1000/- |
| 85) | कुंडलीक कोकरे (कोल्हापूर) | 1000/- |
| 86) | यशवंत गायकवाड (सांगली) | 1000/- |
| 87) | शिवाजी भोसले (कोल्हापूर) | 1000/- |
| 88) | चंद्रकांत भानुमते (कोल्हापूर) | 1000/- |
| 89) | अर्जुन महाडिक (सांगली) | 1000/- |
| 90) | यू.एम. माळकर (सांगली) | 1000/- |
| 91) | एम.यु. मुलाणी (पुणे) | 1000/- |
| 92) | एम.जे. पाटील (कोल्हापूर) | 1000/- |
| 93) | सुनिता माळी (सांगली) | 1000/- |
| 94) | यास्मीन आवटे (रत्नागिरी) | 1000/- |
| 95) | एस.के.कोरे (सांगली) | 1000/- |

# 2005-2006 या वर्षात इमारत निधी दिलेल्या सभासदांची नावे

| | | |
|---|---|---|
| 96) | संतोष लालगे (कोल्हापूर) | 1000/- |
| 97) | आर.जी. दांगडे (कोल्हापूर) | 1000/- |
| 98) | फरनेस फिडर्स (कोल्हापूर) | 1000/- |
| 99) | डॉ. अरविंद पाटील (मुंबई) | 1000/- |
| 100) | डॉ. पांडुरंग गावडे (कोल्हापूर) | 1000/- |
| 101) | डॉ. पी.बी. कुलकर्णी (सांगली) | 1000/- |
| 102) | एल.एम. घाटगे (सातारा) | 1000/- |
| 103) | डॉ. डी.आर. हिरगुडे (सांगली) | 1000/- |
| 104) | डॉ. पी.ए. कोळी (कोल्हापूर) | 1000/- |
| 105) | डॉ. डी.जी.चौगुले (कोल्हापूर) | 1000/- |
| 106) | श्री प्रमोद पोते (कोल्हापूर) | 1000/- |
| 107) | डॉ. एस.के.कुळकर्णी (कोल्हापूर) | 1000/- |
| 108) | प्रा. गोविंद जाधव (कोल्हापूर) | 1000/- |
| 109) | अर्जुन पाटील (कोल्हापूर) | 1000/- |
| 110) | डॉ. एस.एम.बिसले (सांगली) | 1000/- |
| 111) | डॉ. निवास जाधव (कोल्हापूर) | 1000/- |
| 112) | श्री सुभाष अण्णाप्पा पाटील (कोल्हापूर) | 1000/- |
| 113) | श्री निळकंठ स्वामी (कोल्हापूर) | 1000/- |
| 114) | डॉ. तानाजी मारूती भोसले (सांगली) | 1000/- |
| 115) | मसाळ नागनाथ भगवान | 1000/- |
| 116) | प्रमोद पुजारी (सांगली) | 1000/- |
| 117) | वि.स. कुलकर्णी (अमरावती) | 1000/- |
| 118) | के.ई. पाटील (नागपूर) | 1000/- |
| 119) | राजेश जुमडे (नागपूर) | 1000/- |
| 120) | जी.एन.हडप (नागपूर) | 1000/- |
| 121) | प्रा.एच.एन. कठरे (नागपूर) | 1000/- |
| 122) | प्रा.पी.जी.देशमुख (सांगली) | 1000/- |
| 122) | अशोक साबळे (कोल्हापूर) | 1000/- |
| 124) | आर.जी.बीडकर (मुंबई) | 1000/- |
| 125) | भास्कर ढाले (यवतमाळ) | 1000/- |
| 126) | रामदास भांडवलकर (यवतमाळ) | 1000/- |

# 2005-2006 या वर्षात इमारत निधी दिलेल्या सभासदांची नावे

| | | |
|---|---|---|
| 127) | रविंद्र ढाले (अकोला) | 1000/- |
| 128) | सुभाष गुर्जर (बुलढाणा) | 1000/- |
| 129) | रामेश्वर भिसे (बुलढाणा) | 1000/- |
| 130) | सुषमा देशमुख (अमरावती) | 1000/- |
| 131) | प्रा. एस. के. पाटील (जळगाव) | 1000/- |
| 132) | प्रा. अशोकगीर गोस्वामी (जळगाव) | 1000/- |
| 133) | प्रा.सौ. नीता चोरडिया (जळगाव) | 1000/- |
| 134) | प्रा. अरूण पिसे (धुळे) | 1000/- |
| 135) | प्रा. एम.ए. उपासनी (जळगाव) | 1000/- |
| 136) | प्रा. डॉ. अशोक खाचणे (जळगांव) | 1000/- |
| 137) | सौ आशा जगदाळे | 1000/- |
| 138) | सौ. सुनीता सतीश राठोड | 1000/- |
| 139) | डॉ. व्ही.एम. चव्हाण (कोल्हापूर) | |
| 140) | सौ. सुजाता पाटील | 1000/- |
| 141) | प्रा. विजयकुमार पाटील | 1000/- |
| 142) | डॉ. सुहास सहस्रबुद्धे (सांगली) | 1000/- |
| 143) | सौ. शीला सहस्रबुद्धे (सांगली) | 1000/- |
| 144) | सौ. विद्या प्रल्हाद कट्टी (कोल्हापूर) | 1000/- |
| 145) | प्रा. वासुदेव नारायण सावंत | 1000/- |
| 146) | प्रा. शशिकांत गाडगीळ (कोल्हापूर) | 1000/- |
| 147) | प्रा. सुधीर शेषभरे (सांगली) | 1000/- |
| 148) | प्रा. एस.एस. पाटील (कोल्हापूर) | 1000/- |
| 149) | दै. तरूण भारत (बेळगांव) | 1000/- |
| 150) | धनश्री महाजन (औरंगाबाद) | 1000/- |
| 151) | कालींदी जाहगीरदार (औरंगाबाद) | 1000/- |
| 152) | युगंधरा टोपरे (औरंगाबाद) | 1000/- |
| 153) | गणेश बापूराव गावंडे (जालना) | 1000/- |
| 154) | शिवाजी पोते (परभणी) | 1000/- |
| 155) | तुळशीराम शिराळ (हिंगोली) | 1000/- |
| 156) | दत्तात्रय एस. तिकटे (परभणी) | 1000/- |
| 157) | कैलास काशीनाथ पाटील (परभणी) | 1000/- |

## 2005-2006 या वर्षात इमारत निधी दिलेल्या सभासदांची नावे

| | | |
|---|---|---|
| 158) | तुकाराम मुंडे (परभणी) | 1000/- |
| 159) | कैलास ठोंबरे (औरंगाबाद) | 1000/- |
| 160) | रामकृष्ण एस. सोळुंके (औरंगाबाद) | 1000/- |
| 161) | अरूण त्र्यंबक तवार (परभणी) | 1000/- |
| 162) | माधव गायकवाड (औरंगाबाद) | 1000/- |
| 163) | एम.पी. खंदारे (औरंगाबाद) | 1000/- |
| 164) | बी.आर.गायकवाड (औरंगाबाद) | 1000/- |
| 165) | डी.एस. अर्जुने (जालना) | 1000/- |
| 166) | विश्वास कदम (जालना) | 1000/- |
| 167) | राधेशाम राऊत (जालना) | 1000/- |
| 168) | दीपक भारती (औरंगाबाद) | 1000/- |
| 169) | बाळासाहेब एस. पाटील (मुंबई) | 1000/- |
| 170) | अशोक पत्की (बीड) | 1000/- |
| 171) | संदिपान बी. करंडे (मुंबई) | 1000/- |
| 172) | सुभाष एस. भालेराव (नंदुरबार) | 1000/- |
| 173) | शिवाजी सांगळे (औरंगाबाद) | 1000/- |
| 174) | रूखसाना तबस्सुम (औरंगाबाद) | 1000/- |
| 175) | वसुधा खांदेवाले (औरंगाबाद) | 1000/- |
| 176) | बी.जी.कोरे (सातारा) | 1000/- |
| 177) | अनघा पाठक (कोल्हापूर) | 1000/- |
| 178) | मधुरा देसाई | 1000/- |
| 179) | डॉ. श्रीपाद वासुदेव गीरसागर (सिंधुदुर्ग) | 1000/- |
| 180) | डॉ. प्रभाकर लक्ष्मण भावके (सिंधुदुर्ग) | 1000/- |
| 181) | प्राचार्य दिलीप साहेबराव पाटील (नंदुरबार) | 1000/- |
| 182) | भाऊसाहेब निकम (धुळे) | 1000/- |
| 183) | ॲड. सत्यशील अकोले (जळगाव) | 1000/- |
| 184) | प्रा. दिनकर बोरीकर (औरंगाबाद) | 900/- |
| 185) | उत्तम वाकोडकर (बीड) | 850/- |
| 186) | प्रा. सौ. विद्या पाटील (धुळे) | 500/- |
| 187) | डॉ. दि. व्यं. जहागिरदार (अमरावती) | 500/- |

✦✦✦

# अर्थसंवाद

(खंड 29, 2005-06)

## (अ) लेख सूची

### स्वतंत्र लेख


1 अर्थ शब्दांची वाट पाहे 90-95, 280-81

2 आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिद्धांत 3-22, 99-115,191-211,309-30

3 उपभोग बचत व गुंतवणूक विषयक सवयींचा अभ्यास 150-66

4. कृषी विपणनाचे विविध पैलू 117-25

5 गरिबी निर्मूलन आणि आर्थिक विकास- 21व्या शतकासाठी नवीन प्रतिमान 245-60

6. पाणी व्यवस्थापनाची आदर्श पद्धत 167-75

7. भांडवलशाहीचे भाष्यकार : पॉल स्वीझी 40-49

8. भारत सरकारचा अर्थसंकल्प : 2005-06 50 -62

9. मराठवाड्याचा औद्योगिक असमतोल 76-89

10. महाराष्ट्रातील मानव विकासाची वास्तविकता 140-49

11. महाराष्ट्र जिल्हा परिषदांचे वित्तीय व्यवस्थापन 261-72

12. मूल्यवर्धित कर व त्याची अंमलबजावणी 126-39

13. व्यवसाय प्रक्रिया बाह्यस्रोत 63-75

14. स्त्री केंद्री दृष्टिकोनातून केंद्रीय अर्थसंकल्पाचे विश्लेषण 219-44

15. हाँगकाँग परिषदेचे यशापयश 212-18


### भाषणे


1 ग्रामीण विकास-मानवी व नैसर्गिक संसाधनाधिष्ठित विकास प्रतिमान. (29 वे वार्षिक अधिवेशन अध्यक्षीय भाषण ) 289-308

2. जागतिकीकरण कोणासाठी ? कशासाठी ? (पां.वा. गाडगीळ स्मृती व्याख्यान) 23-39


### पारितोषिक प्राप्त लेख


1 सामाजिक निवडी संदर्भात एक वेचक साहित्य सर्वेक्षण 331-37


### ग्रंथ परीक्षण


1 आधुनिक चीनचा चकवा 285-86

2 जागतिकीकरण आणि भारत 282-84

3 भारताचा आर्थिक ताळेबंद 187-90

## अधिवेशन वृत्तांत


1 अर्थसंवाद वार्षिक अहवाल 357-60

2. कार्यवाहांचा अहवाल 361-63

3. भारतातील घटक राज्यांची ऋणग्रस्तता 348-50

4. महाराष्ट्रातील जिल्हा नियोजन 351-56

5. सामाजिक निवडीचे सिद्धांत 338-47


## विषयांची रूपरेषा


1 भारतातील आर्थिक विचारांचा विकास 366-69

2 भारतातील स्वयंसहायता गट-पार्श्वभूमी व वाटचाल 370-75

3 महाराष्ट्रातील आदिवासी भागातील कुपोषण-समस्या व उपाय 376-79


## संकीर्ण


1. नव्या पेटंट कायद्यातील बदलाचे संभाव्य परिणाम 176-82

2. मराठवाड्यातील सिंचन सुविधा : एक अवलोकन 273-79

3. ही तर कंगालवस्था महागाई नव्हे (अनुवाद) 184-86

4. इंद्रवदन गोवर्धनदास पटेल - श्रद्धांजली 2

5. संपादकीय 1,97-98,287


## (आ) लेखक सूची

## स्वतंत्र लेख


1. ककडे, विजय 150-66

2. गायकवाड, माधव 261-72

3. गावंडे, गणेश 140-49

4. गोविलकर, विनायक 212-18

5. जोशी, शरद शंकर 63-75

6. जोशी, श्रीराम 167-75

7. दातार, माधव 40-49

8. दिवटे, कारभारी 167-75

9. दोशी, रवीन्द्र 117-25

10. पडोशी,अ.रा. 50-62

11 पटेल, विभूती 219-44

12 पाठक, ए.व्ही. 150-66

13 पेठे, वसंत 245-60

14 पुजारी, आ. गो. 126-39

15. भानुशाली, सु.गो. 3-22,99-115, 191-211,309-30

16 शि.ना. माने 90-95,280-81

17 सोळुंके, आर.एस. 76-89, 140-49.

## भाषणे

1. गोविलकर, विनायक 23-39

2. ठोंबरे ,सर्जेराव 289-308

## पारितोषिक प्राप्त लेख

1. यादव, संतोष बबनराव 331-37

## ग्रंथ परीक्षण

1 जहागिरदार, दि.व्यं 187-90

2. पडोशी, अ.रा. 282-84

3. महाबळ, किशोर 285-86

## अधिवेशन वृत्तांत

1 गोखले ,चारूदत्त 361-63

2. दातार ,माधव 338-47

3. देशपांडे, विनायक 357-60

4. म्हस्के, भगवान 348-50

5. माहोरे, रामदास 351-56

## विषयांची रूपरेषा

1. जहागिरदार, दि.व्यं. 376-79

2. देशपांडे, मेधा 370-75

3. हातेकर, निरज 366-69

## संकीर्ण

1. तळेकर, एस.डी. 273-79

2. देशपांडे, विनायक 1,2,97-98,287

3. भामरे, दिपक 176-82

4. माने शि.ना. 184-86

## इ. अंकांचा तपशील

| अंक | त्रिमाही | पृष्ठे |
|---|---|---|
| 1 | एप्रिल-जून , 2005 | 1-96 |
| 2 | जुलै-सप्टेंबर, 2005 | 97-190 |
| 3 | ऑक्टोबर-डिसेंबर, 2005 | 191-286 |
| 4 | जानेवारी-मार्च, 2006 | 287-390 |

✦✦✦

हे त्रैमासिक चारूदत्त गोखले यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता श्रीनिवास मुद्रणालय, धंतोली, नागपूर -440012. येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, 'अक्षय', प्लॉट नं. 10, प्रोफेसर्स कॉलनी, जिल्हा उद्योग केन्द्राच्या मागे, जळगाव. 425001 येथे प्रसिद्ध केले.

Registration No.31918 / 77

॥ जीवन ही कला आहे ॥ ॥ [illegible] ॥ ॥ नीती म्हणजे माणूस ॥

जिल्हा जळगाव

# पूर्णवाद नागरी सहकारी पतसंस्था मर्या.

(नोंदणी क्र. जे.जी.ए./जे.जी.ए./आर.एस.आर./सी.आर./२२१/२१०/२००० दि. १८/१०/२०००)

**मुख्य व्यवस्थापकीय कार्यालय**

७१, युनिटी चेंबर्स, गणेश कॉलनी रोड, जळगांव. फोन : ०२५७-२२५४२४०, २२५४७६३

## मुदत ठेवींवरील व्याजदर

| | | | |
|---|---|---|---|
| ११ ते ४५ दिवस | १० % | अष्टचक्र योजना | ११ % |
| ४६ ते ३६५ दिवस | ११ % | बचत ठेव खाते | ४ % द.सा.द.शे. |
| ३६६ दिवसांचे वर | ११ % | अक्षय बचतठेव खाते | ८ % द.सा.द.शे. |

**७२ महिन्यात दामदुप्पट**

## प्रगतीचा आलेख

(रुपये लाखात)

| तपशील | ३१ मार्च ०१ | ३१ मार्च ०२ | ३१ मार्च ०३ | ३१ मार्च ०४ | ३१ मार्च ०५ |
|---|---|---|---|---|---|
| सभासद संख्या | ४३६ | ५७५ | ७८० | ९९६ | ११६८ |
| वसुल भागभांडवल | २.८९ | ४.३५ | १६.०१ | २३.७१ | ५०.७६ |
| राखीव व अन्य निधी | ०.८४ | ३.७१ | ११.९३ | २८.५७ | ४९.५४ |
| सभासद ठेवी | ६४.७९ | २६२.६१ | ६२५.०५ | ८९८.७७ | १६८०.३५ |
| कर्ज येणे | ६९.२८ | २५५.१३ | ४४४.४३ | ६३४.१७ | ११९३.०२ |
| निव्वळ नफा | ०.९३ | ३.१८ | ११.२९ | १३.५२ | २६.५९ |
| गुंतवणूक | १४.२९ | २८.४४ | २३३.३१ | २९४.९२ | ५८२.१७ |
| ऑडीट वर्ग | 'अ' | 'अ' | 'अ' | 'अ' | 'अ' |
| लाभांश | १५ % | १५ % | १५ % | १५ % | १५ % |
| सभासद | ५ ग्रॅमची | १० ग्रॅमची | २० ग्रॅमची | ४० ग्रॅमची | ८० ग्रॅमची |
| भेट | नैपुण्य | योजकता | लोकसंग्रह | लोकमत | 'कालज्ञान' |
| वस्तू | रजतमुद्रा | रजतमुद्रा | रजतमुद्रा | रजतमुद्रा | रजतमुद्रा |

## आमची वैशिष्ट्ये

◆ प्रथम दिवसापासून संगणकीकृत व्यवहार. ◆ दि. ३१ मार्च २००५ अखेर यावेतोचे शासकीय लेखा परीक्षण पूर्ण ◆ जेष्ठ नागरीकांसाठी १ वर्षाचे वरील ठेवींना १.५% जादा व्याज दर ◆ जेष्ठ नागरीकांसाठी वयोमर्यादा ५८ वर्षे पूर्ण ◆ नोंदणीकृत संस्थासाठी १ वर्षाचे वरील ठेवींना ०.५% जादा व्याज दर ◆ विधवा महिला, अपंग व्यक्तींना १ वर्षाचे वरील ठेवींना ०.५% जादा व्याजदर ◆ अक्षय खातेदारांना शैक्षणिक कारणासाठी कर्ज व्याज दर द.सा.द.शे. १० %. ◆ सर्व कर्जासाठी व्याजदर १५ % ◆ नियमित कर्ज फेडीस व्याज रकमेत १० % सुट. ◆ संस्थेच्या सात शाखा कार्यरत. ◆ ठेवीदारांना कुठलेही आमिष नाही अगर ठेवीवर कुठल्याही प्रकारची भेट वस्तू नाही.

◆ कार्यालयीन कामकाजाची वेळ : ◆ शिरसोली शाखा : स. ८ ते दु. ३ पर्यंत. ◆ मुख्य व्यवस्थापकीय शाखा व नवीपेठ शाखा : स. ९.३० ते संध्या. ६.३०.

◆ इतर शाखा : स.१० ते संध्या. ६पर्यंत.

◆ एच.डी.एफ. सी व यु.टी.आय. बँकेच्या सर्व प्रमुख शहरांवरील डी.डी./धनादेश सुविधा अत्यल्प दरात रोखीने, त्यासाठी कमिशन दर :

◆ १ लाखांपर्यंत - दर हजारी ३० पैसे, ◆ १ लाखांच्या वर - दर हजारी २० पैसे, त्यावर लागणारा सर्व्हिस टॅक्स (सेवा कर) संस्था भरणार.

◆ अधिक माहितीसाठी संस्थेच्या नजीकच्या कार्यालयास त्वरीत भेट द्या.

## आमच्या शाखा

भुसावळ : थेटी निवास, कुलकर्णी प्लॉटस्, दशमेश मार्ग, भुसावळ - फोन : ०२५८२-२२९६८१

जळगांव : ७१, युनिटी चेंबर्स, गणेश कॉलनी रोड, जळगांव. फोन : २२५४२४०, २२५४७६३

रावेर : मेन रोड, रावेर फोन : ०२५८४ - २५२४३१

शिरसोली : ४, स्वामी विवेकानंद शॉपिंग कॉम्प्लेक्स, शिरसोली, फोन - २३५९३५२

सावदा : संभाजी चौक, मेन रोड, सावदा, ता.रावेर, जि.जळगांव फोन : ०२५८४ - २२३७८६

अमळनेर : १०, देशमुख अरुणाई संकुल, कोर्टाचे समोर, अमळनेर, फोन : ०२५८७ - २२८५३७

जळगांव : १०६ नवी पेठ, बँक स्ट्रीट, जळगांव. फोन : २२३४६४७

*ॲड. सत्यशील अविनाश अकोले* — अध्यक्ष

*श्री. जगतराव आप्पा बारकू पाटील* — उपाध्यक्ष

*डॉ. अशोक गणपती रावेरकर* — सचिव

*ॲड. सौ. कल्पना शेखर लंके* — मुख्य व्यवस्थापक

ZAROKA : 0257-2237639